

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक


# मेहता मराठी ग्रंथजगत

जून २०१२ । किंमत १५ रुपये









स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे यांचा
उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार स्वीकारताना श्री. सुनील मेहता




मेहता मराठी ग्रंथजगतच्या
दिवाळी अंक २०११ ला
मराठी वृत्तपत्र लेखक संघ,
मुंबई यांचा

## उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार

प्राप्त झाला आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जून २०१२ ◆ वर्ष बारावे ◆ अंक सहावा

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १० |
| **विशेष वार्ता** | २८ |
| **पुस्तक परिचय** | ३२ |
| **इंग्रजी पुस्तक परिचय** | ५१ |
| **पुरस्कार** | ५६ |
| **मुलाखत** (सुनील मेहता) | ६८ |
| **अभिप्राय** | ८० |
| **ओळख लेखकांची** | ८६ |
| **श्रद्धांजली** | १०० |
| **बालनगरी** | १०७ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
E-mail : info@mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

***या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.***

संपादकीय

# कॉपीराइट कायद्यात दुरुस्ती

राज्यसभेत १७ मे रोजी कॉपीराइट ॲमेंडमेंट बिल मंजूर करण्यात आले. विख्यात गीतकार जावेद अख्तर यांनी दीर्घकाळ त्याचा पाठपुरावा केला होता. हे विधेयक लोकसभेतही २२ मे रोजी मंजूर झाले. त्याला आता रीतसर राष्ट्रपतींची मान्यता मिळून त्याचे कायद्यात रूपांतर होईल. ही एक ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल.

भारतात प्रभावी कॉपीराइट कायदा नसल्याने कुठल्याही गोष्टीची अनधिकृत कॉपी होणे ही नित्याची बाब आहे. ध्वनिमुद्रिका, चित्रपट, संगीत, बेस्टसेलर पुस्तके वगैरेंची पायरसी सहजपणे होते. बौद्धिक संपत्तीची त्यामुळे राजरोस लूट होते. चित्रपटांच्या किंवा संगीताच्या बनावट सीडी, अनधिकृत पुस्तके यांच्यावर अधूनमधून धाडी घालून पोलीस ती जप्त करतात. परंतु पायरसीद्वारे कोट्यवधी रुपयांची उलाढाल कायम होताना दिसते. जप्त केलेला माल म्हणजे हिमनगाचे टोक असते. परदेशी चित्रपट निर्माते आणि प्रकाशकही भारतात होणाऱ्या पायरसीबद्दल नेहमी तक्रार करत असतात. आणि भारतात आपल्या व्यवहाराचा व्याप वाढवण्यास नाखूष असतात. आपल्या उत्पादनांची भारतात होणारी नक्कल रोखण्यासाठी काही परदेशी कंपन्या खास गुप्तचरांची नेमणूक करून पायरेटेड मालाची माहिती पोलिस अधिकाऱ्यांना देऊन त्यावर धाड टाकण्याची कारवाई करू पाहतात. परंतु भारतीय भ्रष्टाचारामुळे गुन्हेगारांना मोकळे रान मिळते. परदेशी मालाची किंमत ही नेहमीच भारतीय संदर्भात भरमसाठ असते.कोणतीही सीडी १० डॉलर्स पेक्षा अधिक किमतीची असते. पुस्तक पंधरावीस डॉलर्सना असते. भारतात पायरेटेड सीडी १ डॉलरला आणि पुस्तक दीडदोन डॉलरला मिळू शकते. पाश्चात्य देश तेथील जीवनमानाप्रमाणे व नफ्याच्या टक्केवारीप्रमाणे उत्पादनांच्या किंमती ठेवतात. भारतात उत्पादन खर्च कमी असतो त्यामुळे किंमतीही कमी ठेवणे परवडू शकते. ओरिजिनल परदेशी माल घेणे त्यामुळे खर्चिक वाटते.

पाश्चात्य देश कॉपीराइटच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे आपल्या उत्पादनांच्या, औषधांच्या किंमती उत्पादन खर्चाच्या दहावीस पटीने ठेवायला हयगय करीत नाहीत. भारतीय उत्पादक उत्पादन खर्चाच्या तिप्पट चौपट किंमत ठेवतानाही लोकांना हे परवडेल की नाही असा विचार करतात. आपल्या मालाच्या किंमती जास्त ठेवून परदेशी उत्पादक तिसऱ्या जगातील सर्वसामान्यांची एक प्रकारे लूटच करीत असतात. औषधांच्या बाबतीत तर हे प्रमाण फारच भयंकर आहे. परंतु त्या औषधांच्या जागी बनावट औषधे स्वस्तात विकणे म्हणजे रुग्णांच्या जीवाशी खेळणेच होय. ते कधीही निषिद्धच असायला हवे.

काही मंत्री, खासदार आणि उत्पादक संस्था यांनी हे विधेयक रोखण्याचा प्रयत्न केला अशीही चर्चा आहे. जावेद अख्तर यांनी दोन वर्षे पाठपुरावा केला म्हणून ते संसदेत मंजूर झाले.

संसदेने मंजूर केलेल्या विधेयकाचे चित्रपटसृष्टीतील संगीतकारांनी सर्वाधिक स्वागत केले आहे. आपली पटकथा, गीतरचना, चाल, संगीत यावरचा आपला हक्क मान्य केला जाणार म्हणून चित्रपटक्षेत्राशी संबंधित सर्व कलाकार खूष आहेत. भारतीय संगीतक्षेत्रातील हा एक ऐतिहासिक क्षण आहे आणि चित्रपटनिर्मितीशी विविध कलावंतांना मानधन म्हणून विशिष्ट टक्केवारीप्रमाणे रक्कम मिळत जाईल. दि इंडियन परफॉर्मिंग राइट सोसायटी (आयपीआरएस) ही संस्था भारतात चित्रपटक्षेत्रातील स्वामीत्व हक्कांचे काम पाहते. त्याबद्दल मानधनाचा निम्मा भाग ती स्वत: घेते; आणि निम्मा भाग कलावंतांना देते. रीतसर हे विधेयक अमलात आल्यावर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अशा संस्थेची वा संघटनेची गरज जास्तच घ्यावी लागेल. नुसता कायदा पास झाला म्हणजे मानधनाची टक्केवारी बिनबोभाट आपल्या खात्यावर परस्पर जमा होईल असे नाही. परदेशातही तेथील कलावंतांच्या स्वामीत्व हक्कापोटी मिळणाऱ्या मानधनाची वसुली आणि वितरण करणाऱ्या स्वतंत्र संस्था आहेत. त्या आपल्या सदस्य कलावंतांच्या हितसंबंधांकडे बारकाईने लक्ष देतात. गीतरचना केल्याबद्दल चित्रपट निर्मात्याने ठरलेले मानधन गीतकाराला दिले आणि हा व्यवहार पूर्ण झाला असे मानणे यापुढे बरोबर ठरणार नाही. ते गाणे इतर स्वरूपात (उदाहरणार्थ, मोबाईलच्या रिंगटोनच्या स्वरूपात) विकले गेले तर त्याच्या विक्री किंमतीतील विशिष्ट टक्केवारीवर गीतकाराचा हक्क राहील. या विधेयकात चित्रपट निर्मात्याचे हक्क डावलले गेले आहेत असे नाही. पण इतर कलाकारांचे हक्क मान्य केले गेले आहेत. गीतकार, गायक, संगीतकार यांनाही त्या गीताच्या वेगवेगळ्या स्वरूपातील वापराबद्दल मानधनाचा काही भाग मिळावा अशी तरतूद या विधेयकात असल्याने त्या त्या कलावंतांच्या खात्यावर तो जमा होत राहील. कलावंतांच्या निधनानंतरही त्याच्या वारसांना तो भाग मिळत राहील. तंत्रज्ञानात झालेल्या क्रांतीमुळे एकच संहिता वा कलाकृती वेगवेगळ्या स्वरूपात, वेगवेगळ्या

फॉर्म्यटमध्ये, वेगवेगळ्या माध्यमात वापरता येते. आणि त्यायोगे मिळणाऱ्या उत्पन्नात संबंधित कलाकाराला ठराविक भाग मिळू शकतो; याची या विधेयकाद्वारे सोय झाली असावी असे वाटते.


छापील पुस्तके आणि त्यांचे ई-बुक स्वरूपातील वितरण, त्यांचे वेगवेगळ्या भाषांतील अनुवाद, कथेचे नाट्यरूपात वा चित्रपटरूपात सादरीकरण, वगैरे वेगवेगळे हक्क लक्षात घेऊन त्या बद्दलच्या उत्पन्नातील ठराविक भाग मानधन म्हणून संबंधित लेखक आणि इतर कलावंत तसेच प्रकाशक यांना मिळण्याचा हक्क आहे, असेही या विधेयकामुळे अधोरेखित होईल.

आपल्या लेखनावर, पुस्तकावर, कलाकृतीवर लेखकाचा किंवा निर्मात्याचा निर्विवाद हक्क आमरण असतो. तो हक्क इतर कोणाला देता येत नाही. आपल्या कलाकृतीच्या प्रत्येक वापराबद्दल त्याला उचित मानधन दिले गल पाहिजे. कॉपीराइट पोटी देण्यात येणारी रॉयल्टीची रक्कम ठरवण्यासाठी शासन एका कॉपीराई बोर्डाची स्थापना करील. रेडिओ, टिव्ही आणि इतर माध्यमातून त्या कलाकृतीवर आधारीत कार्यक्रम केले गेले तर त्याबद्दलही मूळ लेखकाला रॉयल्टी द्यावी लागेल. त्या कलाकृतीची पायरसी करणाऱ्यांना दंड आणि दोन वर्षांपर्यंत कारावासाच्या शिक्षेची तरतूदही या विधेयकात आहे. हे विधेयक लेखक-प्रकाशक संबधातही पारदर्शकता आणू शकेल.

या विधेयकाच्या अंमलबजावणीचे काम कसे होईल हे आज सांगता येणार नाही, परंतु अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेच्या सचोटीवर आणि कार्यक्षमतेवर त्याचे यशापयश अवलंबून राहील हे निश्चित! कुठलाही कायदा कसा राबवला जातो यावर त्याचे उद्दिष्ट सफल होत आहे की नाही हे ठरते. त्याचा गैरफायदा घेऊन ऊठसूट लोक न्यायालयात जाऊ लागले तर भीक नको पण कुत्रे आवर असे म्हणण्याची पाळी येईल.

आपल्याकडे हे विधेयक संगीतक्षेत्राला पोषक ठरेल असे मानले जात आहे. परंतु परदेशात मात्र वारा उलट्या दिशेने वाहात आहे. अमेरिकेत पायरसीला आळा बसावा म्हणून स्टॉप ऑनलाइन पायरसी ॲक्ट मंजूर केला गेला. त्याच्या विरोधात गुगल, विकिपिडिया, रेडडिन वगैरेंनी दंड थोपटले. त्यामुळे तो कायदा मागे घेण्यात आला. गूगलचा सहसंस्थापक सर्जी ब्रिन याने इंटरनेट हे स्वतंत्र व स्वायत्तच हवे, त्यावर शासनाचा किंवा हॉलीवूडचा, ॲपल-फेसबुक यांच्यासारख्या सामर्थ्यशाली संस्थांचा अंकुश असता कामा नये असे प्रतिपादन केले आहे .

डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे कॉपीराइटच्या संकल्पनेचाही पारंपरिक पद्धतीने विचार करून चालणार नाही.



# दिवाळी अंक २०१२

## रसिक वाचकांसाठी स्पर्धा
## एक हजार रुपयांची पुस्तके बक्षिस मिळवा

**वाचक मित्रांनो,**

- या दिवाळी अंकासाठीही एक स्पर्धा जाहीर करत आहोत.

- ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. फक्त अट एवढीच की इ.स. २०११-२०१२ मध्ये तुम्ही एका पेक्षा जास्त पुस्तके विकत घेऊन वाचलेली असावीत.

- किमान दोन पुस्तके तरी दोन वर्षात विकत घेतलेली असणे आवश्यक. त्यासाठी बिल वगैरे पुरावा देण्याची गरज नाही. तुमच्या शब्दावर आमचा विश्वास आहे.

- आपण खरेदी केलेल्या पुस्तकांची नावे **(जास्तीत जास्त दहा)** पोस्टकार्डावर लिहून कळवा.

- त्यातील तुम्हाला सर्वात जास्त आवडलेल्या पुस्तकाबद्दल तीनचार ओळीत माहिती द्या.

- या स्पर्धेत भाग घेणाऱ्यांची नावे दिवाळी अंकात छापण्यात येतील.


- लॉट टाकून यशस्वी ठरणाऱ्या दोन स्पर्धकांना प्रत्येकी १,००० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील

**पत्र पोचण्याची अंतिम मुदत ३० ऑगस्ट २०१२**

**आमचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४

## टी बुक क्लब २१ मधील तीसरे पुस्तक




# झॅपड्

मॅनहॅटनच्या ब्लॅकआउटमध्ये
घडलेली रहस्यकथा

**कॅरोल हिगिन्स क्लार्क**

अनुवाद **जयंत गुणे**

**रु. १४०/-**सभासदांना सवलतीत

लोकप्रिय अमेरिकन लेखिका कॅरोल हिगिन्स क्लार्क हिच्या रेगन रैली मालिकेतील 'झॅप्ड' ही एक उत्कंठावर्धक रहस्यकथा. लॉरेन लिली ही हॉलीवूडमध्ये पदार्पण करू पाहणारी एक नटी. न्यूयॉर्कच्या जे.एफ.के विमानतळावरून टॅक्सीतून मॅनहॅटनमधल्या तिच्या घरी परत येत असते. वाटेतच तिचा धनाढ्य नवरा फोन करून घटस्फोटाची नोटीस देत असल्याचे तिला सांगतो. तेवढ्यात न्यूयॉर्क शहराचा वीज पुरवठा खंडीत होतो आणि संपूर्ण शहर काळोखात बुडून जाते.

या काळोखात अनेक गोष्टी होत असतात. एका छोट्या जागेत 'स्टँड अप कॉमेडीचा शो' बघण्यासाठी वीकएन्डच्या निमित्ताने गर्दी झालेली असते.

दोन व्यक्ती लॉरेनच्या घराचे कुलूप तोडण्याच्या खटपटीत असतात.

एका निष्पाप तरुणाला आपल्या जाळ्यात फसवून जन्माची अद्दल घडवण्याच्या उद्देशाने एक तरुणी त्याच्या मागे हात धुवून लागलेली असते. सगळी तरुणाई नाक्यावरच्या बारमध्ये जमा होते. घरात बसून अंधारात दुसरे काहीच करण्यासारखे नसल्याने लोक चौकाचौकात जमून 'बार्बेक्यू पार्टी'

करत धमाल करत असतात.

ब्लॅकआउटच्या रात्री वरवर वेगवेगळ्या वाटणाऱ्या या घटनांची सांगड घालत लेखिकेने मोठ्या कौशल्याने एका उत्कंठावर्धक कथानकाची गुंफण केली आहे. कथानक न्यूयॉर्कच्या मॅनहॅटन या भागात घडते. जेथे दिवे दिवसासुद्धा चालू असतात त्या मॅनहॅटनवर आता अंधाराचे साम्राज्य पसरलेले असते. रात्र सरत जाते तसा गुंता सुटत जातो आणि हडसन नदीवर सूर्याचे प्रथम किरण पडता-पडता सर्व काही आलबेल होते आणि वाचक सुटकेचा नि:श्वास टाकतो.

## टी बुक क्लब २१ मधील चौथे पुस्तक




# क्रिटिकल

**डॉ. रॉबिन कुक**

अनुवाद **डॉ प्रमोद जोगळेकर**

**रु. ३६०/-**सभासदांना सवलतीत

मार्च-एप्रिल २००७ मधल्या एका आठवड्यात एकमेकांना अजिबात न ओळखणाऱ्या तीन माणसांच्या आरोग्याच्या संदर्भात सर्वस्वी अनपेक्षित अशा घटना घडल्या. ह्या घटनांमध्ये दोघांचा जीव गेला आणि शिवाय हजारो लोकांच्या जीवनांवर गंभीर परिणाम झाले.

या घटनांमध्ये बळी पडलेल्या लोकांना असं काही होणार, याची पुसटशीही कल्पना नव्हती. या तिघांमधला एक गोरा डॉक्टर होता. दुसरा आफ्रिकन-अमेरिकन असून तो कॉम्प्युटर प्रोग्रॅमर होता. तिसरा माणूस आशियाई वंशाचा होता. व्यवसायानं अकाउंटंट असणाऱ्या या तिसऱ्याची निर्घृण हत्या झाली होती.




*** लंडनमध्ये विश्व शेक्सपिअर महोत्सवाचा वाङ्मयीन जल्लोष**

जागतिक साहित्यात मानाचे स्थान असलेला थोर नाटककार शेक्सपिअर याची ४४८वी जयंती साजरी झाली. या जयंतीच्या निमित्ताने लंडनमधील 'रॉयल शेक्सपिअर कंपनी' ३७ भाषांमध्ये शेक्सपिअरची नाटके सादर करणार आहे.

जुलैमध्ये होणाऱ्या लंडन ऑलिंपिकच्या पार्श्वभूमीवर विश्व शेक्सपिअर महोत्सवामध्ये 'विश्वाकडून विश्वाकडे' असा विभाग करण्यात आला आहे; या विभागात दक्षिण सुदान, दक्षिण आफ्रिका, बेलारूस, अफगाणिस्तान अशा अनेक देशांमधील नाट्यकलाकार शेक्सपिअरची नाटके आपापल्या भाषेमध्ये सादर करणार आहेत. आफ्रिकेतील स्वाहिली भाषेपासून ते केवळ शारीरिक चिन्हांच्या भाषेच्या माध्यमातून 'शेक्सपिअर' अनुभविण्याची संधी उपस्थितांना मिळेल. शेक्सपिअरच्या नाटकांचा केवळ चिन्हांच्या भाषेतून प्रयोग पहिल्यांदाच होत असल्याचा संयोजकांचा दावा आहे.

शेक्सपिअरच्या 'ट्वेल्थ नाइट' या नाटकाचा प्रयोग हिंदीमध्ये होणार आहे, तर 'ऑल इज वेल दॅट एंडस वेल' गुजराती कलाकार सादर करतील. 'ऑथेल्लो' हे नाटक तर 'हिप-हॉप'च्या माध्यमातून सादर होणार आहे. लंडनमधील ग्लोब थिएटरमध्ये हा महोत्सव होत आहे. चारशे वर्षांपूर्वी याच नाट्यगृहात शेक्सपिअरच्या नाटकाचे प्रयोग होत असत.

*** साहित्य संमेलन चिपळूणला**

८६वे साहित्य संमेलन कोकणातील चिपळूण येथे घेण्यावर आखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने शिक्कामोर्तब केले. चिपळूणला ही संधी प्रथमच मिळत

आहे.

यापूर्वी कोकणात रत्नागिरीला संमेलन भरविण्याचा मान दोनदा मिळाला होता. १९४० साली प्रा. ना. सी. फडके यांच्या, तर १९९० मध्ये मधु मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरीत साहित्य संमेलने झाली होती.

८६ व्या संमेलनासाठी महामंडळाकडे कऱ्हाड, चिपळूण आणि यवतमाळ येथून निमंत्रणे आली होती.

चिपळूण येथील लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर ही स्थानिक आयोजक संस्था पुढील वर्षी शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी टप्पा पूर्ण करणार आहे.

हे संमेलन नवीन वर्षाच्या सुरुवातीला होईल.

संमेलनाच्या तारखा आणि कार्यक्रम ठरविण्यासाठी महामंडळाची मार्गदर्शक समितीही निश्चित करण्यात आली आहे.

### * अंध-अपंग साहित्य संमेलन

साहित्याच्या माध्यमातून अंध-अपंगांच्या संघर्षाला कायमस्वरूपी व्यासपीठ उभारून त्यांच्यातील न्यूनगंडाची भावना कमी करून स्वत्वाची भावना जागृत करण्याचा निर्धार राज्यातील अंध-अपंग संघटनांनी केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून अंध-अपंग साहित्य संमेलनाचे पुनरुज्जीवन करण्यात आले.

एकूण लोकसंख्येत अंध-अपंगांचे प्रमाण दहा टक्के आहे. राज्यभरात विखुरलेल्या अंध-अपंग व्यक्तींना एकत्र आणत, साहित्य संमेलनाच्या माध्यमातून एकजूट दाखविण्याचा निर्धार केला आहे. अपंग साहित्य व सांस्कृतिक परिषद आणि 'द नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ ब्लाइंड' यांच्या विद्यमाने वसईतील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पाच आणि सहा मे रोजी हे संमेलन झाले. अंध साहित्यिक प्रा. पुरुषोत्तम महाजन हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. अपंग साहित्य संमेलनाचा प्रारंभ १९८० मध्ये झाला होता. दोन संमेलने झाली. मागील वर्षी साताऱ्यामध्ये छोटेखानी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, त्याला मिळालेल्या प्रतिसादामुळे या वर्षी मोठ्या स्वरूपात हे संमेलन आयोजित करण्यात आल्याचे अपंग साहित्य परिषदेचे अध्यक्ष बापूसाहेब बोबटे यांनी सांगितले.

### * कॉमिक्सच्या दुनियेत बिल गेट्स

मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणाऱ्या आणि आवडीने वाचल्या जाणाऱ्या कॉमिक्सच्या विश्वात आता बिल गेट्स यांची एन्ट्री होत आहे. मायक्रोसॉफ्टचे

संस्थापक बिल गेट्स यांचा जीवनसंघर्ष चित्रकथेच्या माध्यमातून उपलब्ध होणार असून, त्यामधील रेखाटने बिलची पत्नी मेलिंडा यांची आहेत. साधारणतः मुलांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या कॉमिक्सचा हिरो हा शूर आणि पराक्रमी असतो. बिल यांनीही आतापर्यंत आपल्या कंपनीच्या माध्यमातून अनेकांची आयुष्ये घडविली आहेत. त्यामुळे त्यांचे कार्य लोकांसमोर येण्याची आवश्यकता असल्याचे मेलिंडा यांनी स्पष्ट केले.

यापूर्वी फेसबुकचा संस्थापक मार्क झुकेरबर्ग आणि ॲपलचे सहसंस्थापक दिवंगत स्टीव्ह जॉब्ज यांच्यावरही कॉमिक्स निघाली आहेत.

### * राज्य पुरस्कार रकमेत वाढ

कला आणि साहित्य क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्यांना राज्य सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या पुरस्कारांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्काराची रक्कम १० लाख रुपये, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव, अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, विठाबाई नारायणगावकर जीवन गौरव पुरस्कार प्रत्येकी ५ लाख रुपये तर व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार आणि राज कपूर विशेष योगदान पुरस्कार यांची रक्कम ३ लाख करण्यात आली आहे.

राज्य सांस्कृतिक पुरस्काराची रक्कमही प्रत्येकी १ लाख रुपये असेल.

मराठी साहित्यातील पुरस्कारातही वाढ करण्यात आली असून विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार आता ५ लाख रुपये, श्री. पु. भागवत पुरस्कार ३ लाख रुपये असा असणार आहे.

### * चहा होणार राष्ट्रीय पेय!

पुढच्या वर्षी एप्रिलपर्यंत चहाला राष्ट्रीय पेयाचा दर्जा दिला जाईल, अशी घोषणा नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष मॉंटेकसिंग अहलुवालिया यांनी आसाम चहाउत्पादक संघटनेच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना केली. ''पुढच्या वर्षी १७ एप्रिलला पहिले आसामी चहा उत्पादक व १८५७ च्या उठावामध्ये आघाडीवर असलेले मणिराम दिवाण यांच्या २१२ व्या जयंतीचा मुहूर्त साधून ही घोषणा अधिकृतरीत्या केली जाईल. चहाउत्पादन क्षेत्रातील अर्ध्याहून अधिक कामगार महिला आहेत आणि संघटित क्षेत्रातील सर्वात मोठे नोकरदारही हेच क्षेत्र आहे, त्यामुळे हा निर्णय समर्थनीय ठरतो,'' असे अहलुवालिया म्हणाले.

''भारत हा काळ्या चहाचा सर्वांत मोठा उत्पादक व ग्राहक देश आहे. 'ओआरजी-इंडिया'च्या चहा ग्राहक अभ्यासानुसार, देशातील ८३ टक्के घरांमध्ये चहाचे सेवन केले जाते. शिवाय पाण्यानंतर सर्वांत स्वस्त पेय चहा हेच आहे,'' असे अहलुवालिया म्हणाले.

*** बंडा जोशी यांचा 'हास्यखळखळाट'**

विनोदी लिखाण करण्याअगोदर विचार पक्का असण्याची गरज असते, असे मत ज्येष्ठ कवी प्रा. फ. मुं. शिंदे यांनी व्यक्त केले. सिग्नेट पब्लिकेशनतर्फे एकपात्री कलाकार बंडा जोशी यांच्या 'खळखळाट' या हास्यकविता संग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, सिग्नेट पब्लिकेशनचे ॲड. प्रमोद आडकर उपस्थित होते. ''विनोद आणि विचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विनोदी लिखाण करण्याअगोदर विचार पक्का असण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक भाषेचा एक रिवाज असतो, विनोद प्रगल्भ होत नाही, तोपर्यंत तो प्रसन्न होत नाही. विनोदावर लेखन करताना ते गांभीर्याने करावे लागते,'' असे शिंदे यांनी सांगितले. एकपात्री कार्यक्रमाचे अनेक प्रयोग झाल्यानंतर ते कंटाळवाणे होतात. मात्र, बंडा जोशी यांच्या एकपात्री कार्यक्रमात तसे जाणवत नसल्याचे मंगेश तेंडुलकर म्हणाले.

*** टेक्स्ट टू ब्रेल कन्व्हर्टर**

इंटरनेटच्या माध्यमातून जग जवळ आले असले, तरीही दृष्टिहीनांपासून ते फारच दूर होते. पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उपकरणांमुळे प्रचंड माहितीचे मायाजाल टप्प्यात आले आहे.

दृष्टिहीन विद्यार्थ्यांनाही इंटरनेटचा वापर करता यावा, यासाठी गौरव सोनार आणि सचिन वाडेकर या विद्यार्थ्यांनी मायक्रो कंट्रोलरचा वापर करून 'टेक्स्ट टू ब्रेल कन्व्हर्टर' हे उपकरण विकसित केले आहे.

हे उपकरण कम्प्युटरवरील लिखित माहितीचे व इतर संबंधित माहितीचे ब्रेल भाषेत रूपांतर करते. ब्रेल सेल म्हणजे एक मुळाक्षर असते. ब्रेल लिपीतील मुळाक्षरासाठी एक विशिष्ट मांडणी ठरलेली असते. दृष्टिहीन व्यक्ती या ब्रेल सेलच्या स्पर्शाने हे वाक्य कोणते आहे, कशा पद्धतीचे आहे, हे ओळखू शकेल.

बाजारात अशा पद्धतीचे उपकरण उपलब्ध असले, तरी त्याची किंमत जास्त आहे. सध्या हे तंत्रज्ञान विकसित झाले असले, तरी ते इतक्यातच विक्रीसाठी

उपलब्ध असणार नाही. त्याच्या अन्य चाचण्या आणि सुधारणा चालू आहेत. या तंत्रज्ञानासाठी त्यांना प्रा. सुनील पाटील आणि विभागप्रमुख विवेक राणे यांचे मार्गदर्शन मिळाले. उपकरणाच्या अधिक माहितीसाठी गौरव सोनार (९०२८७८४५३४) आणि सचिन वाडेकर (९४२३२०५५००) यांच्याशी संपर्क साधता येईल.

या बहुउपयोगी उपकरणामुळे दृष्टिहीनांनाही इंटरनेटचा वापर करणे, ई-मेल तपासणे, सर्फिंग करणे, सर्चिंग करणे, ऑनलाइन वर्तमानपत्र वाचणे शक्य होणार आहे.

*** जेम्स बॉण्डची नवी साहसे**

जेम्स बॉण्ड याची हेरगिरी कादंबरीच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी पुन्हा एकदा वाचकांना मिळणार आहे इयान फ्लेमिंग यांच्या या जगप्रसिद्ध पात्राचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आता ब्रिटिश कादंबरीकार विल्यम बॉयड् यांना फ्लेमिंग इस्टेटकडून पाचारण करण्यात आले आहे बॉयड यांच्या कादंबऱ्यांच्या माध्यमातून बॉण्ड पुन्हा नव्या रूपात वाचकांसमोर येणार आहे.

जेम्स बॉण्ड या काल्पनिक पात्राची ओळख करून देणारी 'कसिनो रॉयल' ही इयान फ्लेमिंग यांची सर्वात पहिली कादंबरी साठीच्या उत्तरार्धात प्रसिद्ध झाली होती. तिला जगभरातील वाचकांनी अक्षरश: डोक्यावर घेतले होते. स्वत: इयान यांनी बॉण्डवर १४ पुस्तके लिहिली.

''जेम्स बॉण्डची ओळख बालपणी माझ्या वडिलांनी करून दिली होती. त्यामुळे त्यावरच कादंबरी लिहिण्याची मिळालेली ही संधी आपल्यासाठी अतिशय अमूल्य आणि उत्साहवर्धक आहे त्यामुळे लगेचच आपण कादंबरी लिहिण्याचे आमंत्रण स्वीकारले,'' अशी प्रतिक्रिया बॉयड् यांनी व्यक्त केली.

हॉलीवूडमधील सर्वाधिक गल्लाभरू चित्रमालिका म्हणून जेम्स बॉण्ड यांच्या चित्रपटाकडे पाहिले जाते. शॉन कॉनरी ते डॅनियल क्रेग पर्यंत बॉण्डचेहऱ्यांनी जगभरच्या हॉलीवूडप्रेमींवर राज्य केले आहे. यावर्षी या मालिकेमधील 'स्कायफॉल' हा २३ वा बॉण्डपट झळकेल.

*** किमान आठवीपर्यंत मराठीची सक्ती कायम**

सीबीएसई, आयसीएसई बोर्ड, तसेच इंग्रजीसह अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये आता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकविणे बंधनकारक असेल. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील मराठीची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्यासाठी राज्य सरकार खबरदारी घेईल, असे शालेय शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा यांनी विधानपरिषदेत

स्पष्ट केले.

आमदार कपिल पाटील यांनी याविषयी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना दर्डा म्हणाले 'पाचवीपासून हिंदी हा विषय कायम राहील. इंग्रजीसह अन्य माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी हा विषय सुलभ, उपयुक्त आणि आनंददायी पद्धतीने शिकविला जाईल.' या चर्चेत शिवसेनेचे दिवाकर रावते, राष्ट्रवादी काँग्रेसचे हेमंत टकले, अरुण गुजराथी आदींनी भाग घेतला.

## * संत तुकाराम यांचे चरित्र कोंकणीत

आपल्या अभंगांमधून सामाजिक समरसतेचा संदेश देणारे तसेच समाजातील अनिष्ट रुढी-परंपरा, अंधश्रद्धा यावर कोरडे ओढणारे संत तुकाराम यांचे चरित्र गोवा राज्याच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाचे माजी अध्यक्ष, पद्मश्री सुरेश आमोणकर हे कोंकणीत अनुवादित करत आहेत. 'तुकाराम डॉट कॉम' या संकेतस्थळावर ह.भ.प. श्रीधर महाराज मोरे-देहुकर यांनी लिहिलेल्या चरित्राचा आणि काही अभंगांचा वापर आमोणकर यांनी केलेला आहे.

## * आमीर खान रिक्षावाल्याच्या लग्नात

'थ्री इडियट्स' सिनेमाच्या प्रमोशनच्या दरम्यान २००९ ओळख झालेल्या आपल्या रिक्षाचालक मित्राला, रामलखनला वचन दिल्याप्रमाणे त्याच्या मुलाच्या विवाहसोहळ्याला सुपरस्टार आमीर खानने वाराणशीत हजेरी तर लावली. त्याचे चाहते आणि फोटोग्राफर यांच्या तुफान गर्दीचा भार न पेलल्याने स्टेज कोसळले आणि आमीरही खाली पडला. यामध्ये आमीरला सुदैवाने काही दुखापत झाली नाही आणि आमीरनेही मोठ्या मनाने ही गोष्ट हसण्यावारी नेत समारंभाची एकूण व्यवस्था चांगली असल्याचे प्रशस्तीपत्र दिले.

निळी डेनिम आणि पांढरा कुर्ता अशा वेशात आमीरने मध्यरात्रीनंतर उशिरा मेहमूदगंज येथील मंगल कार्यालयात हजेरी लावली. रात्री साडेनऊच्या सुमारास तो येणे अपेक्षित होते. परंतु पाटण्याहून कारने यावे लागल्याने त्याला पोहोचायला उशीर झाला, असे लखनने सांगितले. आल्यावर आमीरने आपल्या मित्राची गळाभेट घेतली आणि राजीव आणि विजयता या नवविवाहित जोडप्याला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर तो फोटोसाठी उभा राहिला. त्याला पाहण्यासाठी उसळलेल्या गर्दीमुळे स्टेज कोसळले.

वाराणसी हे माझ्या आईचे जन्मगाव आहे, त्यामुळे या शहराला माझ्या हृदयात खास स्थान आहे, असे सांगत त्याने वाराणसीकरांची मने जिंकली.

### * गुगल ड्राइव्ह

डेटा ट्रान्स्फरसाठी ई-मेल किंवा पेनड्राइव्हला पर्याय नव्हता. या मर्यादेवर गुगलने मात केली असून 'गुगल ड्राइव्ह'च्या रूपाने ही सेवा https://drive.google.com वर नेटिझन्ससाठी खुली केली आहे.

लोकप्रिय सर्च इंजीन असलेल्या गुगलने यापूवी डॉक्स, जी+, पिकासा, यू, प्ले अशा विविध सेवा सुरू केल्या आहेत. त्यात आता भर पडलीय 'ड्राइव्ह' सेवेची. यामुळे आपण आपले फोटो, डॉक्युमेंट्स त्यावर सेव्ह करून ठेवू शकतो. ही सेवा 'क्लाऊड कम्प्युटिंग' तंत्रावर आधारित आहे. लवकरच या ड्राइव्हमधून डॉक्युमेंट्स, फोटो ई-मेलवरही अटॅच करता येतील. ड्राइव्हमध्ये गुगल डॉक्सही पूर्णपणे वापरता येणार आहे. डॉक्सच्या मदतीने वर्ड, एक्सेल, पॉवरपॉइंट्स या सॉफ्टवेअर्सवर काम करता येईल. ड्राइव्हवर सेव्ह असलेल्या फाइल्स  मित्रांबरोबर शेअरही करता येतील.

गुगल ड्राइव्ह विंडोज, मॅक कम्प्युटरमध्ये वापरता येईलच, शिवाय अँड्रॉइड फोन, आयफोन आणि टॅबलेट्सवर ही सेवा देण्यासाठी विविध ॲप्लिकेशन्सही विकसित होतील. अंधांनाही स्क्रीन रीडरच्या मदतीने याचा लाभ घेता येईल.

ड्राइव्हवर 'फाइल टाइप', 'ओनर' अशा विविध पर्यायांचा वापर करून फाइल्स सर्च करता येतील. यामध्ये इमेज सर्चचाही पर्याय आहे.

गुगल ड्राइव्हमध्ये ५ जीबीपर्यंतचे स्टोरेज विनामूल्य करता येऊ शकेल. अतिरिक्त स्टोरेजसाठी २० जीबी मिळू शकेल. मात्र, त्यासाठी वर्षाला पाच डॉलर्स भरावे लागतील. या सेवेबरोबर जीमेलची स्टोरेज क्षमता ७.५ जीबीवरून १० जीबीपर्यंत वाढवली आहे.

### * नेत्रदानाचा प्रचार

लोकांना नेत्रदान करण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात समुपदेशकाची नेमणूक करण्याचा निर्णय राज्य अंधत्व नियंत्रण समितीने घेतला आहे.

'राज्यात अंधांची संख्या वाढत आहे. अंधत्व कमी करण्यासाठी नेत्रदान करणाऱ्यांची संख्या वाढणे आवश्यक आहे. त्या करिता नेत्रपेढ्यांसह नेत्रदान संदर्भातील चळवळींना प्रोत्साहित करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये नेत्रदान केल्याने वार्षिक उद्दिष्टापेक्षा संकलित डोळ्यांची संख्या वाढत आहे. त्याचा फायदा अधिक व्हावा यासाठी जिल्हा हॉस्पिटलमध्ये समुपदेशकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.'

गावांत कोणी मयत झाल्याची माहिती समुपदेशकाला मिळाल्यास त्याने संबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांची भेट घ्यावी. त्यांना नेत्रदानाचे महत्त्व पटवून द्यावे तसेच मृत व्यक्तीचे नेत्रदान करण्यासाठी मन वळवावे. संबंधित मृत व्यक्तीचे नेत्रदान करण्यास

त्यांनी संमती दिल्यास नेत्रतज्ज्ञ त्या व्यक्तीचे नेत्रदान करून घेतील.

*** वाचनाचा 'वासंतिक' प्रवास**

पटवर्धन बाग, एरंडवणा परिसरातल्या महिलांनी 'वासंतिक पुस्तक भिशी मंडळ' चालवले आहे. मंडळाची स्थापना होऊन चार वर्षे झाली. दर महिन्याला एक पुस्तक ठरवून त्यावर दिलखुलास चर्चा केली जाते. लेखकांना नावं ठेवायची नाहीत, जमल्यास लेखकांशी संपर्क साधून त्यांच्याशी संवाद साधायचा हा संकेत आहे. यंदा १८ मार्चला कार्य प्रसिद्ध कवयित्री आसावरी काकडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला दिन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यामध्ये वासंतिक ग्रुपने स्त्री व्यक्तिमत्त्वाचा नाटकातील प्रवास विकास दाखवला. लेखन विनया वाळिंबे यांचे होते. 'शारदा', 'तुझं आहे तुजपाशी', 'ती फुलराणी' आणि 'चारचौघी' ही नाटके निवडली होती. काही सादरीकरण, काही नाट्यगीते आणि नाट्यवाचन यातून स्त्रीचे विकसित रूप दाखवले गेले. त्यात देवल, अपर्णा जोशी, मेधा गोखले, योगिनी भिडे आणि विनया वाळिंबे यांचा सहभाग होता.

*** पोस्टाच्या स्टँपवर तुमचे छायाचित्र**

पोस्ट खात्यातर्फे नुकतेच 'महापेक्स' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्या दरम्यान नागरिकांना स्वतःची छबी असलेले स्टँप्स काढण्याची संधी मिळाली. एकूण ३५३५ पुणेकरांनी हे स्टँप काढून घेतले. काहींनी चिमुकल्या नातवंडांचा, काहींनी आपल्या नातेवाइकांचा तर काहींनी स्वतःचाच स्टँप काढून घेतला. पोस्टाच्या पाकिटावर असे स्टँप लावून ते नातेवाइकांना पाठवण्याचा आनंद घेतला.

*** कुसुमाग्रजांची कविता 'हायकमांड'मध्ये**

*पन्नाशीची उमर गाठली, अभिवादन मज करू नका*
*मीच विनवतो हात जोडूनी,*
*वाट वाकडी करू नका...*

कुसुमाग्रज यांचा शाहिरी फटका 'हायकमांड'या सिनेमाला टायटल ट्रॅक म्हणून वापरण्यात आला आहे. महाराष्ट्रातले राजकारण आणि सीमाप्रश्न यावर 'हायकमांड'मध्ये भाष्य करण्यात आले आहे. राजकीय परिस्थितीमध्ये सामान्य माणूस पोळला जातो. कुसुमाग्रजांच्या या कवितेतून तशीच भावना व्यक्त होत असल्याने ही कविता टायटल ट्रॅक म्हणून निवडण्यात आली आहे. ही कविता आजच्या काळालाही सुसंगत आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीमुळे वातावरण अस्थिर आहे. ही कविता

स्वातंत्र्यदेवतेच्या तोंडी आहे. त्यात फटका आणि विनवणी असा विरोधाभास एकत्र आल्याने ही कविता संगीतबद्ध करणे हे एक आव्हानच होते. त्यामुळे पोवाडा, वासुदेव, शाहिरी असे वेगवेगळे फॉर्म एकत्र करून संगीत दिले आहे, असे शशांक पोवार यांनी सांगितले.

*** विज्ञानाची परीक्षा मातृभाषेतून देणाऱ्यांत वाढ**

बारावी विज्ञान शाखेची परीक्षा मराठीतून देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. गेल्या तीन वर्षांत साडेसात हजार विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतून परीक्षा दिली आहे.

मराठीतून प्रश्नपत्रिका सोडविल्यास चांगले गुण मिळत असल्याने विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. १९७७ पासून महाराष्ट्र उच्च माध्यमिक मंडळाच्या नियमांनुसार बारावी विज्ञान शाखेतील परीक्षा मराठी भाषेतून देता येते. राज्यात २०१० पासून शास्त्र शाखेची परीक्षा मराठीतून देण्यास सुरुवात झाली. नुकत्याच झालेल्या बारावीच्या परीक्षेत सुमारे १२०० विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र विषयाची परीक्षा मराठीतून देऊन चांगले गुण मिळविले आहेत. याबरोबरच 'सीईटी'ची परीक्षाही मराठीतून देता येते.''

गेल्या चार वर्षांपासून ११ वी शास्त्र शाखेला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. त्यासाठी शास्त्र शाखेचे शिक्षण मराठी माध्यमातून सुरू केले तर प्रवेश संख्या निश्चितच वाढेल. विद्यार्थिसंख्येअभावी बंद पडू लागलेली महाविद्यालये सुरू होतील. विज्ञान शिक्षणाचा दर्जा सुधारून संशोधकांचीही संख्या वाढेल.

*** 'सफर ऑस्ट्रेलियाची'चे प्रकाशन**

भारतीय पर्यटकांनी गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाच्या तिजोरीत ८९ कोटी ९० लाख ऑस्ट्रेलियन डॉलरची भर टाकली. ऑस्ट्रेलियामध्ये खर्च करणाऱ्यामध्ये भारतीयांचा क्रमांक नववा लागतो. पर्यटकांकडून येणाऱ्या एकूण उत्पन्नात हा वाटा तीन टक्के आहे असे टुरिझम ऑस्ट्रेलियाचे भारतातील व्यवस्थापक निशांत काशीकर यांनी सुहास जोशी यांच्या सफर ऑस्ट्रेलियाची या पुस्तकाचे प्रकाशन करताना सांगितले.

पुढील काही वर्षात भारतीय पर्यटक ऑस्ट्रेलियात २.२ ते २.३ अब्ज ऑस्ट्रेलियन डॉलर खर्च करतील, असा अंदाज आहे. ऑस्ट्रेलिया हा देश भारताकडे खूप गांभीर्याने बघतो आहे. भारतीय पर्यटक अजून वाढावेत यासाठी त्यांनी इंडिया २०.२० हा प्लॅन आखला असून भारतीय रेस्टॉरंटना प्रोत्साहन देणे, भारतीय वृत्तपत्रे उपलब्ध करून देणे वगैरे गोष्टी करण्यात येणार आहेत, असे काशीकर म्हणाले

टुरिझम ऑस्ट्रेलिया भारतीय पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी विविध क्लृप्त्याही वापरत आहे.

ऑस्ट्रेलियात जाणाऱ्या पर्यटकांमध्ये पहिला क्रमांक महाराष्ट्राचा लागतो. महाराष्ट्रानंतर उत्तर भारतातील पर्यटक सर्वाधिक आहेत. त्यामुळे पुढील काही वर्षांत तेथील हॉटेलमध्ये झुणका-भाकरी मिळाली तर नवल वाटू नये.

### * मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन

अहमदनगर येथे मे महिन्यात मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन संपन्न झाले. अध्यक्षपदी अशोक आंग्रे हे होते. मराठी ख्रिस्ती साहित्य परिषदेच्या गेल्या ४० वर्षांच्या इतिहासात अध्यक्षपदासाठी प्रथमच निवडणूक झाली. आंग्रे हे १७० वर्षे प्रकाशित होणाऱ्या ज्ञानोदय मासिकाचे विद्यमान संपादक आहेत. त्यांची ७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. विविध मराठी नियतकालिकांमधून त्यांनी विपुल लेखन केले आहे. मराठी ख्रिस्ती साहित्य परिषदेचे ते उपाध्यक्ष आहेत.

### * संगीत - शास्त्रीय आणि पाश्चात्य

तरुणांना शास्त्रीय संगीताकडे आकर्षित करण्यासाठी युवा गायिका डॉ. कल्याणी बोंद्रे यांनी २७ एप्रिल रोजी रागा ऑन द बीट या कार्यक्रमांमध्ये शास्त्रीय आणि पाश्चात्य संगीताची अनोखी मैफल रंगवली.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील राग व रचनांना पाश्चात्य शैलीने साथसंगत करण्यासाठी विविध इलेक्ट्रॉनिक साधने तसेच कीबोर्ड यांचा वापर करण्यात आला. भारतीय संगीताचा भाव जपण्यासाठी तबला आणि की-बोर्डवरूनही संगीत देण्यात आले. बंदिश, ठुमरी, तराणा, गझल आणि सिनेमांतील शास्त्रीय गीते सादर करण्यात आली.

अमित जोशी (इलेक्ट्रॉनिक पर्कशन आणि तबला) आणि रोहित कुलकर्णी (की-बोर्ड) यांनी साथसंगत केली. बोंद्रे म्हणाल्या, प्रत्येक संगीताची स्वतःची खासियत असते. शास्त्रीय संगीताचे चाहते आहेत तसेच पाश्चात्य संगीताचेही आहेत. या दोन्ही संगीतांचा भाव जपून त्यांचे एकत्र सादरीकरण आम्ही करणार आहोत. आपले संगीत जास्तीत जास्त श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा प्रयत्न आहे.

### * 'अंतर्वेध'चे सोनईत प्रकाशन

माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या अंतर्वेध या पुस्तकाचा प्रकाशन

सोहळा शनिवार २७ एप्रिल रोजी मुळा पब्लिक स्कूल, सोनई, ता नेवासा, जि. नगर येथे केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते संपन्न झाला. उपमुख्यमंत्री अजित पवार कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते

*** 'दादा स्टाइल' चित्रपट करून जपल्या 'सोंगाड्या'च्या स्मृती**

दादा कोंडके यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्यांच्याबरोबर काम केलेल्या सहकाऱ्यांनी 'मला एक चानस हवा' हा खास 'दादा स्टाइल' चित्रपट तयार करून 'सोंगाड्या'ला आदरांजली वाहिली आहे.

दादा कोंडके यांच्या चित्रपटांनी मराठी प्रेक्षकांना खळखळून हसविण्याचे काम काही दशकांपूर्वी केले. दादांच्या प्रतिमेचे विद्रूपीकरण न करता त्यांच्यातील विनोदाचा झरा प्रेक्षकांपर्यंत पोचविण्यासाठी ऋषिकेश आर्टसतर्फे या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून मकरंद अनासपुरे, दीपाली सय्यद, कुलदीप पवार, मधू कांबीकर, विजय पाटकर आदी कलाकारही चित्रपटात आहेत.

चित्रपटाचे दिग्दर्शक बाळ मोहिते म्हणाले, ''भालजी पेंढारकर हे दादांचे व माझे गुरू होते. या माझ्या गुरुबंधूबरोबर ३५ वर्षे मी काम केले. या चित्रपटाची कथा त्यांच्यावरच आधारित आहे.'' बाळासाहेब ठाकरेंच्या हस्ते या चित्रपटाच्या ध्वनिचित्रफितीचे प्रकाशन करण्यात आले.

*** सोशल नेटवर्किंगचा 'शेअरिंग' बाजार**

सोशल नेटवर्किंग ही काही नवी गोष्ट राहिली नाही. पण त्याची नवलाई दहा वर्षांनंतरही कायम आहे. आज काय खाल्लं, काय पाहिलं यापासून जगात काय घडतंय किंवा घडू पाहतंय इथपर्यंतची प्रत्येक गोष्ट 'शेअर' होत आहे. फेसबुक असो की ट्विटर, जी प्लस असो की आणखी काही... 'शेअरिंग'चा हा 'बाजार' आज आकाशाला गवसणी घालत आहे.

सोशल नेटवर्किंगचा अफाट पसारा डोळे दिपवणारा आहे. दर मिनिटाला ३९ हजार ब्लॉग्ज अपडेट होतात, फेसबुकवर दर आठवड्याला साडेतीन अब्ज फोटो, जोक्स, पोस्ट शेअर केले जातात, फ्लिकरवर दर महिन्याला ४५ लाख फोटो अपलोड होतात... आणखी बरंच काही! दहा वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेले सोशल नेटवर्किंग ही आज प्रत्येकाची गरज बनली आहे

एवढा मोठा व्याप असलेल्या सोशल नेटवर्किंगला 'कॅश' करण्याचे प्रयत्न न झाले तर नवलच! नेटवर्किंगचं आयतं माध्यम मिळाल्यानं आज प्रत्येक कंपनीची

सोशल साइट्सवर उडी पडत आहे. ग्राहकांसाठीही हे माध्यम कंपनी आणि त्यांचं प्रॉडक्ट याबाबत जाणून घेण्याचं साधन बनलं आहे. सोशिएबल लॅब्स या संस्थेच्या अहवालानुसार, ऑनलाइन शॉपिंग करणारे ६२ टक्के ग्राहक एखाद्या प्रॉडक्टबाबत फेसबुकवर आलेल्या प्रतिक्रियांनुसार निर्णय घेतात. कंपन्यांना ग्राहक मिळतात, ग्राहकांना चांगलं प्रॉडक्ट मिळतं आणि सोशल नेटवर्किंग साइट्सना त्या चालवण्याचं 'इंधन'!

फोटो शेअरिंग ही सोशल नेटवर्किंगची सर्वात जमेची बाजू ठरली आहे. फोटो टाका, त्याला स्पेशल इफेक्ट द्या, टॅग करा, कमेंट करा... फेसबुक, इन्स्टाग्राम, फ्लिकर आणि पिंटरेस्ट यांनी यूजर्सना आपले रोजच्या जीवनातले क्षण कॅमेराबंद करून पोस्ट करण्याची संधी उपलब्ध करून दिली. प्रतिसाद?... २०११ या एका वर्षात १०० अब्ज फोटो ऑनलाइन शेअर केले गेले.

*** घाना देशामध्ये 'सीडॅक'**

प्रगत संगणक विकास केंद्राचे (सीडॅक) इंडिया-घाना कोफी अन्नान सेंटर ऑफ एक्सलन्स हे परदेशातील पहिले अधिकृत प्रशिक्षण केंद्र, घाना या आफ्रिकन देशामध्ये सुरू झाले आहे. परम संगणकाच्या अद्ययावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण असे हे केंद्र घाना देशाची राजधानी अंकारामध्ये असून त्यासाठी केंद्र सरकारने तीन कोटी ७२ लाख रुपये मंजूर केले आहेत. घाना केंद्राच्या महासंचालक डोरोथी के. गॉर्डन आणि सीडॅकचे महासंचालक प्रा. रजत मूना यांनी ही माहिती दिली. सीडॅकच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य केंद्राचे प्रमुख आणि मुख्य तांत्रिक अधिकारी अभिनव दीक्षित या प्रसंगी उपस्थित होते.

मूना म्हणाले, केंद्रामार्फत पहिल्या टप्प्यात हाय परफॉर्मन्स कॉम्प्युटिंग आणि ॲडव्हान्स्ड आयटी ट्रेनिंग तर दुसऱ्या टप्प्यात ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटर आर्टस आणि वायरलेस अँड मोबाईल कॉम्प्युटिंग या विषयाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच प्रगत संगणकाच्या विविध विषयांवर दर तीन महिन्यांनी कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत.

गॉर्डन म्हणाल्या, सीडॅकच्या सहकार्याने सुरू झालेल्या केंद्रामुळे घाना आणि आफ्रिका खंडातील अन्य देशांना माहिती-तंत्रज्ञानाच्या शिक्षणाचा लाभ घेता येईल.

*** बारा अब्ज वर्षांपूर्वीच्या बटू ताऱ्यांचा शोध**

युनिव्हर्सिटी ऑफ ओक्लोहोमातील सहाय्यक प्राध्यापक मुक्रेमिन किलीक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आतापर्यंतच्या सर्वांत जुन्या आणि जवळील बटू

ताऱ्यांचा (ड्वार्फ स्टार) शोध लागल्याचा दावा केला आहे. संशोधकांनी दिलेल्या माहितीनुसार हे पांढऱ्या रंगाचे बटू तारे ११ ते १२ अब्ज वर्षांपूर्वीचे असून, ते पृथ्वीपासून १०० प्रकाशवर्ष अंतरावर आहेत. महास्फोटानंतर (बिग बँग) जन्माला आलेल्या, पृथ्वीपासून सर्वांत जवळ आणि जुन्या असलेल्या ताऱ्यांपैकी हे दोन तारे असल्याचा संशोधकांचा कयास आहे.

पांढऱ्या रंगाच्या बटू ताऱ्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. त्यामुळे ते थंड होण्यासाठी अधिक काळ जावा लागतो. त्यांना थंड होण्यासाठी जेवढा कालावधी लागतो त्यावरून त्यांचे वय ठरविले जाते. त्यामुळे या दोन ताऱ्यांना थंड होण्यासाठी अब्जावधी वर्षे लागल्याने त्यांच्या वयाचे त्यावरून अनुमान काढण्यात आले आहे, अशी माहिती किलीक यांनी दिली.

सूर्यापेक्षा लहान ताऱ्यांचे ज्वलन झाल्यानंतर त्यातून पांढऱ्या बटू ताऱ्यांचा जन्म होतो. ५ अब्ज वर्षांनंतर सूर्याचे ज्वलन होऊन त्याचे रूपांतर पांढऱ्या बटू ताऱ्यात होते. त्यानंतर त्याचे बाह्य आवरण गळून पडते आणि त्यात पृथ्वीच्या आकारामध्ये अतिशय घन ताऱ्याचे अवशेष उरतात, अशी माहितीही किलीक यांनी दिली. या ताऱ्यांचा शोध वृषभ आणि सप्तर्षी तारकासमुहांमध्ये लागल्याचे किलीक यांनी स्पष्ट केले. या दोन्ही ताऱ्यांचे तापमान मोजण्यासाठी नासाच्या स्पिट्झर स्पेस टेलिस्कोपची मदत घेण्यात आली.

*** कुसुमाग्रज प्रतिष्ठान**

पुलंच्या कॉपीराइट्सवरून अलीकडेच झालेल्या वादाचा धुरळा खाली बसतो तोच आता कुसुमाग्रज प्रतिष्ठानने बुकगंगा डॉटकॉमला दिलेल्या ई-बुकच्या प्रकाशन हक्कांवरून नवा वाद सुरू झाला आहे. प्रतिष्ठानने हे हक्क आपल्याला दिल्याचा बुकगंगा डॉटकॉमचा दावा आहे. तात्यासाहेबांनी प्रकाशकांकडे दिलेल्या हक्कांमध्ये ई-बुक्सचा समावेश नव्हता, अशी भूमिका प्रतिष्ठानने घेतली आहे.

तात्यासाहेबांनी त्यांच्या हयातीतच प्रकाशन हक्क त्या त्या प्रकाशकांकडे दिले होते. शिवाय ज्या पुस्तकांचे हक्क त्यांच्याकडे होते ते त्यांच्या मृत्यूनंतर त्या त्या प्रकाशकांकडे जातील, असे म्हटले होते.

पॉप्युलर प्रकाशनाच्या संपादक अस्मिता मोहिते म्हणाल्या, आम्हाला न कळवता केलेल्या ई-बुक्समुळे आमच्या प्रकाशन हक्कांचे उल्लंघन झाले असून तसे आम्ही बुकगंगाला कळविले आहे. त्या बाबतीत प्रतिष्ठानशी बोलून हा वाद मिटवू. कारण प्रतिष्ठान आणि पॉप्युलर हे दोन्ही कुसुमाग्रजांना प्रिय होते.

बुकगंगाचे मंदार जोगळेकर म्हणाले, आम्ही प्रतिष्ठानसोबत करार केला आहे.

प्रतिष्ठानने पुस्तके आम्हाला देताना कॉपीराइट्सची काळजी घेतलेली असावी, हे आम्ही गृहीत धरले आहे. प्रतिष्ठानचे ॲड. विलास लोणारी यांच्याशी तसे स्पष्ट बोलणेही झाले होते. त्यामुळे ती पुस्तके बुकगंगाच्या संकेतस्थळावर आहेत.

### * 'संगणकयुगा'चे प्रकाशन

आमची पिढी जगाच्या खूप मागे आहे. चांगल्या जीवनमानासाठी सर्वांनी संगणक तंत्रज्ञान आत्मसात केलेच पाहिजे, नाहीतर आपण काळाच्या मागे पडू, असे मत डॉ. प्र.चिं. शेजवलकर यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी लिहिलेल्या 'संगणक युग++' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शेजवलकर यांच्या हस्ते झाले. या पुस्तकाच्या ई-आवृत्तीचे प्रकाशन वनराईचे अध्यक्ष मोहन धारिया यांच्या हस्ते झाले.

सिम्बायोसिसचे संस्थापक अध्यक्ष शां.ब. मुजुमदार, झेन्सॉर कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गणेश नटराजन, जेटकिंगचे संचालक संजय गांधी, उत्कर्ष प्रकाशनचे सु.वा.जोशी आदी उपस्थित होते.

डॉ. शिकारपूर यांनी आतापर्यंत १८ पुस्तके मराठीतून लिहिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून डॉ. शेजवलकर म्हणाले की, मराठीविषयी न्यूनगंड असल्याने मराठी ही ज्ञानभाषा आहे याची आपल्याला जाणीव नाही. जेव्हा मराठी ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा होईल, तेव्हाच महाराष्ट्र पुढे जाईल.

डॉ. मुजुमदार यांनी सांगितले की, २०३० साली आजची शिक्षणपद्धती विस्मृतीत जाईल. सध्याच्या लहान मुलांना संगणक शिकवण्याची गरज नाही. ज्याप्रमाणे माशाला जन्मतःच पोहता येते, तसेच आजच्या मुलांना जन्मतःच संगणकाचे ज्ञान असते. त्यामुळे या मुलांना शिकवण्यासाठी शिक्षकांची गरजही उरणार नाही. परंतु, केवळ शहरी भागात तंत्रज्ञानाचा प्रसार हाऊन उपयोग नाही. जोपर्यंत भारताच्या खेड्यांमध्ये संगणक पोहोचत नाही तोपर्यंत भारतात संगणक क्रांती होणार नाही

धारिया म्हणाले की, कोणत्याही देशाला पुढे जायचे असेल तर संगणकाला पर्याय नाही. हे नवे शास्त्र शिकवण्याचे काम डॉ. शिकारपूर आपल्या पुस्तकांद्वारे करीत आहेत.

डॉ. शिकारपूर यांनी सांगितले की, उद्याच्या भारताचे भविष्य दाखवणारे हे पुस्तक आहे. मोबाईल, सोशल नेटवर्किंग, विविध अत्याधुनिक उपकरणे, बायो-नॅनो टक्नॉलॉजी आदींमध्ये होणारे बदल या पुस्तकात टिपण्यात आले आहेत.

### * फर्स्ट चॉईस जर्मन भाषेला

विविध परदेशी भाषा शिकून ग्लोबल करिअर घडवण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा फर्स्ट चॉईस जर्मन भाषेला असल्याचे दिसून येत आहे. गेल्या पाच वर्षांत या ट्रेंडमध्ये फरक पडलेला नाही. सध्या पुणे विद्यापीठांतर्गत परदेशी भाषांचे शिक्षण घेणाऱ्या निम्म्या विद्यार्थ्यांचे प्राधान्य जर्मन भाषेला आहे. त्याखालोखाल गेल्या दोन वर्षांत स्पॅनिश भाषेचे महत्त्व वाढत आहे. पुणे विद्यापीठात सध्या १०८० विद्यार्थी परदेशी भाषा शिकत असून, त्यातील ५०० जर्मन भाषेची परीक्षा देणारे आहेत. परदेशी भाषा केंद्राच्या माध्यमातून जर्मन, जपानी, फ्रेंच, रशियन, स्पॅनिश या भाषांचे अभ्यासक्रम शिकवले जातात. त्यांचे एक एक वर्षाचे प्रमाणपत्र, पदविका व पदवी अभ्यासक्रम आहेत. या अभ्यासक्रमांसाठी ४ ते ५ हजार रुपये शुल्क आकारले जाते. अर्ज करणाऱ्या सुमारे १० ते १२ हजार विद्यार्थ्यांमधून ११०० विद्यार्थ्यांची निवड केली जाते. याविषयी माहिती देताना विभागप्रमुख चेतन ठकार म्हणाले, या भाषांच्या शिक्षणानंतर दुभाषी तसेच अनुवादक म्हणून कंपन्यांत सर्वात जास्त संधी असतात.

जर्मन भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन पुण्यात मॅक्सम्युलरसारख्या संस्थांमध्येही त्याचे प्रशिक्षण मिळू लागले आहे. स्पॅनिश व फ्रेंच या भाषांचेही क्लासेस सुरू आहे. मात्र विद्यापीठाच्या तुलनेत त्यांना अधिक शुल्क पडते.

### * आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील परदेशी भाषा विभागाची दुर्दशा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील परदेशी भाषा विभाग मरण पंथाला लागला आहे. ४० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या विभागाला सध्या प्राध्यापक आणि विद्यार्थी अशा दोघांचीही चणचण भासत आहे.

तत्कालीन कुलगुरू डॉ. नाथ यांनी परदेशी भाषा विभाग स्थापन केला. जर्मन, फ्रेंच, रशियन आणि चायनीज या चार भाषांचे अभ्यासक्रम चालतात. त्यात प्रमाणपत्र, पदविका आणि ॲडव्हान्स डिप्लोमा या तीन अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रत्येक अभ्यासक्रमाच्या प्रत्येकी ३२ जागा आहेत. सर्वाधिक मागणी व विद्यार्थ्यांचा ओढा फ्रेंच भाषेकडे होता. परंतु २००८ मध्ये या भाषेचे प्राध्यापक सेवानिवृत्त झाले. त्यानंतर दोनदा जाहिरात दऊनही पात्र उमेदवार न मिळाल्याने हे पद रिक्त राहिले व परिणामी २००८ पासून फ्रेंच भाषेचे वर्गही बंद पडले.

जर्मन, रशियन व चायनिज या तिन्ही भाषांच्या अभ्यासक्रमासाठी २८८ जागा आहेत, प्रत्यक्षात केवळ ८५ विद्यार्थ्यांनी यंदा या विभागात प्रवेश घेतला. परंतु सध्या डॉ. पी.व्ही. राव, प्रा. व्ही.एस.कुमार आणि विभागप्रमुख डॉ. डी. पी. मुनीश्वर

हे तीनच प्राध्यापक कार्यरत आहेत. या विभागासाठी प्राध्यापकांच्या ८ जागांपैकी पाच रिक्त आहेत. विद्यार्थ्यांच्या २०० जागा रिक्त आहेत.

*** स्मार्टफोनकडे वाढता कल; जलद इंटरनेट, ॲप्सची मोहिनी**

इंटरनेटचा जलद वापर आणि अधिकाधिक ॲप्स या कारणांमुळे स्मार्टफोनचा खप वाढला आहे, असे एरिक्सन कंझ्युमर लॅबने नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणातून आढळून आले आहे. स्मार्टफोन हा इंटरनेट वापरासाठी सर्वात चांगला पर्याय असल्याचे ४३ टक्के मोबाईलधारक म्हणतात, तर ३३ टक्के मोबाईलधारकांनी अधिकाधिक ॲप्लिकेशन्स वापरण्यासाठी स्मार्टफोनला पसंती दिली आहे. भारत, रशिया आणि ब्राझील या तीन देशांतील १५ ते ५४ वर्षे वयोगटातील आणि आठवड्यात एकदा तरी इंटरनेटचा वापर करणाऱ्या स्मार्टफोनधारकांचा या सर्वेक्षणात समावेश होता.

एखाद्या वस्तूची किंमत शोधण्यासाठी विशिष्ट ॲप्लिकेशन वापरण्याचे प्रमाण अमेरिका आणि भारतात जवळजवळ सारखेच असल्याचे एरिक्सन कंझ्युमर लॅबचे जसमितसिंग सेठी म्हणतात. एखादे ठिकाण शोधणे, त्या ठिकाणापर्यंत पोचणे, इंटरनेटवर चित्रवाणी, चित्रपट बातम्या पाहणे आणि ऑनलाइन गेम्स खेळणे यासाठी स्मार्टफोनचा सर्वाधिक वापर होतो. सर्वेक्षणातील बहुतेकांनी गेल्या सहा महिन्यांत स्मार्टफोन खरेदी केल्याचेही निष्पन्न झाले.

भारतातील स्मार्टफोन वापरकर्त्यांचा भर स्क्रीन सेव्हर, लाइव्ह वॉलपेपर, सोशल मीडिया ॲप्लिकेशन आणि गेम्स यांच्यावर असतो, तर रशियात नेव्हिगेशन, वस्तूंच्या किमतींची तुलना बारकोड स्कॅनर, भाषांतर, डिक्शनरी यांचा वापर जास्त प्रमाणात होतो.

*** आक्षेपार्ह मजकुरामुळे व्यक्तिस्वातंत्र्याला धक्का**

''सोशल मिडिया अधिकाधिक बेजबाबदार होत असून, त्यांवर नियंत्रण घालणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र सरकारने तातडीने समिती नेमावी अशी मागणी आपण केली आहे,'' अशी माहिती प्रेस कौंसिल ऑफ इंडियाचे निवृत्त न्यायमूर्ती मार्कंडेय काटजू यांनी पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यक्रमात दिली. ते म्हणाले, ''सोशल मिडियाच्या विविध संकेतस्थळांवर आज अनेकदा आक्षेपार्ह मजकूर टाकला जातो. यातून व्यक्तिस्वातंत्र्याला धक्का पोचतो तसेच जातीय दंगली होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. ही संकेतस्थळे ब्लॉक करावीत असे आपले म्हणणे नाही; मात्र ती प्रसिद्ध करीत असणाऱ्या मजकुरास निश्चितपणे चाळण लावायला हवी. या

संदर्भात दूरसंचार मंत्री कपिल सिब्बल यांच्याशी आपला पत्रव्यवहार झाला असून, त्यांनी सोशल मिडियावर नियंत्रण आणण्यासाठी कायदा आणि तंत्रज्ञान समिती स्थापन करावी, अशी सूचना आपण केली आहे. यावर शासनाने लवकरात लवकर निर्णय घेणे आवश्यक आहे.''

*** जाऊ तेथे पाहू**

कोकणातल्या नारळीच्या बागांपासून ते वऱ्हाडातल्या झणझणीत शेवभाजीपर्यंत आणि सोलापूरच्या कन्नड वळणाच्या मराठीपासून ते मुंबईच्या हिंदीच्या प्रभावाखाली असणाऱ्या मराठीपर्यंत... सांगीतिक आणि नृत्यमय आस्वाद घ्यायचा असेल, तर नलिनोत्तम पांडव निर्मित 'जाऊ तिथं पाहू' हा आविष्कार पाहा..

ही गोष्ट आहे शाहीर आणि त्याच्या पत्नीची.. फिरण्याची इच्छा असलेल्या पत्नीला शाहीर महाराष्ट्राचं दर्शन घडवतो. प्रवासादरम्यान त्यांना आलेल्या धमाल अनुभवांची  सरमिसळ म्हणजे हा नृत्यनाट्याविष्कार. जिल्हावार प्रवास होत असताना त्या ठिकाणची खासियत हा शाहीर उलगडून सांगतो. म्हणजे विदर्भातल्या ए,भो म्हणजे अरे भाऊ पासून कोकणातल्या जाखडी नृत्यापर्यंत...

लेखक हृषिकेश परांजपे यांनी ही संहिता अत्यंत प्रासंगिक आणि भाषिक विनोदांतून त्यांनी ही संहिता मनोरंजक केली आहे.

दिग्दर्शक सतीश तारे यांनी लेखकाची संहिता आपलीशी करून घेतलीय. कलाकाराच्या प्रत्येक वाक्यावर, प्रत्येक हालचालीवर सतीश तारे यांची छाप दिसून येते. नाटक रंजक होण्यासाठी म्हणून काही प्रासंगिक विनोद त्यांनी 'इम्प्रोवायझेशन' पद्धतीनं खुलवल्याचं जाणवतं.

मुख्य भूमिकेत असलेल्या त्यागराज खडिलकरनं गायन, संगीत आणि अभिनय या तिन्ही आघाड्यावर चांगली कामगिरी केलीय. इतर भूमिकांमध्ये उल्का चौधरी, गणेश इनामदार, समीर शिरवाडकर, सुवर्णा काळे, आशुतोष वाडेकर, सात्विक ठकार आदी ठीकठाक.

*** आशा भोसले यांचे आत्मचरित्र**

'नाच रे मोरा' पासून 'हुजूरे आला' पर्यंत हजारो गीतांनी रसिकांना 'खल्लास' करणाऱ्या सुरांचा 'ऋतु हिरवा' आता शब्दांतूनही बहरणार आहे. गेली सहा दशके आनंदच काय; पण दु:खही सुरेल करणाऱ्या या अवखळ सुरांच्या प्रवासाची बंदिश खुद्द आशाताईच आत्मचरित्रातून रसिकांना पेश करणार आहेत. वयाच्या ७९व्या

वर्षीही त्यांचा तजेलदार आवाज श्रोत्यांना मोहिनी घालतो. या यशापर्यंतचा त्यांचा प्रवास, गायिका म्हणून जडणघडण आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे गुपित या गोष्टी चाहत्यांसाठी नेहमी उत्सुकतेचा विषय राहिल्या आहेत. अनेकविध मुलाखंतीमधून नकलाकार म्हणून किस्से पेश करीत आशाताईंनी आपल्याकडील शब्दभांडाराची चुणूक दाखवली आहे. तेच सारे संचित आता शब्दरूपात पेश केली जाणार आहे. हिंदी, मराठी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांतून हे आत्मचरित्र निघेल. त्या स्वत: हिंदीमध्ये लिहित असून, मराठी भाषांतर सुधीर गाडगीळ करतील.

❐






## व्यंकटेश माडगूळकरांच्या ४१ पुस्तकांचे प्रकाशन

दलित साहित्यासाठी पोषक पार्श्वभूमी निर्माण करण्याचे काम माडगूळकरांच्या साहित्याने केले. दलित साहित्याचा तो 'आरंभ बिंदूच' म्हणावा लागेल. त्यांच्या या लेखनाने मराठी साहित्याचा संकुचित परीघ विस्तारला गेल्याचे मत प्रसिद्ध लेखक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.

'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे व्यंकटेश माडगूळकरांच्या ४१ पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांच्या हस्ते १८ मे रोजी बाल शिक्षण इंग्लिश मिडियम शाळेच्या सभागृहात झाले यावेळी ते बोलत होते.



''अलुते-बलुते, फिरस्ते यांना सूक्ष्मपणाने साहित्यात मांडण्याची किमया माडगूळकरांच्या लेखणीत होती. अस्सल मातीतून शोषून घेत त्यांनी या माणसांना शब्दांतून माडले. 'देवा-सटवा' सारख्या कथेतून त्यांनी दलित साहित्यासाठी पोषक वातावरण निर्माण केले. त्यांच्यामुळे मराठीत दलित साहित्याला चालना मिळाली.'' असे डॉ. गवस म्हणाले.

''घरचे दारिद्र्य, अर्धवट शिक्षण, लहानपणचे दिशाहीन आयुष्य अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वत:ला घडविण्याची किमया व्यंकटेशने साधली. त्यांच्या लेखणीतून ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडले. त्यांचे साहित्य काळाच्या ओघात सदैव टिकून राहील,'' अशी अपेक्षा मिरासदार यांनी व्यक्त केली. रस्त्यावर मैलाचे दगड रंगविता-रंगविता साहित्यात मैलाचा दगड ठरण्याची किमयाही त्यांनी साधली, अशी प्रशंसाही मिरासदार यांनी केली.

प्रसाद कुलकर्णी यांनी 'माणदेशी माणसं' आणि 'चित्रकथी' या पुस्तकांतील अभिवाचन केले. प्रज्ञा ओक यांनी माडगूळकर यांच्या आठवणी कथन केल्या. सुनील मेहता यांनी प्रास्ताविक केले. मृण्मयी भजक यांनी सूत्रसंचालन केले.

---

## 'वर्डपॉवर' बुक स्टोअर्सचा कोल्हापूरात शुभारंभ

कोल्हापूर शहर झपाट्यानं वाढत चाललं आहे, ''वर्डपॉवर'' सारखं नव्या जीवनशैलीचं पुस्तकांचं दालन या शहरात सुरू होणं म्हणजे शहराची सांस्कृतिक ओळख अधिक ठळक होणंच आहे., असे मत जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी ''वर्डपॉवर'' या फॅमिली लाईफ स्टाईल बुक स्टोअर्सच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

कोल्हापूरातील सासने ग्राऊंड समोरच्या अथर्व एम्पायर मध्ये वामन हरी पेठे ज्वेलर्सच्या शेजारी वर्डपॉवर या ग्रंथदालनाचा शुभारंभ जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, श्रीमंत छत्रपती शाहु महाराज, सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन आणि पुस्तकाच्या प्रतिमेचे विमोचन करुन अनोख्या पध्दतीने संपन्न झाले. या प्रसंगी अनिल मेहता, सुनील मेहता, बिरादर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जगभरातील उत्तमोत्तम इंग्रजी-मराठी पुस्तके या दालनात उपलब्ध आहेत. विविध विषयांची बेस्टसेलर पुस्तके एकाच दालनात उपलब्ध असलेले पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे वातानुकुलीत दालन आहे.

पुस्तकांच्या विश्वात कोणत्या घडामोडी घडत आहेत हे वर्डपॉवर मध्ये आल्यावर वाचकांच्या लक्षात येईल, ग्रंथप्रेमींनी या दालनाचा लाभ घ्यावा. श्रीमंत छत्रपती शाहु

महाराज आणि सुनीलकुमार लवटे यांनी वर्डपॉवर ला शुभेच्छा दिल्या.

वर्डपॉवरचे दालन दररोज सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत ३६५ दिवस ग्रंथप्रेमींसाठी खुले राहील, पुस्तकांबरोबरच खेळणी जगभरातील गाजलेल्या चित्रपटांच्या सीडीज् आणि स्टेशनरीही उपलब्ध आहे.





❐

**सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता**

## मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

आगामी




# नेव्हर टू रिटर्न

**सँडी रीड** /अनुवाद **सुनीता कट्टी**

२४०रु. - सभासदांना सवलतीत

एका हिरावलेल्या बालपणाची अंत:करण पिळवटून टाकणारी सत्यकथा.

समाजकल्याण खात्यानं सँडी रीडला आपल्या ताब्यात घेतल.

तेव्हा तो फक्त एक वर्षाचा होता. त्या वेळी त्याच्या आईला कल्पनाही नव्हती की, तो जन्मात परत कधी तिच्या नजरेला पडणार नाही.


'नेव्हर टू रिटर्न' ही स्कॉटलंडमधील टिंकर ह्या भटक्या जमातीत जन्मलेल्या सँडी रीड व त्याची मोठी बहीण मॅगी ह्यांची विलक्षण गोष्ट आहे. कोवळ्या वयात त्यांना त्यांच्या आई-वडलांपासून व विशिष्ट जीवनपद्धतीपासून दूर केल्यानंतर त्यांच्या आयुष्याची परवड झाली. एका हिवाळ्यातील रात्री समाजकल्याणखात्याच्या अधिकाऱ्यांनी भटक्या जमातीच्या ह्या लोकांच्या जंगलातील तंबूवर छापा घातला. त्यांच्या छाप्याचा उद्देश होता, त्यांच्या सगळ्यात लहान मुलांना आपल्या ताब्यात घेऊन त्यांना चांगले जीवन देणे. पण त्यांनी विचार केला होता तसे जास्त चांगले आयुष्य ह्या मुलांना मिळालेच नाही.

इंग्रजी मध्येही उपलब्ध

## पुस्तक परिचय

# १०-१०-१०
## जीवन बदलून टाकणारी कल्पना!

## कुठलाही निर्णय घेताना
## मार्गदर्शक ठरणारा ठोकताळा




मूळ लेखक **सुझी वेल्श** /अनुवाद **विदुला टोकेकर**

१६०रु. - सभासदांना सवलतीत

'विनिंग'या गाजलेल्या पुस्तकाच्या अमेरिकन लेखिका सुझी वेल्श यांच्या अभिनव चिंतनाचे प्रगल्भ दर्शन दहा-दहा-दहा या पुस्तकात घडते. या पुस्तकाच्या शीर्षकाखालीच 'जीवन बदलून टाकणारी कल्पना' असे उपशीर्षक आहे. ते देखील खूपच अर्थपूर्ण आहे.

आपल्याला आयुष्यात क्षणोक्षणी लहानमोठे निर्णय घ्यावे लागतात. भावनेच्या, परिस्थितीच्या, अडीअडचणीच्या, दबावाच्या किंवा अन्य कुठल्या तरी विचाराच्या आहारी जाऊन हे निर्णय आपण घेतो. त्यानंतर त्या निर्णयाचे जे परिणाम सोसावे लागतात तेव्हा आपल्याला कधी कधी पश्चात्ताप होतो. आपण चुकीचा निर्णय घेतला अशी खंत वाटत राहते. निर्णय घेताना आपण सांगोपांग विचार केला नाही, परिणामांचा अंदाज आपल्याला आला नाही अशी जाणीव होते. तात्कालिक मोहाला वा वरकरणी फायद्याला बळी पडून आपण स्वतःचेच दीर्घकालीन नुकसान करून घेतो, चुकीचा मार्ग पत्करला याबद्दल स्वतःलाच दोष देत बसतो. आपले करीयर, कुटुंब, व्यवसाय या सर्वच बाबतीत मग असमाधान वाटत राहते. योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यात आपण कमी पडतो अशी टोचणी अनेकदा अनेक व्यक्तींना कायमची त्रस्त करीत राहते.

सुझी वेल्शचे दहा-दहा-दहा हे पुस्तक योग्य निर्णय कसा घ्यावा याबाबत नेमके मार्गदर्शन करणारे आहे, त्यामुळे त्याची ओळख करून घेणे खूपच फायदेशीर ठरेल.

तुम्ही कोणत्याही वयोगटातील असा, कुठल्याही व्यवसायात किंवा संस्थेत कार्यरत असा, आयुष्यातील गुंतागुंतीचे प्रश्न सरळ सोप्या पद्धतीने सोडवण्यासाठी एक सुटसुटीत मंत्र किंवा पासवर्ड हे पुस्तक देते. या पुस्तकात दिलेल्या सूत्राने तुम्हाला नेमका निर्णय घेणे सोपे जाईल.

१०-१०-१० म्हणजे १० मिनिटे, १० महिने, १० वर्षे. म्हणजे आत्ता, नजिकच्या काळात किंवा दीर्घ कालखंडात तुम्हाला कुठलाही प्रश्न पडला तर १०-१०-१० हे सूत्र वापरायचे.

म्हणजे काय करायचे?

त्या प्रश्नाची जी संभाव्य उत्तरे आहेत, त्यातील प्रत्येक पर्याय घऊन त्याचा स्वीकार केला तर प्रथम पुढील १० मिनिटात म्हणजेच तात्कालिक त्याचा काय परिणाम आपल्यावर होईल याचा अंदाज घेणे.

नंतर पुढच्या १० महिन्यात त्या पर्यायाचा कसा प्रभाव जाणवेल हे ठरवणे

आणि पुढच्या १० वर्षांत या पर्यायाने आपल्या आयुष्यातल्या त्या टप्प्याचे

काय चित्र दिसेल याची कल्पना करणे.

कोणताही निर्णय घेताना त्याचे त्या क्षणी, नजिकच्या काही दिवसात आणि भविष्यात काय परिणाम दिसून येतील, ते आपल्याला सुखावह, प्रगतिपर ठरतील की हानिकारक, दुःखकारक ठरतील? तुमच्या स्वप्नांची, उद्दिष्टांची, गरजांची, श्रद्धांची पूर्तता करतील की ती उद्ध्वस्त करतील असा प्रश्न विचारून बघा.

प्रत्येक १०-१०-१० प्रक्रिया ही एका प्रश्नाने सुरू होते

तुमची समस्या, द्विधा वृत्ती किंवा आणीबाणी प्रश्नाच्या रूपात मांडून ही प्रक्रिया सुरू होते.

१०-१०-१० साठी नेमका प्रश्न आवश्यक असतो.

नेमका प्रश्न विचारल्यावर पुढची पायरी म्हणजे माहितीची जमवाजमव. ही माहिती मनातल्या मनात, संगणकावर, टिपणाच्या रूपात, चर्चेद्वारे, मित्राशी संवाद साधून मिळवता येते. ती माहिती तुमच्या अंतर्मनातील मूल्यांशी, श्रद्धा-उद्दिष्ट-स्वप्न-गरजांशी ताडून बघून कोणता निर्णय वा पर्याय आपल्या आयुष्यासाठी, साफल्यासाठी सर्वाधिक उपयुक्त व हितकारक ठरेल याचे उत्तर शोधणे.

१०-१०-१० ही कल्पना वेगवेगळ्या व्यक्तींना, वेगवेगळ्या पेचप्रसंगांच्या आणि वेगवेगळ्या व्यवसायांच्या संदर्भात कशी उपयुक्त ठरली याची पंचवीस तीस उदाहरणे या पुस्तकात देण्यात आली आहेत.

ग्वेन ही शिकागो मधील पूर्णवेळ गृहिणी. तीन अपत्यांची आई, तरीही मुलांसाठी आया ठेवून स्वतः नोकरी करणारी आणि चांगली आर्थिक प्राप्ती असणारी. एकदा सव्वा वर्षाचा तिचा मुलगा तिला ओळख न दाखवता ती जवळ जाताच भोकाड पसरतो तेव्हा अपराध भावनेने ती उन्मळून पडते. काम की मातृत्व असा प्रश्न तिला पडतो. ती नोकरीचा राजीनामा देते. मुलगा जरा मोठा होईपर्यंत मी नोकरीवर येणार नाही असे बॉसला सांगते. ग्लेन मुलामध्ये गुंतत जाते. त्याचे शिक्षण, शाळा, मित्र, गृहपाठ, खेळ, रंजन, कथाकथन, छंद, खाणेपिणे, व्यक्तिमत्त्व विकास याकडे लक्ष देते. वर्ष कसे जाते ते कळत नाही. बॉसचे ई-मेलवरून, तू कधी कामावर परत येतेस? आम्हाला तुझी गरज आहे, असे निरोप येत असतात. आईपण-गृहिणीपण की औषध विक्री प्रतिनिधीचे काम यात तिचे मन दोलायमान होत राहते. त्यावेळी तिची बहीण १०-१०-१० ची कल्पना तिला सांगते आणि मानसिक द्विधावस्थेत या कल्पनेचा वापर करायला सुचवते. आपण पूर्णवेळ आई असायचे की नाही याचा सोक्षमोक्ष लावायला हवा

असा विचार करीत ती स्वयंपाक घरात बसून १०-१०-१० प्रक्रियेवर लक्ष केंद्रीत करते.

पहिली अल्पकालीन प्रतिक्रिया भयंकर असते. आपण केवळ डायफर्सचे ढिगारे उपसत वेळ घालवत आहोत, आपल्या मेंदूला काहीही खाद्य नाही, दैनंदिन जीवन कंटाळवाणे आणि चाकोरीबद्ध आहे, मुलेच केंद्रस्थानी आहेत असे लक्षात येते.

दहा वर्षांच्या दीर्घकालीन चित्रात तिला दिसते की मुले मोठी होऊन शिक्षण नोकरीसाठी बाहेर पडली आहेत. आपले वयही वाढलेले आहे. नोकरी व्यवसाय नसल्याने आपण वेळ फालतू घालवत आहोत. करीयर नाही. मन अस्वस्थ आहे.

१० महिन्यांचा मधला टप्पा.त्यावर विचार करताना तिला जाणवते, आपण पहिल्या व शेवटच्या काळाला महत्त्व देतोय. मुलांच्या विकासातल्या प्रक्रियेत, गृहिणी-आईपणाच्या भूमिकेला मध्यवर्ती मानतो आहोत. मुलांच्या विकासाला प्राधान्य देऊन आपण एक स्वप्न सोडून देत आहोत आणि दुसऱ्या वास्तवात रमतो आहोत. आपली निवड मूल्याधिष्ठित आहे. तेव्हा तिची द्विधा अवस्था संपते. विशिष्ट उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने आपली वाटचाल चालू आहे या जाणिवेने तिला मनःशांती वाटते.

**१०-१०-१० प्रक्रियेच्या दरम्यान अनेक मूल्ये, पर्याय, उद्दिष्टे, भय आशंका, स्वप्ने यांचा सामना करावा लागतो, मिळणारी उत्तरे आश्चर्यकारक, धक्कादायक, आव्हानात्मक असू शकतात. आपल्या श्रद्धा विश्वासांचा, प्राधान्यक्रमाचा, जीवनविषयक आंतरिक अपेक्षांचा शोध लागला की आयुष्य अर्थपूर्ण आणि आनंददायक वाटू लागते.**

ग्वेनसारखी अनेक उदाहरणे या पुस्तकात आलेली आहेत.

राचेल ही चटपटीत सक्षम प्रशासन सहायक. वय ३६.मूर्तिमंत सकारात्मक ऊर्जा. लाल केसांच्या देखण्या कायले या कंत्राटदाराच्या परिचयाने, राजकारणात उतरण्याच्या महत्त्वाकांक्षेने ती त्याच्याकडे आकृष्ट होते. कायले आपल्या कॅन्सरग्रस्त आईच्या सेवेत व्यग्र. त्यामुळे त्याला कुठल्याही स्त्रीशी शारीरिक जवळीक साधता येत नाही. राचेलशी त्याचे संबंध प्लेटॉनिक पातळीवरचे होते. कायलेची आई मृत्यू पावते. त्याचे प्रेम एप्रिल नावाच्या मुलीवर आहे असे त्याचा एक मित्र राचेलला सांगतो. कायलेला आयरिश-कॅथलिक मुलीशीच लग्न करायचे आहे असेही तो मित्र तिला स्पष्ट सांगतो. राचेल वेगळ्या पंथाची असते. ती १०-१०-१० प्रक्रियेतून विचार करते. या रिलेशनशिपमधून बाहेर पडावे का असा प्रश्न

तिला पडतो. १० मिनिटे व १० महिने यांच्या चौकटीत तिला 'नाही' हे उत्तर सुचते पण १० वर्षांच्या चौकटीने तिचे डोळे उघडतात. कायले हा देखणा, कर्तबगार आहे. पण स्वतःत मशगुल आहे. त्याचा एक भाग कायम तिच्या कक्षेबाहेर राहिला असता. दूरच्या भविष्याचा वेध घेताना आपल्या कृतिहीनतेचे अनिष्ट परिणाम तिला दिसू लागले. कायले मध्ये गुंतून भावी काळ सुखदायक होणार नाही असे जाणवले. तिला आपले स्वत्व गवसले. तुमच्याच स्वतःच्या भावनांपासून तुम्हाला सुरक्षित ठेवण्याचा मार्ग म्हणून, तुमचा आत्मसन्मान टिकवण्याचा मार्ग म्हणून ती कायले प्रकरणाकडे आता बघते. ती आपल्या बँकेच्या प्रशासकीय कामात उच्चपद गाठते.

१०-१०-१० प्रक्रिया आपल्या पर्यायांचे वेगवेळ्या काल-चौकटीमध्ये विश्लेषण करून आपल्या मेंदूतील खोलवर रुजलेल्या पक्षपातांना, पूर्वग्रहांना, ठाम आग्रहांना आव्हान देते. आपण काय ठरवतो, का ठरवतो, कशामुळे ठरवतो याचे विश्लेषण करून, आपल्या मेंदूतील खोलवर रुजलेल्या पक्षपातांना, पूर्वग्रहांना, ठाम आग्रहांना आव्हान देते. आपण काय ठरवतो, का ठरवतो, कशामुळे ठरवतो याचे विश्लेषण, विच्छेदन करायला भाग पाडते. ही प्रक्रिया आधी विचार, मग कृती करायची स्फूर्ती देते. अंतःप्रेरणेला ती हद्दपार करते असे नाही; पण आपण जे बनू शकतो त्याच्याशी सह-अनुभव घ्यायला भाग पाडते.

१०-१०-१० प्रक्रिया ही केवळ निर्णयाचे पर्याय सुचविणारी व वर आणणारी प्रक्रिया नसावी. ती मूल्याधिष्ठित असावी असा सुझी वेल्शचा आग्रह आहे.

प्रत्येकाची मूल्ये अतिशय वेगळी आणि विशेष असतात.

सुझी वेल्श स्वतःचे उदाहरण देते.

परिश्रम आणि सुरक्षितता, त्याग आणि व्यासंग यांचे फळ चांगले मिळते यावर श्रद्धा. शिक्षण, पदवी, यश, जीवन चांगल्या रीतीने जगणे, वैभव, भौतिक सुखसमृद्धी मिळवणे, उत्तम जोडीदार गाठून लग्न करणे, प्रपंच, मुलेबाळे, त्यांचे संगोपन.. ही सारी पारंपरिक मूल्यप्रणाली तिच्या जीवनाला दिशा प्रेरणा देणारी होती. संडे स्कूलमध्ये अध्यापनाचे काम, शेजाऱ्यापाजाऱ्यांसाठी पार्ट्यांचे आयोजन, आपल्या आईवडिलांना नियमित भेटणे, वेळेचे नियोजन, दैनंदिन कामांचे वेळापत्रक, मित्रमैत्रिणींच्या भेटीगाठी,

... सगळे काही व्यवस्थित, आपल्या स्वयंनिर्धारित चौकटीतले जीवन.

मायामी मध्ये पत्रकारिता केल्यावर असोसिएटेड प्रेस मध्ये तिला जॉब

मिळतो. बिझनेस स्कूलमध्ये अध्ययन करून व्यवस्थापन सल्लागार होते. हार्वर्ड बिझनेस रिव्ह्यूची संपादक होते. दरम्यान लग्न होते. लग्नानंतरच्या सहा वर्षात चार मुले होतात. हार्वर्ड बिझिनेस रिव्ह्यूतर्फे तिला हवाईला विमा अधिकाऱ्यांपुढे व्यवस्थापन शास्त्रावर व्याख्याने देण्यासाठी पाठवण्यात येते. त्यावेळी आपल्या पाच व सहा वर्षाच्या दोन छोट्या मुलांना बरोबर नेणे भाग पडते. ती त्या मुलांना सांगते, ''आपण एका छान सफरीवर जाणार आहोत. तुमच्या मम्माला तेथे काही ग्राहकांबरोबर काम करावे लागेल. तुम्ही नीट राहायचे.'' हवाईला गेल्यावर एका मुलाला सनस्ट्रोक होतो. तो रडत राहतो. तिला त्याच्यावर बर्फाच्या पिशव्या ठेवत बसावे लागते. व्याख्यानाला ती उशिरा पोचते. व्याख्यान देते तर तिची मुले त्या हॉलच्या मागच्या रांगेत तिला दिसतात. ती बेबीसीटरला चुकवून तेथे आली असणार. सुझी आपले भाषण गुंडाळून त्यांच्याकडे जाते. मुले तिला बिलगतात. प्रेक्षक-श्रोते तिच्याकडे डोळे विस्फारून बघत राहतात. तिला गलबलून येते. ''नोकरी करणाऱ्या आया - तुम्ही कसं काय करता हे सगळं?'' कोणीतरी खडूसपणे म्हणतो, ''तुझा नवरा फारच सोशिक असला पाहिजे.''

''या वेडेपणाचा शेवट करायला पाहिजे.'' एक्केचाळीस वर्षाच्या सुझीला जाणवते.

त्याक्षणी ती अशा एका टप्प्यावर असते की आयुष्यात बदल होणे क्रमप्राप्त ठरते. तो हवाई दौरा तिला नवी जाणीव देतो. स्वत:चा पुनर्शोध घेण्याची प्रेरणा देतो.

ती घटस्फोट घेते.

नंतर तीन वर्षांनी पुन्हा लग्न करते. ''आयुष्यात आत्तापर्यंत केलेली सर्वात चांगली कृती होती ती'' असे सुझी म्हणते.

त्याच सुमाराला दहा-दहा-दहा ची संकल्पना तिच्या डोक्यात येते. ती कल्पना तिला जीवरक्षक जीवनरेखा देते.

ती संकल्पना तिच्या जीवनाला कलाटणी देते.

ही कल्पनाच ती वेगवेगळ्या व्यक्तींना, वेगवेगळ्या समस्यांच्या संदर्भात वापरण्यास प्रवृत्त करते.


ती अनेकांना दिशा दाखवते. त्यांची घुसमट थांबवते.

तुमच्याही जीवनाला कदाचित ती नवा प्रकाश, नवी दृष्टी देऊ शकेल ❐




# आय एम ए टॅक्सी

## बोलिव्हियातील कोकेनच्या तस्करीच्या जाळ्यात सापडलेल्या अबोध, निरागस कुमारांची होणारी ससेहोलपट




मूळ लेखक **डेबोरा एलिस** /अनुवाद **मेघना ढोके**

१२०रु. - सभासदांना सवलतीत

अफगाणिस्तानातील तालीबानी राजवटीतील दहशतवादी वातावरणाची, अमानुष क्रौर्याची पार्श्वभूमी असलेली 'द ब्रेडविनर' ही कादंबरी मराठी वाचकांना अराजकाच्या जनजीवनावर होणाऱ्या भीषण परिणामांची झलक दाखवणारी ठरली. एका मुलाच्या दृष्टिकोनातून ती सांगण्यात आल्याने आपल्या वात्सल्य भावनेला ती साद घालणारी ठरली. तिची लेखिका म्हणून डेबोरा एलीस हे नावही मनावर ठसले गेले. परवाना, शौझिया या 'दि ब्रेडविनर' च्याच मालिकेतील कादंबऱ्यांचेही चांगले स्वागत झाले.

दहशतवादी राजवटीतल्या अराजकाच्या आणि सत्तासंघर्षाच्या उलथापालथीत घराला मुकलेल्या, पोरक्या झालेल्या मुलामुलींचे बालपण हिरावून घेतले जाते आणि मिळेल ते काम करून प्रपंचाला हातभार लावावा लागतो. डेबोरा एलीसने अशा अविकसित, युद्ध वा अंतर्गत कलह असणाऱ्या, जुलमी राजवटींना भेट देऊन तेथील मुलांना ज्या खडतर परिस्थितीत जगावे लागते त्याचा विशेष अभ्यास करून त्यांचे अनुभव कादंबरिकांच्या आकृतिबंधात पेश केले आहेत. जगातील वेगवेगळ्या युद्धग्रस्त देशांना शांतता मोहिमेच्या माध्यमातून भेटी देऊन तेथील मुलामुलींचे बालपण कसे हिरावून घेतले जाते हे दाखवणे हाच तिच्या लेखनाचा मूळ स्रोत आणि केंद्रबिंदू आहे.

द ब्रेडविनर, परवाना, शौझिया या तिच्या पुस्तकांनी या दृष्टीने जगभरातील संवेदनशील पालकांचे लक्ष या निरागस, अबोल मुलामुलींच्या विविध समस्यांकडे वेधण्याचे काम प्रभावी रीतीने केले आहे. त्यामुळे तिला आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी, मान्यता आणि पुरस्कार मिळाले आहेत. तिच्या पुस्तकांचे अनुवाद अनेक भाषांमध्ये झालेले आहेत. त्यांच्या रॉयल्टीपोटी तिला लाखो डॉलर्सची कमाई होते आणि त्या कमाईचा मोठा भाग ती स्ट्रीट कीड्स् इंटरनॅशनल आणि वुमन फॉर वुमन या संस्थांना देते. अफगाणिस्तानच्या पार्श्वभूमीवरच्या लेखनातून बरीच प्राप्ती झाल्याने अफगाणिस्तानातून पाकिस्तानमध्ये स्थलांतरीत झालेल्या आणि विस्थापित म्हणून हलाखीचे व कष्टाचे जिणे जगणाऱ्या मुलींच्या शिक्षणासाठी वुमन फॉर वुमन ही संस्था काम करते.

स्वीडनने डेबोरा एलीसला पीटर पॅन पुरस्कार देऊन तिच्या कार्याचा गौरव केला. कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीने मिडल ईस्ट बुक अॅवॉर्ड देऊन मध्यपूर्वेतील उत्कृष्ट लेखन म्हणून तिच्या पुस्तकांची दखल घेतली. शांतता प्रस्थापनेच्या क्षेत्रातील तिच्या प्रयत्नांची नोंद घेणारे द जेन अॅडम्स पुरस्कार, विकी मेटकॉफ पुरस्कार यामुळेही तिच्या कार्याचे आंतरराष्ट्रीय परिमाण स्पष्ट झाले.

डेबोरा ओन्टारिया मध्ये राहते. परंतु पत्रकार म्हणून तिचा स्वतंत्र संचार असतो. जेथे जेथे युद्धसदृश किंवा यादवी हिंसाचार चालू आहे तेथे तेथे ती जाते. प्राण संकटात घालते आणि तेथील घटनांचा आँखो देखा हाल आपल्या वर्तमानपत्रातून

जगभरच्या वाचकवर्गापर्यंत पोचवते. कॉन्फ्लिक्ट रिपोर्टिंग ही तिची खासियत आहे.

दक्षिण अमेरिकेतील बोलिव्हिया हा देश आज सर्वात दरिद्री देशांमध्ये गणला जातो. ॲमेझॉन खोऱ्यातील घनदाट पर्जन्यवनांचा हा देश चोहों बाजूनी वेगवेगळ्या देशांच्या सीमांनी वेढलेला म्हणजे लँड लॉक्ड देश आहे. त्याला समुद्रकिनारा नाही. आयातनिर्यातीसाठी इतर देशांच्या हद्दींवरच त्याला अवलंबून रहावे लागते. हजारो वर्षांपासून या प्रदेशात मानवी संस्कृती भरभराटलेली होती आणि 'इन्का' संस्कृतीचा प्रभाव दाखवणारे, प्रगत विज्ञानाची त्या लोकांना असणारी माहिती सिद्ध करणारे पुरावे आजही तेथे सापडतात. स्पॅनिश लोकांनी सोळाव्या सतकात येथील चांदीच्या खाणींचा शोध लावून ती चांदी खाणीतून काढण्यासाठी स्थानिक आदिवासींना कामाला लावले, परंतु त्यांची संख्या पर्याप्त नसल्याने आफ्रिकेतून गुलामांची आयात करून त्यांच्याकडून चांदीचे उत्पादन चालवले. या खाणी आजही चालू आहेत, त्यात काम करण्यासाठी तेथील मुलांचाही वापर केला जातो. या देशात 'कोक'ची पाने खाल्ल्यावर तेथील खाणकामगारांना शारीरिक कष्टांची, वेदनांची जाणीव होत नाही. ते दीर्घकाळ काम करीत राहतात. हे लक्षात आल्यावर तेथील खाणमालकांनी कामगारांना पगाराबरोबर कोकची पाने देण्याचाही पायंडा पाडला. कोकची तेथील लोकांना सवय लावली.

या कोकच्या पानांपासून कोकेन बनवण्याचे तंत्र जर्मन शास्त्रज्ञ अल्बर्ट निमेन याने विकसित केले (१८६०). कोकेन हे उत्तेजक, वेदनाशामक द्रव्य म्हणून सर्रास वापरले जाऊ लागले. मादक द्रव्य म्हणून त्याचा वापर होऊ लागला. त्याची सवय ही व्यसनाचे रूप धारण करू लागली. कोकेनची किंमत वाढू लागली. कोकेनची चटक लागली की माणसे तासन तास त्याच्या नशेत चूर राहू लागली. कामधंदा करायचे टाळू लागली. त्याचे हे दुष्परिणाम बघून युरोपियन मिशनऱ्यांनी त्यावर बंदी आणावी, त्याचे सेवन धर्मबाह्य कृत्य असल्याचे जाहीर करावे म्हणून चळवळ आरंभली. १९१४ मध्ये अमेरिकन संसदेत कोकेनवर बंदी घालण्याचा ठराव पास करण्यात आला. तरी कोकेनचा खप वाढतच राहिला. बंदीमुळे कोकेनची चोरटी वाहतूक - तस्करी होऊ लागली. त्याची किंमत वाढू लागली. १९६०-७० च्या काळात अमेरिकेतील आणि युरोपमधील बीट जनरेशनमध्ये अफू, चरस, गांजा, कोकेन, एलएसडी वगैरेंचा भयंकर वापर होऊ लागला.

१९६८ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी या मादक पदार्थांचा प्रसार रोखण्यासाठी त्या विरुद्ध युद्ध पुकारले. कोकेनचे उत्पादन थांबावे म्हणून कोकची झाडे आणि पाने नष्ट करण्यासाठी मोहीम सुरू केली. बोलिव्हियातले कोकचे पीक सैन्य पाठवून उखडून काढले. दहा वर्षे ही मोहीम राबवूनही कोकेनचे उत्पादन थांबले नाही. अमेरिकेत चोरट्या मार्गाने ते येतच राहिले. अफगाणिस्तान,

पाकिस्तान वगैरे देशांत गांजा, अफू, चरस वगैरेचे उत्पादन थांबवण्याचा प्रयत्न झाला. पण त्यांची तस्करी वाढतच राहिली. एक किलोला एक कोट रुपये यासारखे भरमसाठ दर झाले. अफगाणिस्तानातल्या दहशतवाद्यांना या मादक द्रव्यांच्या तस्करीतून अब्जावधी डॉलर्स मिळू लागले. त्याचा वापर शस्त्रास्त्रांची खरेदी आणि दहशतवादी कृत्ये यांच्यासाठी होऊ लागला. मादक पदार्थांचे उत्पादन आणि तस्करी हा फंड रेझिंगचा अमोघ व सुलभ मार्ग म्हणून अतिरेक्यांना प्रिय झाला.

बोलिव्हियातील कोकउत्पादक शेतकऱ्यांच्या कमाईचे साधन गेल्याने त्यांची उपासमार होऊ लागली. त्यांनी एकत्र येऊन लढाईचे रणशिंग फुंकले. इ.स. २००५ मध्ये इव्हो मोरलेसा या कोक उत्पादक शेतकऱ्याला बोलिव्हियाचे राष्ट्राध्यक्ष म्हणून स्थानापन्न करण्यात आले. तो बोलिव्हियातील पहिलाच स्थानिक म्हणजे मूलनिवासी अध्यक्ष ठरला. कोकचे पीक घेण्याचा मूलनिवासी लोकांचा हक्क अबाधित रहावा म्हणून कोकॅलर्सची चळवळ सुरू झाली. कोकच्या पानांचा पर्यायी वापर करण्यासाठी संशोधन करावे, स्थानिक लोकांच्या जीवनात असलेले कोकचे स्थान आणि पावित्र्य मान्य करावे असा या चळवळीचा जाहीरनामा होता.

कोकचे उत्पादन अजूनही चालूच आहे. पण अधिकृतरीत्या कोकचे पीक काढण्यावर बंदी आहे. त्यामुळे चोरून कोकची झाडे लावण्यात येतात. कोकच्या पानांपासून कोकेन तयार करून त्याची चोरट्या मार्गाने वाहतूक करण्यात येते. त्यासाठी लहान मुलांचा आणि स्त्रियांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. कोकेनची तस्करी करण्यासाठी अल्पावधीत भरपूर पैसा मिळतो. त्यामुळे अनेक लोक जीवावर उदार होऊन हा धोका पत्करत असतात.

डेबोरा एलीसने कोकेन तस्करीच्याच पार्श्वभूमीवर 'आय एम ए टॅक्सी' ही कहाणी सांगितली आहे. तीही दिएगो या बारा वर्षांच्या मुलाला मध्यवर्ती ठेवून.

दिएगोच्या आईवडिलांना कोकेनच्या तस्करीच्या आरोपाखाली न्यायालयाने सोळा वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली. त्यांना वेगवेगळ्या तुरुंगात ठेवले. आई बरोबर आठ वर्षांचा दिएगो असतो. नंतर त्याला धाकटी बहीण कोरीना मिळते. या मुलांनाही तुरुंगात राहणे भाग पडते. तुरुंगातून दिएगोला हवे तेव्हा बाहेर येण्याजाण्याची मुभा असते. त्याची आई लोकरीचे कपडे तयार करून विकत असे. त्या कमाईतून कोठडीचे भाडे आणि खाण्यापिण्याचा खर्च भागवावा लागे. दिएगोलाही काहीतरी कामधंदा करणे भाग होते. तुरुंगात त्याला फुकट काही मिळत नव्हते. दंगा केला, बेशिस्त वागले तर तुरुंगाच्या शिस्तपालन समितीसमोर उभे राहावे लागे. ती समिती करील तो दंड भरावा लागे.

दिएगो तुरुंगातील स्त्रियांची छोटामोठी कामे करू लागतो. निरोप पोचवणे, पत्रे

पोस्टात टाकणे, वस्तू पोचवणे, फळे किंवा ब्रेड वगैरे विकत आणून देणे त्याबद्दल त्याला त्या स्त्रिया काही पैसे देत. त्यातून तो खाऊ, पेस्ट्री वगैरे घेई.

आपल्या या कामाचे स्वरूप सांगताना तो म्हणे, ''आय एम ए टॅक्सी. टॅक्सीने जसे कुठेही जलद जाता येते, तसा मी माझ्या दोन पायांनी कुठेही जातो, कुणाचीही कामे करतो. चार पैसे मिळवतो.''

तुरुंगाच्या पहारेकऱ्यांनाही तो अभिमानाने सांगतो. ''आय एम ए टॅक्सी. मी लोकांची कामे करतो. मला हवे तेव्हा बाहेर जाण्याची मुभा द्या.'' काही पहारेकरी त्याचे कौतुक करतात. त्याला मोकळीक देतात.

गावातली गुंड मुलांची टोळकी कधी त्याला त्रास देतात.

जगण्याचे, संघर्षाचे, स्वरक्षणाचे एकेक धडे तो आत्मसात करत राहतो. पण संघर्ष, समस्या असतातच. एके दिवशी तुरुंगातील शिस्तपालन समितीच्या बैठकीत दिएगोला सांगण्यात येते, ''तू आता लहान नाहीस. तुला आपल्या जबाबदारीची जाणीव नाही. तू खेळत राहतोस... तुला आता टॅक्सी म्हणून काम करता येणार नाही. तुझ्या वर्तनात सुधारणा झाली अशी आमची खात्री पटेपर्यंत तुला काम करायला मनाई करत आहोत.''

टॅक्सी म्हणून काम गेल्यावर दिएगोला तुरुंगाबाहेर जाणे शक्य होणार नव्हते. फक्त शाळेत जाण्यासाठी बाहेर ठराविक वेळी जाऊन शाळा सुटल्यावर लगेच परतावे लागणार होते.

त्याचा मित्र मॅन्डो त्याला शाळेबाहेर भेटून सांगतो, ''आपण टॅक्सी म्हणून काम करून वर्षभरात जे पैसे मिळवतो, त्यापेक्षा जास्त दोन आठवड्यात मिळवू शकू असा मार्ग मला ठाऊक आहे.''

''स्मगलिंगचं काम तर नाही ना?''

''नाही, फक्त निरोप पोचवण्याचे काम करायचे. ती फार बडी माणसे आहेत. निरोप पोचवून पैसे घ्यायचे एवढेच काम.''

''आईबाबांचं काय? ते काय म्हणतील?''

''ते तुरुंगात आहेत. ते काय म्हणणार?.... हे बघ. चर्चा नको. तू येणार की नाही ते ठरव. तू यावेस असे मला वाटते.''

मॅन्डोच्या आग्रहाला दिएगो बळी पडतो.

तुरुंगातून तो शाळेसाठी बाहेर पडण्यापूर्वी आईला एक चिठ्ठी लिहून ठेवतो.

''मी दोन आठवड्यांसाठी बाबांकडे राहण्यासाठी जात आहे.''

दुसऱ्या दिवशी मॅन्डो आणि दिएगो हे पालो आणि रॉक या दोघांबरोबर

ट्रकमधून गावाबाहेर पडतात.

रॉबर्टो, ज्यलिओ, डॅमिंगो ही भावंडे ही ट्रकमध्ये असतात. ते तिघे तरुण सारखे नाकाने हुंगत नशा करत होते. कोकेनच्या भट्टीत काम करण्यासाठी त्यांना दूर जंगलात नेण्यात येते. त्यांना रात्रंदिवस वेठीला धरून राबवण्यात येते.

दोनशे किलो कोकची पाने रगडल्यावर एक किलो पेस्ट तयार होते. अडीच किलो पेस्ट पासून एक किलो कोकेन तयार होते. ही मुले पाचशे किलो वजनाची पाने पाठीवर घेऊन जंगलात त्या कँपवर जातात.

या कँपवर अनेक लोक कोकच्या भट्टीवर काम करीत होते.

दिएगोला एक किडा चावतो. तो कळवळू लागतो.

एक अमेरिकन ग्रिंगो त्याच्या दंडावर बारीक वार करून रक्त वाहू देतो. रक्तातून तो किडा बाहेर पडल्यावर जखमेवर बँडेज बांधतो. ''हे जंगल आहे. येथे जंगलाचे नियम चालतात.'' हा अमेरिकन स्मिथ दिएगोला मदत करतो. मायेने वागवतो. त्याला खाऊपिऊ घालतो.

स्मिथ त्याला सांगतो, ''पानं तुडवायला येणारी मुलं बथ्थड असतात. तू मला वेगळा वाटलास. हुशार आहेस. माझा तुला एक सल्ला आहे. ड्रग्ज ही विकण्याची गोष्ट आहे. आपण ड्रग्ज घेऊन आपला मेंदू सडवायचा नाही. तू माझ्याबरोबर अमेरिकेत चल. तिथे ड्रग्ज विकून खूप पैसे मिळव. इथे राहू नकोस. आईवडिलांकडे जाऊन तुरुंगात वेळ काढू नकोस.''

स्मिथ त्याला हेलिकॉप्टरमध्ये खेचून घेतो. ''मी देव नाही. पण देवापेक्षा कमीही नाही. माझ्याबरोबर चल. तुझं नशीब पालटवून टाकीन, एक दिवस तूही असाच स्वत:च्या मालकीच्या हेलिकॉप्टरने फिरशील. विमानही घेऊ शकशील.''

हेलिकॉप्टर एका बिल्डिंगसमोर थांबते. ''हे पार्सल सांभाळा'' म्हणून स्मिथ तेथील लोकांच्या हवाली दिएगोला सोपवतो.

दिएगो तिथून पळण्याची संधी साधतो. त्याचा पाठलाग होतो. गोळ्या सुटतात.

स्मिथ दलदलीत फसतो. दिएगो त्याला सोडून धावत राहतो.


दिएगो एका शेतात पोचतो. तेथील घरात त्याचे स्वागत होते. मिस्टर रिकार्डो त्याची चौकशी करतात. त्याला स्ट्यू खाऊ घालतात. बिछान्यावर झोपवतात. तो शांत झोपतो. भूतकाळ मागे सुटला होता. भविष्य नावाची गोष्टच नव्हती.

कोकेनच्या तस्करीतले हे अनुभव - बोलिव्हियातील वास्तवाचे एक भेदक दर्शन घडवतात. दिएगोसारख्या निष्पाप, निरागस मुलांचा होणारा छळ आणि पोटासाठी काहीही करणाऱ्या कुटुंबाची होणारी ससेहोलपट बघून वाचक सुन्न होतात. ❒




# जाईची सुगंधी फुले

मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाशी समांतर व समकक्ष असणारे,
महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरेल असे प्रातिनिधिक आत्मकथन.




लेखक **किसन दगडू शिंदे**

५००रु. - सभासदांना सवलतीत

मराठी साहित्याच्या आणि सामाजिक जाणीवेच्या कक्षा रुंदावण्याचे काम गेल्या काही दशकात दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी आत्मकथनांनी केले. मराठी मध्यमवर्गीय मनोधारणेला त्यांनी मोठा हादरा दिला. पुढे तोच तो पणा आल्याने त्याचा प्रभाव मंदावत गेला. त्याचप्रमाणे राखीव जागांचा फायदा मिळाल्याने, महाराष्ट्र राज्य पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षा मराठीत देण्याची सोय झाल्याने दलित, ग्रामीण तरुणांना शिक्षणाच्या, नोकरीच्या आणि प्रशासकीय उच्च पदाच्या संधी उपलब्ध होत गेल्या. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली. त्यांचे जीवनमान मध्यमवर्गीय सुखसुविधांनी समृद्ध होत गेले. क्रीमी लेयरमध्ये असूनही राखीव फायदे पुढच्या पिढीला मिळत राहिल्याने मध्यमवर्गातही त्यांची श्रेणी उंचावत गेली. या पिढीने आपला बाल्यकाळ दारिद्र्यात, खेड्यापाड्यात अभावग्रस्त अवस्थेत घालवला असला तरी शिक्षणाच्या आणि राखीव जागांच्या बळावर संपन्नतेच्या दिशेने प्रगती साधली. उच्च पदावरून निवृत्त होताना आर्थिक, सामाजिक पत निर्माण झाल्याने, मुलाबाळांच्या भविष्याचीही चिंता नसल्याने एक प्रकारची कृतार्थता, साफल्याची भावना त्यांच्या मनात असणे स्वाभाविक आहे. आपण गरीब कुटुंबात जन्मलो, लहानपणी कष्टात वाढलो, परंतु आता सुखात आहोत, संपन्न आहोत, घरंदाज आहोत, आपल्या घरात सर्व आधुनिक सुखसोयी आहेत याबद्दल त्यांना अभिमान वाटतो.

आपल्या या यशस्वी वाटचालीचा, कर्तृत्वाचा आलेख इतरांनी बघावा, आपले यश, आपले कर्तृत्व आणि कष्ट यांची दखल घ्यावी अशी ओढ, निकड त्यांना जाणवत असली तर नवल नाही. त्यामुळे उच्च पदावरून निवृत्त झालेल्या दलित, ग्रामीण व्यक्तींची आत्मकथने आता मोठ्या प्रमाणावर मराठीत लिहिली जात आहेत, प्रकाशित होत आहेत. आरंभीची दलित आत्मकथने ही ऐन विशीपंचविशीतल्या, एसएससी वा पदवी परीक्षा जेमतेम पास झालेल्या तरुणांनी मोठ्या पोटतिडकीने, उमाळ्याने लिहिलेली होती.

आजची आत्मकथने बहुतांशी उच्च पदांवरून निवृत्त झालेल्या ज्येष्ठ व्यक्तींनी लिहिलेली आढळतात. आपल्या कष्टमय दिवसांचे, आरंभीच्या काबाडकष्टाचे, शिक्षणासाठी घेतलेल्या परिश्रमांचे स्मरण देत, नोकरीव्यवसायात केलेल्या प्रगतीचे आणि कर्तृत्वाचे अभिमानास्पद आलेख - अहवाल सादर करण्याच्या भावनेतून, प्रेरणेतून ही आत्मकथने सिद्ध होत आहेत. सामाजिक स्थित्यंतराची प्रक्रिया समजून घेण्यासाठी या आत्मकथनांचा मागोवा घेण्याची गरज आहे.

बी.ई. झाल्यावर पाटबंधारे विभागात कनिष्ठ अभियंता म्हणून शासकीय नोकरीचा १९७० मध्ये आरंभ करणारे आणि पुणे, कुकडी, नागपूर, अहमदनगर, मुंबई, ठाणे, कोल्हापूर, औरंगाबाद, नाशिक वगैरे ठिकाणी कामे करून महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास मंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून २००४ मध्ये निवृत्त झालेले किसन

दगडू शिंदे यांचे जाईची सुगंधी फुले हे आत्मकथन म्हणूनच प्रातिनिधीक मानता येईल.

या ३४ वर्षांच्या नोकरीत किसन शिंदे यांना लघुपाटबंधारे प्रकल्पांचे सर्वेक्षण, कोकणातील मोठ्या, मध्यम व जलविद्युत प्रकल्पांचे सर्वेक्षण, वरसगाव धरणाचे बांधकाम, खडकवासला कालव्याचा विस्तार, कुकडी प्रकल्पाचा कालवा, पेच कालवा, नागपूर विभागातील कालवे, पाथर्डी उच्च पातळी कालवा प्रकल्प नूतनीकरण अहवाल, पुणे विभागातील सिंचन देखभाल, पुणे जलविद्युत प्रकल्प बांधकाम - भूसंपादन, पुनर्वसन, वारणा-दूधगंगा जलविद्युत प्रकल्प, सिंचन आयोग अहवाल, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था - नाशिकचे कामकाज, कोकण कृष्णा खोरे विकास महामंडळ, जलनियोजन वगैरे कामांमध्ये सहभागी होता आले. या कामांचा तांत्रिक तपशील या आत्मकथनात सांगणे हा त्यांचा उद्देश निश्चितच नाही. मग या लेखनाची प्रेरणा कोणती? मनोगतात त्या दृष्टीने काही बाबी सूचित केल्या गेल्या आहेत. त्यातील काहींचा उल्लेख करणे उपयुक्त ठरेल.

* सामान्य सरकारी नोकरी करणाऱ्या माणसाच्या जीवनाची वाटचाल खडतर पण काहीशा वेगळ्याच वळणाची असते... त्यातील अनुभवसंपन्नता पूर्णांशाने व्यक्त होतेच असे नाही. (पाच)

* अनेक वेळा कंगाल व सामान्य जीवनातून उमलणारी व्यक्तिमत्त्वे महान, दानशूर व कर्तृत्ववान उद्योजक म्हणून प्रसिद्धी पावतात... पण सरकारी नोकरीत अशा कौतुकाच्या संधी अपवादानेही वाट्याला आल्याचे ऐकीवात नाही. खऱ्या कामाचे कौतुकही अनेकांच्या नशिबी येत नाही. (पाच)

* अंमलबजावणी करण्यापुरती मर्यादित जबाबदारी पार पाडताना मूलगामी स्वरूपाचे बदल अपेक्षित नसतात. तसे काही चुकून घडले तरी त्याचे श्रेय सोयीस्करपणे राज्यकर्त्यांकडे वर्ग केले जाते. (पाच)

* सामान्य माणसाला लागू असलेली तत्त्वे व शिस्त, सेवाकालावधीत सेवानियमांची बंधने शासनसेवकास काटेकोरपणे पाळावी लागतात...एखाद्या घटनाप्रसंगावरून व्यक्तीचे मूल्यमापन करताना गणिती ठोकताळे अनेकदा चूक ठरतात. (सहा)

* आपण कोणाला चांगले म्हणू शकलो नाही तरी वाईट बोलून नाती व कार्यभागाचा विनाश करणे शहाणपणाचे नसते. (सहा)

* आचार्य अत्रे यांनी 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्रात म्हटले आहे, की आपला मोठेपणा व्यक्त करण्यासाठी नाही तर सामान्य माणूसही मोठी कामगिरी कशी करू शकतो हे दाखवण्यासाठी मी निर्भयपणे, प्रामाणिकपणे आणि आनंदाने लिहिले

आहे... माझ्या सारख्या अतिसामान्य सरकारी सेवेतील अभियंत्यास परोक्ष किंवा अपरोक्ष मत प्रदर्शित करणे गृहीत धरता येणार नाही, हे ज्ञात असूनही माझे विचार मुक्तपणे मांडण्याचा माझा हा प्रयत्न गोड मानून घ्यावा. (सात)

* एका अभियंत्याचा वैयक्तिक व सामाजिक जीवनपट समोर मांडण्याचा हा एक अल्पमती प्रयत्न केला आहे... शासकीय नोकराचे करीयर आणि कुटुंब यांचा समन्वय व्यक्त करण्याचा प्रमुख हेतू मनात ठेवून घटनांची आणि अनुभवांची मालिका गुंफण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. (सात)

* तुम्हाला खरंच काही अर्थपूर्ण करायची इच्छा असेल तर वर्तमानातील प्रत्येक क्षणी उचित मार्ग सापडतो. तुम्हाला काही करायचे नसेल तर अनेक सबबी सापडतात. शासकीय सेवेत हे प्रकर्षाने लक्षात येते. (आठ)

* प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या सोयीप्रमाणे जीवनाचा अर्थ लावत असते. पण आपण काय करायचे हे कालानुसार बदलत असते.

* माणसांचा जीवनपट किंवा स्वत:चा शोध म्हणजेच आठवणी आणि अनुभव यांचे जाळे विचारान्ती अधिकच क्लिष्ट बनत जाते... पण आयुष्याचा चित्रपट अप्रकाशित ठेवून त्याचा सुगंध व आनंद कोणासाठी न वापरता तसाच नष्ट होऊ देणे उचित नाही. अनेक अनुभवांनी आणि विविधतेने रचलेले आयुष्याचे घरटे आत्मकथनाच्या माध्यमातून भविष्यातील पांथस्थांना उन्हात सावली, पावसात निवारा आणि थंडीत ऊब देऊ शकले तर मनाला समाधान वाटेल... **जे केले त्याचे अवलोकन व मूल्यमापन करण्याचे आत्मकथनासारखे अन्य निमित्त नाही. जे जगलो, जे अनुभवले, जे वाटले ते शब्दांकित करावे असे वाटले.** (आठ)

* विश्वाच्या विराट पसाऱ्यात व्यक्तीचे आयुष्य नगण्य वाटले तरी अशा नगण्य बाबींनीच विशाल जग बनलेले आहे. या आत्मकथनातील विविधता महत्त्वाची नसली तरी या विराट अस्तित्त्वाचा एक लहानसा अंशही नगण्य वाटता कामा नये. (नऊ)

* आत्मकथनातून प्रकट होणारी मानवी मनाची ही प्रातिनिधिक वाटचाल भविष्यात पुसली जाणार असली तरी... याच प्रवासातून अमर्याद विश्वाची आणि त्याच्या आविष्काराची कंपने संवेदनेच्या माध्यमातून मानवी मनापर्यंत पोहोचू शकतील. (नऊ)

* मोठ्या व्यक्ती व त्यांची मूलगामी विचारसरणी ही काही मूठभर माणसांची मक्तेदारी नाही. (नऊ)

* आयुष्याचे गाणे, मग ते जुने असो की नवे, मनाच्या गाभाऱ्यात गुंजारव करू

लागले की ते कोणासमोर तरी मांडावे, त्याला दाद मिळावी, आशीर्वाद घ्यावा अशी सहज प्रेरणा होते. कोणी अत्यल्प प्रतिसाद दिला तरी समाधान वाटते. त्यापलीकडे कोणतीही अपेक्षा नसते. (दहा)

* शासकीय सेवा किंवा अभियांत्रिकी तंत्रज्ञान ही व्यावसायिक जाणीव आहे पण त्यातून कुटुंब व नाती निर्माण करून आयुष्याचे ध्येय गाठणे ही कला आहे. ही माझ्या मनातील पार्श्वभूमी 'जाईच्या फुलांचा सुगंध' तुमच्या हृदयापर्यंत पोहोचवू शकली तर या आत्मकथनाचे सार्थक झाले असे मला वाटेल. (दहा)

* आयुष्याचे गाणे गात जावे असे मला नेहमी वाटे. माझे विचार, कृती, अनुभूती ही आईच्या संस्कारातून घडली आहे. माझ्या आईचे नाव जाईबाई होते. माझ्या पुण्यातील बंगल्याचे नाव मी जाई ठेवले आहे. मातृपितृप्रेमाच्या मायेचा सुगंध माझ्या मनात व कानात सतत गुंजन करीत, माझे जीवन प्रसन्न करीत असतो. (दहा)

* **जाणिवेतून व अनुभवातून प्राप्त झालेली प्रगल्भता आणि परिस्थितीने शिकवलेले शहाणपण सुसंगतपणे मांडण्याचा माझा हा प्रयत्न आहे. जुन्याची अवहेलना न करता, चिंतनाने नव्या विचारांची जोड देत, घेतलेले निर्णय आणि त्यामागची परिपक्वता आणि जिद्द हे या आत्मचरित्र लेखनाचे मुख्य सूत्र आहे.** (अकरा)

* लेखनाशी संबंध नसलेल्या माझ्यासारख्या एका अभियंत्याने आरेखित केलेले हे सरळ आणि साधे आत्मकथन स्पष्ट आणि थेट पणाने कोणासही आपले वाटेल अशी अपेक्षा आहे. (अकरा)

* प्रगती करणे म्हणजे केवळ पैसे मिळवणे नव्हे. प्रगती म्हणजे विवेकबुद्धीला स्मरून समाजपयोगी व शांत जीवन अनुभवणे. चिरंतन मूल्यांची सुखद साद जीवनाला मिळणे. आपले अनुभव संकलित स्वरूपात व्यक्त करणे या हेतूने हे आत्मकथन एवढे तपशीलवार आणि प्रामाणिकपणे लिहिले आहे. (अकरा)

* एकूणच आत्मकथन म्हणजे जीवनप्रवासाची तुटक सारकथा संकलनाची धडपड... प्रत्यक्षातील पुरेपणा आणि अपुरेपणा आत्मकथनाद्वारे अधोरेखित होत जातो. (चौदा)

* आयुष्यातील स्वयंमूल्यांकनाचे पहिले पाऊल म्हणजे आत्मकथन. विचार व अनुभव प्रवाहित स्वरूपात नव्या पिढीला उपलब्ध करून देण्यासाठी आत्मकथनांतील नोंदीचे संकलन कदाचित उपयोगी होऊ शकेल. (चौदा)

* वरकरणी दु:खदायक व क्लेशकारक घटनांच्या दु:खाचा विचार करून आत्मकथन आळणी बनवण्यात शहाणपण नाही. आत्मकथनातून अंतर्मनाची उर्मी

व अनुभवाची गोड साथ स्पष्ट होते. (सतरा)

* आत्मकथनातून पवित्र व मंगल विचारांची लेणी परिधान करून मन पिसासारखे हलके-हलके व मनोहारी बनवता येते अशी माझी मनोधारणा आहे. (सतरा)

* सुखाचे क्षण प्राप्त होण्यासाठी तुमची मानसिकता अनुकूल बनवावी लागते. हे या आत्मकथनातून व्यक्त करण्याचा हेतू आहे. (अठरा)

* **विचारशील मन आणि कृतिशील हात... त्यातून स्वत:साठी निर्मळ आनंद मिळावा हा विचार म्हणजेच आत्मकथनाद्वारे आपली स्वत:चीच ओळख व मूल्यांकन होय.** (अठरा)

* शिक्षण, गृहस्थाश्रम, नोकरी, निवृत्ती या प्रत्येक विषयाची मांडणी स्वतंत्रपणे केली आहे. (एकोणीस)

आपल्या जीवनाची कथा सांगण्यामागे असे विविध उद्देश असल्याने, किसन शिंदे यांच्या लेखणीला किती सांगू, किती आवरू असा प्रश्न पडला तर नवल नाही. अनुभवांना थोडे वाङ्मयीन व कलात्मक परिमाण लाभावे अशीही त्यांना तळमळ आहे. त्यामुळे भरपूर तपशील आणि भरपूर भाष्य वा चिंतन आपापत:च आले आहे. ''महाळुंगे पडवळ या गावी मागासवर्गीय कुटुंबातील चर्मकार समाजात माझा जन्म झाला.'' ''माझ्या जन्मामुळे कुटुंबाला वारस मिळाल्याच्या अद्वितीय आनंदात सर्व कुटुंबीय न्हाऊन निघाले. माझ्या जन्माने संपूर्ण कुटुंबाला एक नवी संजीवनीच प्राप्त झाली...'' असा आरंभ असलेले हे आत्मकथन शिक्षण, नोकरी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, नातलग, आजारपणं, बदल्या, बदलती घरे, मुलांचे शिक्षण, स्वत:च्या वास्तूची उभारणी वगैरे तपशीलाबरोबर जीवनविषयक चिंतनही जागोजाग प्रकट करते. माध्यमिक शालान्त परीक्षेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांत गुणवत्ता यादीत तिसरा क्रमांक आल्याने पुढचा मार्ग सुकर झाला. अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. झाल्यावर लगेच पाटबंधारे खात्यात नोकरी मिळाली. ३४ वर्षांनी निवृत्ती. असा सरळ रेषेतला जीवनपट. त्यामुळे या आत्मकथनामागची प्रेरणा पुढच्यांना मार्गक्रमणात मदत व्हावी अशी असणे स्वाभाविक आहे. दलितांच्या सत्तरीनंतरच्या दुसऱ्या पिढीतल्या प्रगतिपर वाटचालीचा यातून दिसणारा प्रवास मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाशी समांतर व समकक्ष आहे. त्यामुळे हे आत्मकथन प्रातिनिधिक म्हणूनही महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल.


शासकीय सेवेमुळे आपल्या आयुष्याला ज्या मर्यादा पडल्या त्यांचे स्वरूप शेवटच्या प्रकरणात विशद केले आहे. ते अर्थपूर्ण व अंतर्भेदक आहे. ते म्हणतात, ''शासनाची सेवा करताना अप्रत्यक्षपणे परिस्थितीची अपरिहार्यता, सामाजिक विषमता,

वैयक्तिक न्यूनगंड, अपुरे मार्गदर्शन, दोलायमान आत्मविश्वास यातून एक अनामिक भीती मनात घर करून राहिली होती. पर्यायी विचार आणि लांबट निर्णयप्रणाली ही विकासकामातील अडथळा ठरे. या अस्थिर मन:स्थितीचा परिणाम प्रत्येक कामावर होई. कोणतेही काम करताना मनातील अज्ञात भीती, भीतीतून चिंता, चिंतेतून नैराश्य किंवा दिखाऊ आक्रमकता आणि क्रियाशीलता यांच्याशी जुळवून घेत गेलो. परिस्थितीची अगतिकता अंगवळणी पडत सवयीची झाली. नेमके ध्येय स्पष्ट नसल्याने जे मिळत गेले ते नेहमीच अधिकच वाटत गेले समाजोपयोगी देशसेवेचे कर्तृत्व अनुसरता आले.''

शंकर सारडा

फोन-९८२३२६१०२३

❐




आगामी

## कार्गोची कणसं

**नरेंद्र माहुरतळे**

१३०रु. - सभासदांना सवलतीत

गाव, गावकीतील अनेक प्रश्न, विकासाच्या नावानं पुन्हा भकास होताना दिसतात. या भकासपणात होरपळ होते ती गावाखेड्यात राहणाऱ्या सामान्यांचीच! आर्थिक विषमतेमुळे हे भकासपण पुन्हा डोळ्यात सलू लागतं. 'इमला व पाया' संस्कृतीत गुंतून पडलेलं हे भीषण वास्तव गावाशी घट्ट जुळलेल्या नाळेपासून वेगळं होण्याचा प्रयत्नही जेव्हा करू देत नाही, तेव्हा पुन्हा भेसूर व्हायला लागतं.

# Press

## Mexican Cooking

Rajashree Naware

She admits that during her stay at Bahrain, she was exposed to Mexican cuisine. “It’s my favourite cuisine, as it is very similar to the Indian palate. The recipes might look exotic but they use simple ingredients,” she exclaims.




Naware started working on her book *Mexian Cooking* three years ago. She started off by culling the most traditional recipes and then experimented with them extensively.

“Each recipe in the book is tried and tested. I have also customised the recipes to Indian palates and the availability of products. For instance, I have replaced pork and beef with mutton. Chilli and cheese are the core ingredients of Mexican cuisine. But I have feta cheese with paneer as that can be even made at home.” She added.


**– Rinky Kumar**

(Mid-Day - May 6, 2012.)



Niromi de Soyza who born with mixed Sri Lankan and Indian heritage, was raised by her educated, conservative middle-class Tamil Christian family in northern Sri Lanka. During the escalated civil war in 1987, at the age of 17, she ran away to join the Liberation Tigers of Tamil Eelam, along with her best friend Ajanthi soldiers to be trained in Sri Lanka and engage in combat. Disheartened by violence, she resigned from the Tigers, and reunited with her family in mid-1988. Later, she gained political asylum in Australia, and higher education with a Masters degree. She works for a University and lives with her husband and two children.

# Book review




## Tamil Tigress

- Niromi de Soyza

### *A fight for justice*

Very often, we grow up fed on fairytales depicting the perfect world – one, where there are no differences amidst two sects; everyone's co-habiting in harmony; and where peace rules supreme. But then, sometimes reality decides to strike a jolt; and when it does, not everyone reacts in a passive, complacent way. There is always someone who reacts radically and causes a stir that often turns out to be more than a storm in the teacup.

Niromi De Soyza – the author of 'Tamil Tigress' - turned out to be just this kind of a radical! A spirited teenager living in Sri Lanka, Niromi grew up having strong ideas about freedom and communal bonding. However, her idealisms received a serious jolt in 1977, when the disgruntle amidst the Sinhala and Tamils of Sri Lanka started escalating after a Tamil political party got elected to power for the first time. The win resulted in terrible riots that claimed the lives of hundreds of Tamilians. Soon after this incident, Niromi's father got a job abroad and she, her sister Shirani and their mother went to live with their grandmother in Jaffna.

The move to Jaffna proved catalyst in changing the course of

Niromi's life. Continual taunts from her biased grandmother, coupled with increasing unrest against Tamils, led to a build-up of rage in Niromi's heart about the injustice meted out to the weak by the mighty. Unable to bear it anymore, she decided to take up the cudgels and bring justice to her Tamil brethren, instead of moping around complacently. The only way she could see to achieve this aim was to join the militant group LTTE (Liberation Tigers of Tamil Eelam) or Tigers as they were colloquially known!

Indeed, it was not an easy task for a middle-class, sheltered girl to join a militant outfit; but the persistent Niromi managed to wriggle her way in accompanied by her best friend Ajanthi. Unbeknownst to their families, the two girls join the 'Students Organisation of Liberation Tigers' (SOLT) and soon after, via Niromi's persistent follow-up, get themselves inducted into the LTTE's female wing. Thereafter, her life changes dramatically – with books and schools getting replaced by rifles and training camps! Niromi learns to wield a sub-machine gun and an AK-47 rifle with ease; she learns the tactics of keeping guard in dense forests; learns the code language amidst co-militants; and also gets educated in some worldly realities that she did not even know had existed till then! Using some slain militant's blood-soaked clothes; going for days on end in the same underwear; living hidden in the jungles under violent attacks of dermatitis and malaria; surviving on a ball of red rice and gruelly sambol; getting her toothbrush unabashedly pinched & used before her eye; living in strange houses amidst hostile hosts; and keeping her sanity intact through hours of boat-rides with legs deep in a cess of vomit... Niromi experiences a world far beyond her hitherto sheltered existence. She also experiences blood-curdling moments such as a senior Tiger dying on a hunger-strike; young Tigers being shot or axed mercilessly for being suspected informers or daring to have a love affair; and most of all, seeing her best friend Ajanthi drop dead like a fly with a bullet in her head!

Niromi braves this maniacal existence for two long years, on account of her belief in the cause and trust in their leader Prabhakaran. However, later on, certain incidents begin to raise doubts in Niromi's mind about the rationality behind the ongoing civil war and the credibility of the people master-minding it. Finally, after a long, practical deliberation, Niromi decides to quit the LTTE and goes onto make a successful, strife-free life for herself in Australia.

An account of those two surrealistically twisted years of Niromi's existence is what 'Tamil Tigress' is all about. Written in the first person with


heart-catching honesty, the book mirrors all the angst, fire and despair that Niromi goes through – thus making it an absorbing read. She also gives quite an in-depth analysis of the socio-political situations of that period, thus providing a good subtext to understand the reasons behind her actions. Personal insights about LTTE leaders like Prabhakaran and Akila (who was rumoured to be behind the assassination of late Rajiv Gandhi), add to the potency of Niromi's account.

On the flip side, the narrative tends to lag a bit at some places – getting entangled in tedious descriptions of Sri Lanka's scenic ambience or then, simply getting stretched in verbal longitude. It also gets difficult to keep track of the several characters that keep popping up at inconsistent intervals. Nevertheless, one can overlook the last flaw, considering that this is a work of non-fiction.


All in all, the small bumps and dents notwithstanding, 'Tamil Tigress' is one book that should not be missed at any cost; to understand how a tiny fiery seed can throw up the most towering life-experiences ever!

**- RESHMA S. KULKARNI**


# New Books





Gayatri's Maths Mantra




Novgorod Diary




Paper Cranes




Saris on Scooters




## In The Hands of Taliban

– Joanie de Rijke

Category - True Story
Type -Paperback
Pages - 228
Price - Rs. 250.00

## Praise

‘Afghanistan showed me the very essence of life. Because during that kidnapping, it was really a matter of life and death. But besides that, life for people there is all about survival. It is existence at its most pure, and that appeals to me.’ – *(from an interview in Libelle)*

‘Reads like a thrilling account of her terror.’ – *de Journalist*

‘Her account is not devoid of self-criticism, the threat of kidnapping by rival Taliban groups is suspenseful reading.’ – *Elsevier*

‘De Rijke pens her story unvarnished, and the book reads as an exciting novel full of adventures.’ – *De leeswolf“A*

## Backlist




Japanese Magnolia




Japanese Orchid




Mud City




Parvana's Journey




*** डॉ. अनिल काकोडकर यांना 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार**

देशाला ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण बनविण्यासाठी थोरियमपासून ऊर्जा निर्मितीचे मौलिक संशोधन करणारे ख्यातनाम अणुशास्त्रज्ञ आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांना राज्य सरकारचा २०११ चा महाराष्ट्रभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. रोख दहा लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सध्या महाराष्ट्र आणि देशाला भेडसावणाऱ्या वीज टंचाईवर अणुऊर्जा हा समर्थ पर्याय असून, कोकणातील जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प गरजेचा असल्याचे ठाम प्रतिपादन त्यांनी राज्य विधिमंडळाच्या संयुक्त सभागृहात केले होते. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे, चंदू बोर्डे, श्रीमती स्नेहलता देशमुख, सदस्य सचिव आनंद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ. काकोडकर यांनी ध्रुव रिॲक्टरमध्ये पूर्णत: नवीन उच्च तंत्रज्ञान वापरून मोलाची भर टाकली आहे. त्यांना १९९८ मध्ये पद्मश्री, १९९९ मध्ये पद्मभूषण आणि २००९ मध्ये पद्मविभूषण हे किताब मिळाले आहेत. १९७४ आणि १९९८ मध्ये झालेल्या अणुचाचणीच्या मुख्य पथकाचे ते सदस्य होते. अडीचशेहून अधिक शास्त्रीय संशोधनपर लेख त्यांनी लिहिले आहेत; तसेच जागतिक अणुऊर्जा महामंडळ आणि जागतिक नवतंत्रज्ञान संस्थेवर प्रतिनिधित्व केले आहे.

काकोडकर यांना हा पुरस्कार म्हणजे विज्ञाननिष्ठ विचारांचा व त्यांच्या राष्ट्रसेवेचा गौरव आहे, अशा शब्दांत अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली.

## * दीनानाथ मंगेशकर पुरस्कार

''लता मंगेशकर हे भारताचे मोठे रत्न आहे. जेव्हा आपण झोपतो, तेव्हा लताचा आवाज जागा असतो. तिला दीनानाथांचा आशीर्वाद लाभला आहे. हा अनमोल ठेवा देशाने जपून ठेवला पाहिजे'', असे गौरवाद्‌गार शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी षण्मुखानंद सभागृहात मा. दीनानाथ मंगेशकर स्मृतिदिन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून काढले. या समारंभात लता मंगेशकर यांनी मा. दीनानाथ मंगेशकर पुरस्कार प्रदान केले.

प्रदीर्घ संगीतसेवेबद्दलचा मा. दीनानाथ पुरस्कार प्रसिद्ध तबलावादक कुमार बोस यांना, मोहन वाघ पुरस्कार डॉ. वसंतराव देशपांडे प्रतिष्ठान (पुणे) यांना, समाजसेवेबद्दलचा आनंदमयी पुरस्कार डॉ. प्रसाद देवधर यांना, प्रदीर्घ साहित्य सेवेबद्दलचा वाग्विलासिनी पुरस्कार डॉ. एस.एल.भैरप्पा यांना, अभिनय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दलचा आदिशक्ती पुरस्कार माधुरी दीक्षित-नेने यांना आणि प्रदीर्घ नाट्यसेवेबद्दल विशेष पुरस्कार अभिनेते विक्रम गोखले यांना देण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर या मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. विक्रम गोखले यांनी आपले वडील चंद्रकांत गोखले आणि दीनानाथ मंगेशकर यांच्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला.

नृत्य आणि संगीत या वातावरणात मी वाढले आहे. ताल आणि सुरांची मला थोडी माहिती आहे, असे सांगून माधुरीने एक चीज सादर केली. लता मंगेशकर यांनी आभारप्रदर्शन करताना स्मृतिरंजन केले. आजही बाबा आमच्याबरोबर आहेत, असे त्या म्हणाल्या.

## * राजाभाऊ परांजपे पुरस्कार

राजाभाऊ परांजपे यांच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याने मला धन्यता वाटते, कारण माझे ते लहानपणीचे, तरुणपणाचे दैवत आहेत, अशी भावना ज्येष्ठ नाट्य व चित्रपट दिग्दर्शक, लेखिका सई परांजपे यांनी व्यक्त केली.

सई परांजपे यांना ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते 'राजा परांजपे जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अर्चना राणे त्यावेळी उपस्थित होत्या.

राजा परांजपे प्रतिष्ठान अध्यक्षा अर्चना राणे यांनी सांगितले की, 'राजा परांजपे प्रॉडक्शन'ची स्थापना करण्यात आली असून, या संस्थेच्या माध्यमातून या पुढे चित्रपटांची निर्मिती करण्यात येणार आहे. या संस्थेचा पुढला चित्रपट हा राजा परांजपे यांच्या जीवनावर असणार आहे.

सई परांजपे यांनी मुलाखतीतून आपला जीवनपट उलगडून दाखविला. बालपणी

मनात गोष्टी तयार करून त्या आईला सांगण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेले पहिले पुस्तक, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आकाशवाणीवर झालेली निवड यापासून ते नाट्य व चित्रपट क्षेत्रातील प्रवास, विविध आठवणी व किस्से त्यांच्या मुलाखतीतून रसिकांसमोर आले. लहानपणी आईने माझ्यातील गुण हेरून मला प्रोत्साहन दिले. त्यामुळे मी स्वत:ला भाग्यवान समजते, असे सांगून त्या म्हणाल्या, वेळीच मुलांतील कलागुण हेरून पालकांनी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. मी खूप वाचन केले. नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये दोन वर्षे शिक्षण घेतले. फ्रान्समध्ये एक वर्ष नाट्यपरीक्षणासाठी गेले होते.

सर्वात आवडता चित्रपट कोणता, या प्रश्नावर त्या म्हणाल्या, 'दिशा' हा माझा चित्रपट सर्वांगसुंदर होता, पण तो फारसा लोकांसमोर आला नाही. हा चित्रपट लिहायला मला सतरा वर्षे लागली. सतरा वर्षे हा चित्रपट मनात फुलत होता.

पुरस्कार सोहळ्यानंतर राजा पराजपे यांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. चैतन्य कुलकर्णी, सई टेंबेकर, प्रसन्न बाम, अमित कुंटे, पालवी बापट व आदित्य आपटे यांनी हा कार्यक्रम सादर केला.

### * भारती विद्यापीठ वर्धापनदिन पुरस्कार

भारती विद्यापीठाच्या १७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, दिव्य मराठीचे संपादक कुमार केतकर आणि प्रसिद्ध हृदयविकारतज्ज्ञ डॉ. अनिल काटदरे यांना जीवन साधना पुरस्काराने गौरविण्यात आले. ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके, भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम या वेळी उपस्थित होते.

मंगेशकर यांनी कवी ग्रेस यांच्या आठवणींना उजाळा दिला. 'ग्रेस यांनी त्यांच्या अखेरच्या दिवसांत आपली कविता का निवडली असा प्रश्न मला विचारला होता. ग्रेस यांच्या कवितांमधला जीवनरस मला भावला. त्या कवितांचा अर्थ कळला असे मी म्हणणार नाही, पण त्या कवितेतल्या भावना मला अगदी मनापासून जाणवल्या. आजवर अनेक नामवंत कवींच्या कवितांना मी चाली लावल्या. त्या सगळ्या कवींचा, आशयांचा हा सत्कार आहे,' असे त्यांनी नमूद केले. ''नवमध्यमवर्गाच्या उदयामुळे सर्वत्र संपन्नतेचा भास होत असला, तरी या वर्गाच्या पलीकडे मोठ्या संख्येने कष्टकरी आणि वंचित वर्ग आहे. त्या वर्गाविषयी बांधिलकी जपणारे लोकच परिवर्तन घडवू शकतील,'' असे मत डॉ. डहाके यांनी व्यक्त केले.

## * फिरोदिया करंडक पुरस्कार सोहळा

फिरोदिया करंडक आंतरमहाविद्यालयीन विविध गुणदर्शन स्पर्धेचे पारितोषिक वितरण राज ठाकरे यांच्या हस्ते गणेश कला क्रीडा मंच येथे झाले. यावेळी ज्येष्ठ उद्योजक अरुण फिरोदिया, शशांक परांजपे, श्रीकांत परांजपे, नितीन धंदुके, केदार परांजपे, सूर्यकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते. राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभिनेते गिरीश कुलकर्णी, दिग्दर्शक सुजय डहाके आणि पार्श्वगायक आनंद भाटे यांचाही सत्कार करण्यात आला.

सीओइपीचे सादरीकरण पाहिल्यानंतर ठाकरे यांनी तरुणाईशी संवाद साधला. ते म्हणाले, ''आपल्या मराठी मुलांमध्ये किती प्रकारच्या कला आहेत हे या स्पर्धेने सिद्ध केले आहे. तरुणाईने बिनधास्त वागले पाहिजे. तुम्हाला हवे ते करा, अपयश आले तरी खचून जाऊ नका. तुम्हाला आवडणाऱ्या क्षेत्रात काम करण्यासाठी झोकून द्या. कलाक्षेत्रात केवळ उत्तम टॅलेंटची आवश्यकता असून सातत्य पाहिजे. तुमच्यामध्ये असलेली ऊर्जा वाया घालवू नका.''

''तुम्ही केलेले सादरीकरण कमाल होते. असा कार्यक्रम आजपर्यंत कधी पाहिला नाही. मी आता मुंबईला गेल्यावर माझ्या चार ओळखीच्या व्यक्तींशी बोलणार आहे. त्या व्यक्ती म्हणजे आमीर खान, राजकुमार हिरानी, शाहरूख खान आणि आशुतोष गोवारीकर... तुम्ही या चौघांसमोर सादरीकरण करा,'' अशी खुली ऑफर राज ठाकरे यांनी विजेत्या विद्यार्थ्यांना दिली.

परीक्षकांच्या वतीने अभिनेते गिरीश कुलकर्णी म्हणाले, 'स्पर्धेतील नाटके उत्तम होती. ही स्पर्धा मुलांमधील हरवत चाललेली सांस्कृतिक जाणीव जिवंत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम करत आहे.'

## * अभिनेत्री लीला गांधी यांना 'व्ही. शांताराम पुरस्कार'

वयाच्या आठव्या वर्षापासून कथ्थक नृत्याचा सुरू झालेला प्रवास... 'राम राम पाव्हणं' या चित्रपटाची हिंदी आवृत्ती असलेल्या 'घरबार'द्वारे चित्रपटसृष्टीत झालेले पदार्पण... मुलगा आजारी असतानाही स्वतः गाऊन नृत्य लावणी सादर केल्यामुळे शांताराम बापूंकडून मिळालेली शाब्बासकीची थाप... महाकवी कालिदास नाटकासाठी खास शिकलेले संस्कृत... यांसारख्या असंख्य अनुभवांचे पदर उलगडून अभिनेत्री लीला गांधी यांनी रसिक प्रेक्षकांना मानाचा मुजरा केला.

राज्य सरकारतर्फे दिला जाणारा 'व्ही. शांताराम पुरस्कार' यंदा लीला गांधी यांना देण्यात आला म्हणून कलागौरव प्रतिष्ठानतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. 'आयुष्यातील सर्वात मोठा आनंद म्हणजे हा पुरस्कार' अशी भावना व्यक्त करीत गांधी म्हणाल्या, ''गुरू गोविंद निकम यांच्याकडे कथ्थकचे शिक्षण घेतले. 'लाखाची

गोष्ट'मधील 'सांग तू माझी होशील का?' या गाण्यावरील नृत्य मास्टर भगवान यांना खूप आवडले. त्यामुळे नंतर 'रंगीला', 'हल्लागुल्ला' आणि 'भला आदमी' या चित्रपटात नर्तिकेची भूमिका मिळाली. 'लीला गांधी नृत्य दर्शन' या संस्थेच्या माध्यमातून लावणीसाठी महाराष्ट्र पालथा घातला. 'सांगते ऐका'मध्ये नृत्य दिग्दर्शन करतेवेळी हंसाबाईंना सुरवातीला माझ्याकडून नृत्य शिकणे अवमानास्पद वाटले; परंतु सर्व काही सुरळीत झाले.''

''सध्या लावणीला चांगले दिवस आले आहेत. मुली नृत्य चांगले करतात. मात्र लावणीतील शब्द अभिनयातून त्यांना व्यक्त करता येत नाहीत; तसेच त्यांनी वेशभूषा करताना तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. तमाशावाले आता पूर्वीसारखे गरीब राहिलेले नाहीत. अजय-अतुल या जोडीने चांगला बदल केला आहे. माझ्यावेळी ही मुले असती तर त्यांच्याबरोबर मी नृत्य सादर केले असते,'' असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय छाजेड व प्रल्हाद सावंत उपस्थित होते.

*** शाहू मोडक स्मृती पुरस्कार**

''बुद्धिमत्ता व सत्तेबरोबरच मनुष्याकडे नीतिमत्ता असली पाहिजे. ती नसल्यास मनुष्याचे जीवन निष्फळ ठरते. प्रत्येकाने नैतिकता पाळून जीवन सफल केले पाहिजे.'' अशी अपेक्षा आमदार अरुण गुजराथी यांनी व्यक्त केली.

शाहू मोडक प्रतिष्ठान तर्फे नकलाकार अंशुमन जोशी, गायक प्रथमेश लघाटे, अंधत्वावर मात करून जीवन जगणारे जयंत निर्वणकर, ज्योतिष पंडित जयंत बेलसरे यांना गुजराथी यांच्या हस्ते शाहू मोडक स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येकी सात हजार रुपये, प्रशस्तिपत्रक व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

अभिनेते प्रदीप वेलणकर, मधुरा वेलणकर, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रतिभा मोडक, संचालक सदानंद केळकर उपस्थित होते.

अभिनेते रमेश वैशंपायन यांना सात हजार रुपयांची वैद्यकीय मदत प्रतिष्ठान तर्फे देण्यात आली.

गुजराथी म्हणाले, ''आधुनिक जगात मनुष्य स्वार्थी व अहंकारी होत चालला आहे. दुसऱ्याचे कौतुक करणे विसरला आहे. स्वार्थामुळे जगात भ्रष्टाचार वाढला आहे. शाहू मोडक यांचे जीवन तेजःपुंज होते. संत तुकाराम व स्वामी विवेकानंद यांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. ज्योतिषशास्त्रातही ते पंडित होते. नेहमी कृतिशील राहण्याच्या स्वभावामुळे ते भविष्य घडवू शकले.''

वेलणकर म्हणाल्या, ''माणूस कितीही मोठा झाला तरी त्याने विद्यार्थीदशा सोडू नये. मिळेल ते ज्ञान ग्रहण करावे. या ज्ञानामुळेच माणूस प्रगती करतो.'' सूत्रसंचालन सुधीर गाडगीळ यांनी केले.

## * वीरशैवभूषण पुरस्कार

''बसवेश्वरांनी समाजातील विषमता, जातिवाद मोडून काढत प्रबोधन आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला नवीन दिशा दिली.'' असे प्रतिपादन आमदार उल्हास पवार यांनी केले.

महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीचे औचित्य साधत महाराष्ट्र वीरशैव लिंगायत संघटनेतर्फे प्राचार्य संगमेश्वर भैरगोंड यांना पवार यांच्या हस्ते 'वीरशैव भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

भैरगोंड म्हणाले, बसवेश्वर संपूर्ण मानवजातीचेच होते. त्यांनी आपल्या कृतीमधून आपले विचार मांडले. त्यांचे विचार चिरकाल टिकणारे आहेत.

महाराष्ट्र वीरशैव लिंगायत संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र व्यवहारे, सरचिटणीस अनिल स्वामी कसबेकर, लिंगायत सेवा मंडळाचे अध्यक्ष बिपिनचंद्र मेणकर, महाराष्ट्र वीरशैव तिरळी समाजाचे अध्यक्ष शांताराम बेर्डे, कल्याण गाभणे आदी या वेळी उपस्थित होते.

## * यशवंत नीती, साहित्य आणि संस्कृती पुरस्कार

यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीचे औचित्य साधून विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी यांच्या वतीने यशवंत नीती, साहित्य आणि संस्कृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी, यशवंतरावांचे खासगी सचिव राम खांडेकर, कऱ्हाड शिक्षण मंडळाचे सचिव रा.गो. प्रभुणे यांना प्रदान करण्यात आला.

शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व ५१ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची राजनीती, लोकनीती याबरोबरच त्यांचे साहित्य व संस्कृती प्रेम यांना आदर्श मानून, त्यानुसार कार्य करणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी २७ एप्रिलला हा पुरस्कार देण्यात येईल, असे माईर्स एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांनी सांगितले.

## * लक्ष्मण खेतानी यांना संत नामदेव पुरस्कार

पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनातर्फे देण्यात येणारा संत नामदेव जीवनगौरव पुरस्कार लक्ष्मण खेतानी यांना राजस्थान येथे विद्यापीठ विकास महामंडळाचे अध्यक्ष डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

संत साहित्य, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. जोधपूर येथील रहिवासी लक्ष्मण खेतानी हे नामदेवांच्या साहित्याचे प्रचारक आहेत. खेतानी यांच्या अनेक पिढ्या संत नामदेवांच्या साहित्याचा प्रचार करत असून पाकिस्तान आणि राजस्थानमध्ये त्यांच्या पूर्वजांनी नामदेवांचे मंदिर उभारले आहे. या मंदिराची व्यवस्था खेतानी पाहतात.

या पुरस्कार सोहळ्याला राजस्थानचे माजी मंत्री राजेश गेहलोत, नामदेव अध्यासनाच्या प्रमुख डॉ. वीणा मनचंदा आणि डॉ. लीला गोविलकर उपस्थित होत्या.

*** 'शाश्वत'ला इक्वेटर पुरस्कार**

गेल्या तीन दशकांपासून पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्याच्या डोंगरी, दुर्गम आदिवासी भागात काम करणाऱ्या मंचर येथील शाश्वत संस्थेला जागतिक स्तरावरील प्रतिष्ठेचा इक्वेटर पुरस्कार जाहीर झाला आहे. पाच हजार डॉलर्स, प्रमाणपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. जूनमध्ये ब्राझीलमधील रिओ दी जानेरो शहरात होणाऱ्या 'शाश्वत विकास' परिषदेत पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे. शाश्वत संस्थेचे संस्थापक सदस्य अभियंता आनंद कपूर पुरस्कार स्वीकारणार आहेत.

न्यूयॉर्क येथील राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमांतर्गत (यूएनडीपी) हा पुरस्कार देण्यात येतो. जगभरातून ११३ देशांतील ८०० हून अधिक संस्थांकडून पुरस्कारासाठी अर्ज प्राप्त झाले होते. त्यामधून २५ संस्थांची निवड करण्यात आली. त्यामध्ये 'शाश्वत' ही भारतातील एकमेव संस्था आहे. १९८१ पासून आदिवासी भागातील २५ गावांत आनंद कपूर व कुसुम कर्णिक हे दोघे महादेव कोळी, ठाकर व कातकरी यांच्या सोबत लोकसहभागातून निसर्ग कोपरा विकासाचे काम करतात. पश्चिम घाटाचा भाग डोंगराळ व घनदाट जगलाचा आहे. येथे पडकाई पद्धतीने भातखाचरांची निर्मिती करून तसेच धरणग्रस्त आदिवासींची मच्छीमारी सहकारी संस्था स्थापन करून आदिवासींना त्यांचा फायदा मिळवून दिला आहे.

कातकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकार, अनेक संस्था व व्यक्तींचीही मदत मिळाली. होड्या, जाळी, मोटरबोट, मत्स्यबीज वाढविण्यासाठी तरंगते पिंजरे आदि साधनसामग्रीमुळे मासे उत्पादन वाढले. धरणाचे पाणी कमी झाल्यावर सदर जमिनीत उन्हाळ्यात एक पीक घेता येते. महिला बचत गटांची उभारणी करून रोजगार व आरोग्य जागृतीचे काम सुरू आहे. नऊ बालवाड्या, निवासी प्राथमिक शाळा, वसतिगृह असून क्रीडा संकुल विकसित केले जात आहे. कातकरी विद्यार्थ्यांची पहिली पिढी शिक्षण घेत आहे. हसत खेळत शिक्षण उपक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. बुधाजी डामसे, प्रतिभा तांबे, मीरा दांगट, सुलोचना गवारी व आदिवासी कार्यकर्त्यांची मोलाची साथ मिळाल्याने 'शाश्वत'चे काम समाजाभिमुख झाले आहे, अशी प्रतिक्रिया आनंद कपूर यांनी व्यक्त केली.

*** प्र. र. अहिरराव यांना जीवनगौरव पुरस्कार**

इंदापूर तालुका मित्रमंडळाच्या वतीने ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ प्र. र. अहिरराव यांना जीवनगौरव आणि सिंघम फेम अभिनेता अशोक समर्थ, उद्योजक सुनील पंडीत,

काँग्रेस नेते रत्नाकर महाजन यांना इंदापूर भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. आयपीएस अधिकारी विनोद पवार, पोलिस निरीक्षक भानुप्रताप बर्गे, गायक विजय सरतापे, शिक्षक धनाजी भोग, कवी संजय जगताप, उपनिबंधक राजेंद्रकुमार दराडे यांचा या मेळाव्यात विशेष सत्कार करण्यात आला.

*** पाटील दांपत्याला 'यशवंत-वेणू' पुरस्कार**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पिंपरी शाखेच्या वतीने २८ एप्रिल रोजी भोसरीतील अंकुशराव लांडगे सभागृहात माजी खासदार श्रीनिवास पाटील व त्यांच्या पत्नी रजनीदेवी पाटील यांना यशवंत-वेणू पुरस्कार उल्हास पवार यांच्या हस्ते देण्यात आला.

*** डॉ. वसंतराव देशपांडे प्रतिष्ठानचा सन्मान**

'मास्टर दीनानाथ पुरस्कारा'च्या उत्कृष्ट संगीत नाट्य पुरस्कारासाठी नाटकाऐवजी 'कट्यार काळजात घुसली', 'मानापमान', इत्यादी जुनी संगीत नाटके पुन्हा रंगभूमीवर आणणाऱ्या पुण्याच्या 'डॉ. वसंतराव देशपांडे प्रतिष्ठान' या संस्थेला देण्यात आला.

अलीकडे संगीत नाटके फार कमी येतात. त्यातही विनोदी नाटके व फार्स अधिक असतात. या पुरस्कारासाठी यंदा योग्य नाटक न मिळाल्याने संगीत नाटकाच्या निर्मितीबद्दल पुरस्कार देत असल्याचे पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी सांगितले. या पुरस्काराने राहुल देशपांडे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडली आहे. हा पुरस्कार सोहळा षण्मुखानंद सभागृहात २४ एप्रिलला संपन्न झाला. कौषिकी चक्रवर्ती यांचे शास्त्रीय गायन व राहुल देशपांडे यांच्या संगीत मानापमानाचा प्रयोग झाला.

*** राज्य मराठी चित्रपट पुरस्कार**

नियोजनातील ढिसाळपणा, सूत्रसंचालनातील चुका, वेळेची मर्यादा ओलांडून चालवलेली मनोरंजनाची आतषबाजी अशा सावळ्या गोंधळात ३० एप्रिल रोजी ४९ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवातील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मधील मैदानात मराठी चित्रपटसृष्टीतील अवघे तारांगण अवतरले होते.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार आदींच्या हस्ते पुरस्कार विजेत्या कलाकारांना गौरविण्यात आले. उत्कृष्ट चित्रपटाचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार 'बालगंधर्व' आणि 'देऊळ' यांना विभागून देण्यात आला. दिग्दर्शनाचा पुरस्कारही उमेश कुलकर्णी आणि रवींद्र जाधव यांना विभागून देण्यात आला. उत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार 'ताऱ्यांचे बेट'ने तर तृतीय दिग्दर्शनाचा पुरस्कार किरण यज्ञोपवीत यांनी पटकाविला.

यावेळी व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्काराने अभिनेत्री लीला गांधी, व्ही. शांताराम विशेष पारितोषिकाने दिलीप प्रभावळकर, राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने श्याम बेनेगल आणि राज कपूर विशेष पारितोषिकाने माधुरी दीक्षित यांना गौरविण्यात आले. ग्रामीण भागातील उत्कृष्ट चित्रपट म्हणून 'जन गण मन', उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून अमित अभ्यंकर, सामाजिक चित्रपट म्हणून 'दुसऱ्या जगात' आणि दिग्दर्शक म्हणून सतीश रणदिवे यांना गौरविण्यात आले.

सर्वोत्कृष्ट कथा - मधुसूदन कालेलकर पारितोषिक - 'ताऱ्यांचे बेट' साठी सौरभ भावे

उत्कृष्ट पटकथा - 'मोरया' - सचिन दरेकर

उत्कृष्ट संवाद - आचार्य अत्रे पारितोषिक - 'अर्जुन' साठी सचिन दरेकर

उत्कृष्ट गीते - माडगूळकर पारितोषिक - 'डॅम्बीस' साठी अरविंद जगताप

उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक - अरुण पौडवाल पारितोषिक - 'पाऊलवाट' साठी नरेंद्र भिडे

उत्कृष्ट पार्श्वगायक - 'बालगंधर्व' साठी आनंद भाटे

उत्कृष्ट पार्श्वगायिका - 'अर्जुन' साठी देवकी पंडित

उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक - 'अर्जुन'साठी राजेश बिडवे

विशेष अभिनेता - कै. काशिनाथ घाणेकर पारितोषिक - 'गजर' साठी सुहास शिरसाट

विशेष अभिनेत्री - हंसा वाडकर पारितोषिक - पाऊलवाट' साठी ज्योती चांदेकर

उत्कृष्ट विनोदी अभिनेता - दामूआण्णा मालवणकर पारितोषिक - 'पाऊलवाट' साठी आनंद इंगळे

सहायक अभिनेता - चिंतामणराव कोल्हटकर पारितोषिक - 'अर्जुन' साठी विद्याधर जोशी

सहायक अभिनेत्री - शांता हुबळीकर पारितोषिक - 'सद्रक्षणाय' साठी सुहिता थत्ते

उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेत्री - रंजना देशमुख पारितोषिक - 'गजर' मधील भूमिकेसाठी सुखदा यश

प्रथम पदार्पण निर्माता - 'गजर'साठी सुनील खोसला आणि विभादत्ता खोसला

प्रथम पदार्पण दिग्दर्शक - 'गजर' साठी अजित वैभवकर

*** अजितकुमार कडकडे यांना पुरस्कार**

पं. जसराज मित्रमंडळ पब्लिक ट्रस्टतर्फे एस. एम. जोशी सभागृहात संगीतकार पं. प्रभाकर पंडित स्मृती पुरस्कार पं. अजितकुमार कडकडे यांना देण्यात आला.ते

म्हणाले, ‘‘मला सर्जन व्हायचं होतं. गोव्यात पावसाळ्याच्या दिवसांत मिळणाऱ्या बेडकांचं मी विच्छेदन (डिसेक्शन) करायचो. एकदा गोव्यात असतानाच मित्राच्या सांगण्यावरून पं. जितेंद्र अभिषेकी यांची मैफल ऐकायला गेलो आणि पुरता भारावून गेलो. तेव्हापासून एकच ध्यास घेतला की गाणं शिकायचं तर यांच्याचकडे आणि गायनाकडे वळलो. नाहीतर, आमच्या घराण्यात माझ्यापूर्वी कुणी साधं गुणगुणलंही नव्हतं...’’

प्रभाकर पंडित म्हणजे हाडाचे शिक्षक होते. आपण सांगितलेली रचना, चाल समोरच्या गायकाच्या डोक्यात संपूर्ण भिनेपर्यंत ते पुन्हा पुन्हा समजावत राहायचे. ‘देवाचिये द्वारी’ या त्यांनी संगीतबद्ध केलेल्या भक्तिगीतामुळेच मी घराघरांत पोचलो. त्यामुळे त्यांच्या नावाचा पुरस्कार घेताना मला आनंद होत असल्याची भावना पं. कडकडे यांनी व्यक्त केली.

या वेळी युवा कलाकार मृण्मयी फाटक यांना २५ हजार रोख रकमेची पं. जसराज शिष्यवृत्ती आणि पाच हजार रुपयांचा पैंगणकर पुरस्कार दाजीकाका गाडगीळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. फाटक यांची ओळख संगीता कर्णिक यांनी, तर पं. कडकडे यांची ओळख तबलावादक केदार पंडित यांनी करून दिली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात फाटक यांचे गायन झाले. त्यांना कुमार करंदीकर यांनी संवादिनीवर, अरुण गवई यांनी तबल्यावर, तर योगदा देशपांडे यांनी तानपुऱ्याची साथ केली.

### * ग्रंथमित्र पुरस्कार

कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथपाल प्रा. डॉ. नमिता बाबासाहेब खोत यांना सावंतवाडी येथील राजमाता पार्वतीदेवीसाहेब राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार १ मे २०१२ रोजी सावंतवाडी येथील श्री. पंचम खेमराज महाविद्यालयात देण्यात आला.

ग्रंथपाल सौ. नमिता खोत यांनी मिरज येथील डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय आणि विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथील ग्रंथालयात २६ वर्षे ग्रंथपाल म्हणून काम केले आहे. त्यांचेकडे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातून तीन विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली असून ५ विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत. १३ विद्यार्थी एम. फिल., ६० विद्यार्थी एम.लिब ॲन्ड आय एस्सी झाले आहेत. त्यांचे १०० हून अधिक विद्यार्थी ग्रंथालयासह विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.


### * ‘दि असोसिएटेड प्रेस’ ला पुलित्झर पुरस्कार

मुस्लिम समाजाबाबत न्यूयॉर्क पोलिस खाते हेरगिरी करीत असलेला माहितीपट

केल्याबद्दल 'दि असोसिएटेड प्रेस' या संस्थेला शोध पत्रकारितेचा पुलित्झर पुरस्कार मिळाला आहे. त्याचप्रमाणे शहरातील शाळांमध्ये होणाऱ्या हिंसाचाराच्या उद्रेकाची कारणे काय आहेत, त्याबद्दलचा सार्वजनिक सेवा क्षेत्रातील पुरस्कार 'फिलाडेल्फिया इन्क्वायरर' या संस्थेला मिळाला आहे.

हरिसबर्ग पेनसिल्व्हानियामधील 'पॅट्रियट न्यूज' ला सेक्स स्कॅण्डलचा पर्दाफाश केल्याबद्दलचा पुरस्कार मिळाला आहे. या सेक्स स्कॅण्डलमध्ये फूटबॉल प्रशिक्षक जो पॅटर्नो याचा समावेश आहे.

❒


आगामी

**'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र.'**

**डेबरा ब्रेव्हरमन, एम.डी.**


अनुवाद

**डॉ. अश्विनी घैसास**

१६०रु. - सभासदांना सवलतीत

डॉ. डेबरा ब्रेव्हरमन यांची ई.ई.सी.पी.मधील तज्ज्ञ म्हणून देशभर ख्याती आहे. अर्ली शो, टाइम इ.मधील त्यांचा सहभाग सर्वज्ञातच आहे. त्या कॉर्नेल युनिव्हर्सिटी मेडिकल कॉलेजच्या (आताचे वेल मेडिकल कॉलेज ऑफ कॉर्नेल युनिव्हर्सिटी) पदवीधर असून अमेरिकन बोर्ड ऑफ फिजिकल मेडिसिन अॅन्ड रिहॅबिलिटेशनच्या सर्टिफिकेटधारक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हानिया स्कूल ऑफ मेडिसिनमध्ये त्या असिस्टंट प्रोफेसर आहेत व ब्रेव्हरमन ई.ई.सी.पी. हार्ट सेंटरच्या (पूर्वीचे व्हायटल हार्ट ई.ई.सी.पी. क्लिनिक) संस्थापकही आहेत. देशातील सर्वांत जास्त पेशंटना ई.ई.सी.पी. उपचार देणाऱ्या डॉ. ब्रेव्हरमन फिलाडेल्फियामध्ये स्थायिक आहेत.

**आगामी**




अनलाइकली हिरो

# ओम पुरी

**नंदिता सी. पुरी**

अनुवाद

**अभिजित पेंढारकर**

२२०रु. - सभासदांना सवलतीत

'अनलाइकली हिरो' या पुस्तकात ओम पुरी यांचे खासगी आयुष्य, त्यांनी केलेला संघर्ष, त्यांची अस्वस्थता, त्यांच्या हृदयातील वेदना यांचे दर्शन घडते. पंजाबातून डोळ्यांत स्वप्ने घेऊन आलेला मुखदुर्बळ कलाकार, 'एनएसडी'मधील जातिवंत 'फ्लर्ट', खाण्याचा शौकीन व उत्तम कूक आणि पूर्णत: कुटुंबवत्सल माणूस! ओम पुरी यांची ही विविध रूपे या पुस्तकात पाहायला मिळतील. कुटुंबातील सदस्यांबरोबरच्या गमतीदार प्रसंगांची मालिका, भारतीय आणि ब्रिटिश चित्रपटसृष्टीतील व्यक्तींच्या सहवासातील अनेक धक्कादायक घडामोडी, प्रेमप्रकरणे यांचा उलगडा या पुस्तकातून होईल.

दुर्मीळ आणि वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रांचाही आस्वाद घेता येईल. मार्मिक, प्रामाणिक आणि उत्साहपूर्ण शैलीत लिहिलेली कहाणी.

'सिटी ऑफ जॉय' या चित्रपटात ओम पुरींसोबत काम केलेल्या पॅट्रिक स्वेझ या दिवंगत अभिनेत्याने त्यांचा त्याच्या आयुष्यावर पडलेला प्रभाव पुस्तकात सांगितला आहे. प्रसिद्ध समीक्षक डेरेक माल्कम यांनी ओम यांची अफाट गुणवत्ता आणि कलेचा प्रचंड परीघ यांचा आढावा घेतला आहे.

नसीरुद्दिन शाह यांनी 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'पासून सुरू झालेल्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांच्या क्षितिजावर ओम पुरी या ताऱ्याचा उदय होण्याची कहाणीही पुस्तकात वाचायला मिळेल.




# भाषांतरित पुस्तकांचे प्रकाशन : नव्या दिशा, नवे आयाम

मुलाखत अनघा भट

विविध भाषांमधील साहित्य मराठीत आणणाऱ्या ज्या प्रकाशन संस्था आहेत त्यामध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसचे  नाव प्रामुख्याने पुढे येते.

भाषांतरकाराने भाषांतर केले की ते वाचकांपर्यंत नेण्याचे काम प्रकाशक करतात. पुस्तकाची निर्मिती करणे म्हणजे अक्षरजुळणी, मुद्रितशोधन, छपाई, वितरण असे टप्पे डाळ्यांसमोर असले तरी त्याआधी भाषांतरित संहितांचे संपादन करून घेणे, त्यांच्यात आवश्यक ते बदल करून घेणे, निर्मितीच्या संदर्भात हक्क मिळवणे, त्याविषयीची कायदेशीर पूर्तता करणे ही कामे प्रकाशकाला करावी लागतात.

*प्रकाशकाच्या दृष्टिकोनातून भाषांतरित साहित्य व त्याचे पुस्तकाच्या बाजारातील स्थान यावर मेहता प्रकाशनाच्या सुनील मेहतांची मुलाखत पुढे दिली आहे.*

**प्रश्न** - विकसित, प्रगत व आर्थिकदृष्ट्या वरचढ असणाऱ्या देशांचे साहित्य कमी प्रगत व गरीब देशांतील भाषांत भाषांतरित होत असते. म्हणजे असं की आपल्याकडे इंग्रजीमधून किंवा परकीय भाषांमधून, युरोपीय भाषांतून भाषांतर होण्याचे प्रमाण मोठे आहे. तुलनेने आपल्याकडचे लोक अजून इतर भाषांत काय होतंय अशी उत्सुकता दाखवत नाहीत. तुम्ही गेली अनेक वर्षे सातत्याने भाषांतरित पुस्तके

प्रकाशित करीत आहात. जी पुस्तकं प्रकाशित होतात, त्यांच्या निवडीमध्ये सांस्कृतिक किंवा आर्थिक वर्चस्वाचा मुद्दा कितपत महत्त्वाचा असतो?


श्री. सुनील मेहता

**उत्तर** - भाषांतर होणं किंवा प्रकाशक जी पुस्तकं भाषांतरासाठी निवडतो, त्यात आर्थिक मुद्दा असेल किंवा संस्कृतीची देवाण घेवाण हा निकषही असेल. एक गोष्ट मला नमूद करावीशी वाटते की, पूर्वी कथा-कादंबऱ्या खूप चांगल्या प्रमाणात वाचल्या जायच्या. त्या कथा जो लेखक लिहायचा तो खूप चांगल्या पद्धतीने, अभ्यासपूर्ण लिखाण करायचा. माझ्या माहितीनुसार १९८५ ते ८८ पासून ९५ पर्यंतचा जो काळ होता तो काळ प्रकाशक काहीतरी पुस्तक काढतो असा होता. क्वचित काही प्रकाशकांनी चांगली पुस्तके बाजारात आणली होती. त्यामुळे त्या सुमारास प्रकाशकाला असं वाटू लागलं की भाषांतर केलं की त्या देशातील, त्या प्रदेशातील संस्कृती, प्रदेशातील काही चांगल्या कथा-कादंबऱ्या ह्या आपल्याकडे निश्चित वाचल्या जाऊ शकतात. म्हणून हा भाषांतराचा ओघ चालू झाला. त्यात काही गोष्टी अशासुद्धा झाल्या की, नव्याने व्यवसायात आलेल्या प्रकाशकांना चांगले लेखक त्याकाळी मिळू शकत नव्हते. जे प्रस्थापित लेखक होते, त्यांचे लेखन, ते लेखन आपापल्या प्रकाशनाकडे बांधलेले होते. त्यामुळे नवीन लेखक शोधणे, त्यांच्यावर काम करणे, संपादन करणे ही जी प्रक्रिया आहे, त्यामध्ये खूप मोठी गॅप पडली होती. तांत्रिक लोक मिळत नसल्यामुळे ही समस्या निर्माण झाली. त्यामुळे प्रकाशकाला साहजिकच वाटलं की आपण भाषांतर प्रकाशित का करू नये? मेहता पब्लिकेशनबद्दल बोलायचं झालं तर माझा पहिला अनुभव म्हणजे १९८० च्या दरम्यान मी एक प्रकाशक म्हणून स्थिर होत होतो, त्यावेळेस माझ्याकडे तसे लेखक कमी होते. जे प्रस्थापित वा नामांकित लेखक होते त्यांच्याकडून काही चांगलं लिहून घेणं हे माझं काम होतं. तेव्हा मला असं वाटलं की नवीन लेखक उभारता नाही येत, मग आपण जर भाषांतरांकडे वळलो, अन्य प्रदेशातील पुस्तकं आपण जर इथे आणली तर ती चांगल्या प्रमाणात विकली जाऊ शकतील. त्याचं कारण, माझं असं स्पष्ट मत आहे

की, आपल्याकडे जे चांगले लेखक आहेत ते सोडले तर बाकीच्यांनी महाराष्ट्राबाहेर काही बघितलेलंच नाहीये. त्यांचा अनुभव महाराष्ट्रापुरताच आहे. त्यात जर लेखकाने लिहायचं झालं तर तो एका मर्यादेपर्यंतच लिहू शकतो. त्याच्या बाहेर नाही. भाषांतर करण्याचा उद्देश असा होता की, इतरांचे जे लिखाण आहे, त्यांनी जी एक स्टोरी मांडलेली आहे, तिच्यात ताकद आहे. समजा इंग्रजीमधले आयर्विंग वॉलेस किंवा रॉबिन कुकसारखे लेखक घेतले तर त्यांच्या लिखाणाची शैली, ताकद ही आपल्या लेखकांच्यापेक्षा खूप जास्त आहे हे लक्षात येते. आपला वाचक काहीकाळ तरी सुहास शिरवळकर वाचत आहे, असा जो वाचक आहे, त्याला पकडण्यासाठी, त्याला खिळवून ठेवण्यासाठी अशी पुस्तकं इंग्लिश पुस्तकं मराठीत आणणं गरजेचं आहे, असं मला वाटलं. म्हणून मी भाषांतराकडे वळलो. प्रादेशिक भाषांतील पुस्तकांचीही भाषांतरं प्रसिद्ध केली. कन्नडमधून अनुवाद करणाऱ्या उमाताई कुलकर्णी किंवा बंगालीमधून अनुवाद करणाऱ्या मृणालिनी गडकरी अजूनही एकहाती हे काम करत आहेत. मला असं वाटतं की या लोकांनी त्यांच्या भाषेतून भाषांतर करणाऱ्या अजूनही काही लोकांना तयार केलं तर अनुवादित पुस्तके मोठ्या प्रमाणात मराठीत येतील.  आपले वाचक ती वाचतील. साहित्याची देवाणघेवाण करणं गरजेचं आहे म्हणून मी भाषांतराकडे वळलो.

**प्रश्न** -थोडक्यात तुम्ही असा मुद्दा अधोरेखित करताय की १९८०च्या दशकात किंवा त्यानंतर मराठीत एक सांस्कृतिक दारिद्र्य किंवा कल्पना दारिद्र्य निर्माण झालं. म्हणजे हा निसर्गाचा नियम आहे. जसे उंचावरून पाणी सखलतेकडे जास्त दाबाने वाहते, तसंच जिथे अनुभवसमृद्ध लिखाण होतंय, तिथून ते आपल्याकडे येऊ लागले; तिथे आपोआपच वाचक आणि प्रकाशक शोध घेत गेले.

**उत्तर** - लेखक अनुभवावरूनच पुस्तक लिहित असतो, पण एखादा सामान्य माणूस असेल किंवा वाचक असेल तर तो देखील त्याचे अनुभव लिहू शकतो. आपलं पुस्तक प्रकाशित करताना, त्याला एक पॅशन पाहिजे. म्हणजे मी लेखक बनू शकतो, मी चांगलं काहीतरी लिहू शकतो हे पॅशन जर त्याच्यात असेल तर तो नक्की चांगलं लिहू शकतो. मी पहिल्यांदा जे पुस्तक काढलं होतं 'नॉट विदाऊट माय डॉटर' ते एका स्त्रीविषयी होतं. ज्या पद्धतीने ती स्वतःला इराणमधून बाहेर काढते, त्याबद्दल होते. अशा प्रकारचे अनुभव आपल्याकडे जास्त आहेत. आपल्याकडे स्त्रियांवरचे अत्याचार किंवा इतर काही गोष्टी होतात. तिकडच्या व्यक्तीप्रमाणे आपल्याकडच्या स्त्रिया किंवा पुरुष लेखनाकडे करिअर म्हणून बघत नाहीत. तिकडे तसं नाहीये. तिकडे या लेखिकेने 'नॉट विदाऊट माय डॉटर' लिहिलं. त्याच्यानंतर कित्येक स्त्रियांनी हिंमत करून तसं लिखाण केलं. त्या सौदी अरेबियातल्या

असतील किंवा इतर देशांतील असतील. कितीतरी अशी पुस्तकं त्या काळात आली. मीच अशी ३०-४० पुस्तकं काढलेली आहेत. तर असा अनुभव असलेल्या व्यक्ती आपल्याकडे नक्कीच आहेत. फक्त लिहिण्याची एक शैली पाहिजे किंवा आपण लिहू शकतो हा आत्मविश्वास पाहिजे.

**प्रश्न** - थोडंसं असं आहे, की आपल्याकडचा एक खूप मोठा समाज दीर्घ काळ काही लिहित नव्हता. तो मोठा समाज आता लिहायला लागला आहे आणि एक मोठी लाट वाङ्मयात आली आहे असं म्हणायला हरकत नाही. अशा प्रकारचे विविध अनुभव असणारी माणसं भाषांतरित पुस्तकांपासून काही प्रेरणा घऊन म्हणा किंवा अशा प्रकारच्या अनुभवांना आता व्यक्त करायला जागा मिळतेय या भावनेने म्हणा, असं लिखाण करू लागली आहेत, असं काही म्हणता येईल का?

**उत्तर** - असं लिहिणाऱ्यांचं प्रमाण वाढलंय हे नक्की आहे. पण त्यांच्या लिखाणाची जी शैली आहे ती वाचकांना अजून भावत नाहीये. किंवा ती त्या ताकदीची वाटत नाहीये. त्यामुळे मला असं वाटतं की, ते लिखाण जरा पाठीमागे पडतंय. पण हे जे अनुभवविश्व असतं ते प्रत्येकाचं वेगवेगळं असतं. ते वेगवेगळ्या पद्धतीनं मांडण्याची कलाही त्या व्यक्तीमध्ये असली पाहिजे. जर ती कला नसेल तर ती प्रयत्नपूर्वक आत्मसात करायला हवी किंवा कोणाकडून तरी लेखन करून घ्यायला हवे. कोणाकडून तरी संपादन करून घ्यायला हवे. ही जी कला आहे, ही जी शैली आहे ती लोकांना अजूनपर्यंत दिसलेली नाही. आज काही प्रकाशक असे आहेत की ज्यांच्याकडे संपादक आहेत पण ते संपादक व्यावसायिक झालेले नाहीत. त्यामुळे हा प्रॉब्लेम असण्याची शक्यता आहे असं मला वाटतं. तुम्ही जर एखादा चांगला संपादक निवडला, त्या ताकदीचं पुस्तक जर तुम्ही लिहून घेतलं, त्या ताकदीने ते पुस्तक तुम्ही सादर केलं तर आपल्याकडचे अनुभव परदेशातल्या लोकांच्या अनुभवापेक्षा जास्त वाचकांपर्यंत जातील. आपल्याकडे समस्या आहेत, प्रश्न आहेत, दारिद्र्य आहे, त्यांच्यापेक्षा आपल्याकडे जास्त दुःख आहे. पण या अनुभवांवर तितकेसे लिहिले जात नाही.

**प्रश्न**- लोकांना वाचायची जी उत्सुकता आहे ती साधारणपणे कशा पद्धतीची आहे? अमेरिकन वाङ्मय आम्हांला वाचायचं आहे, किंवा ऑस्ट्रेलियन वाचायचं आहे इतक्या सजगपणे मराठी वाचक त्याच्याकडे पाहतो का? जागतिकीकरणाचा एक परिणाम म्हणू या, की मला इडली-डोसा पण आवडतो, पिझ्झापण आवडतो. म्हणजे नेहमीच्या वरण-भात-भाजीपेक्षा वेगळं काहीतरी आम्हांला मिळतंय म्हणून मी आज तिथे जाऊन ते चापून पाहतो एवढाच उद्देश आहे का? की वाचकांची

वाचनजाण वाढीला लागली आहे? सगळी पुस्तकं यावीत. मग ती बेस्टसेलर असोत किंवा परकीय भाषांमधील अभिजात पुस्तकं असोत, त्यातनं हळूहळू वाचकांची जाणीव समृद्ध होत जावी अशी काही चिन्हं तुम्हाला दिसतात का?

**उत्तर** - तो प्रश्न मला असा वाटतोय की आपला वाचक पुस्तक वाचतोय का? असं तुम्हाला अभिप्रेत आहे. तसे असेल तर १९९० पासून आपल्याकडे वाचक उदंड आहे. आपल्याकडे जी लोकसंख्या आहे तिची अभिरुची बदलू शकते. त्या नुसार प्रकाशकांनी, लेखकांनी त्यांना पुस्तके द्यायला पाहिजेत. आपल्याकडे वाचक कमी झाला आहे असं मला तरी काही दिसत नाही आणि याची शक्यता पुढेही दिसत नाही, कारण असं की कुठल्याही आर्थिक मंदीच्या काळात पुस्तकासारखा मित्र तुमच्याकडे कधीही नसतो. आपण डिप्रेशनमध्ये, दुःखात किंवा अडचणीत असलो तर ही पुस्तके आपल्याला काही ना काहीतरी देतात. नैराश्य पूर्णपणे नाहीसं होतं असं नाही पण अशा परिस्थितीत विचार करण्याचा मार्ग तुम्हाला पुस्तकांतूनच मिळू शकतो. म्हणून वाचन कमी होईल अशी शक्यता मला दिसत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे पुस्तके वाचण्याचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. त्यांची आवड बदलली आहे. आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रादेशिक किंवा कुठल्याही प्रदेशाची लोकसंख्या अफाट आहे. त्यामुळे त्यांच्या आवडीनुसार पुस्तके उपलब्ध करून देणं हे प्रकाशकांचं आणि लेखकाचं कर्तव्य आहे.

**प्रश्न** - आजकालचा वाचक हा पुस्तकांकडे एक ग्राहक म्हणून पाहतो असं म्हटलं जातं, पूर्वीच्या वाचकांचा पुस्तकाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यात ज्ञानसंपादन किंवा ग्रंथांविषयी आदराची भावना असेल किंवा थोडासा अभिजाततेचा प्रभाव असेल. आजकाल वाचक हा जसा ब्रँडेड साबण घेईल किंवा ब्रँडेड टी- शर्ट घेईल तसाच तो एखादे पुस्तक घेईल. त्यामुळे त्याला फक्त चार घटका मनोरंजन करणारं पुस्तक हवंय, माहिती देणारं पुस्तक हवंय की गंभीर वाचनामध्ये त्याला रस आहे असं काही दिसतं का? की सरसकट सगळंच वाचलं जातंय?

**उत्तर** - जुन्या पिढीबद्दल मला एक म्हणायचं आहे की जुन्या पिढीतला वाचक असो, प्रकाशक असो तो पूर्णपणे व्यावसायिक नव्हता. आज त्याला व्यावसायिकतेचं स्वरूप आलेलं आहे. त्यामुळे तुम्ही त्या त्या दर्जाची पुस्तकं देऊ शकता. तो दर्जा ओळखणं, त्या वाचकांपर्यंत तुम्ही पोहोचणं हे महत्त्वाचं झालं आहे. जुन्या काळातली आणि आताच्या काळातली आवड बदललेली आहे. तंत्रज्ञानात बदल झाला आहे. त्यानुसार प्रकाशकाला, लेखकाला वाचकांनुसार बदलणे खूप गरजेचं आहे.

**प्रश्न** - तसा बदल मराठी पुस्तकव्यवहारात घडला नसल्यामुळे आज एवढ्या मोठ्या प्रमाणात भाषांतरं होत आहेत का?

**उत्तर** - मला नाही असं वाटत. समजा मॅनेजमेंटमधील पुस्तकं आहेत एक वाचकवर्ग असा आहे की तो मॅनेजमेंटची पुस्तकं मोठ्या प्रमाणात वाचतो. त्यामुळे ही मॅनेजमेंटची पुस्तकं त्या क्षेत्रातली व्यक्ती लिहू शकतात. आपण बघतो की आपल्याकडचे लोक भारताबाहेर अमेरिका किंवा इंग्लंडमध्ये असतात. उदा. दीपक चोप्रा. आपल्याकडे लेखक नाहीत असे नाही. पण असा समज आहे की मॅनेजमेंटची पुस्तकं म्हणजे परदेशातली पुस्तकं. किंवा परदेशातला लेखक जे आपल्याला सांगतो ते योग्य आहे. तर तसं न करता आपल्या लेखकांनी इथल्या संदर्भानुसार मॅनेजमेंटचं पुस्तक लिहिलं तर त्याला एक वेगळं महत्त्व येईल. म्हणून आपल्या लेखकांनी त्या त्या काळानुसार पुस्तकं लिहिणं आणि ती वाचकांपर्यंत पोहोचवणं हे महत्त्वाचं आहे.

**प्रश्न** - दीपक चोप्रा इंग्रजीमधूनच लिहितात. कदाचित असं आहे का, इंग्रजीमधून लिहिलं म्हणजे तुम्हांला मिळणारे महत्त्व आणि त्यातून मिळणारे आर्थिक उत्पन्न मराठीच्या तुलनेत बरेच जास्त आहे किंवा कुठे त्याची तुलनाच नाहीये. असं असल्यामुळे मराठीत किंवा भारतीय भाषांतून लिहिण्याकडे भारतीय किंवा मराठी लेखकांचा कल नाही असं तर नाही?

**उत्तर** - तिकडच्या प्रकाशकांकडे लेखकांकडून काही गोष्टी, पुस्तके लिहून घेण्याची ताकद आहे; मग आपल्या प्रकाशकांकडे ती का नाही? आपण कमी पडतोय. आपलं इन्फ्रास्ट्रक्चर किंवा अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिस कमी पडतंय. आपल्याकडे त्या प्रकारचे व्यावसायिक लोक मिळत नाहीत किंवा नेमले जात नाहीत. प्रकाशकाने एखाद्याला असाइनमेंट देणं किंवा एखाद्याकडून पुस्तकं लिहून घेणं आणि ती प्रकाशित होणं ही जी प्रकाशनाची साखळी आहे ती आपल्याकडे नाही. उदा. जेफ्री आर्चरना मागे भेटलो होतो तेव्हा मी त्यांना सहज विचारलं, How do you write so many books in a year? ते म्हणाले, There is a system where we make a plot, we 5-6 people work on it together. They combine all those things and and i get all those things finalised" ही जी व्यवस्था आहे ती आपल्याकडे नाही, ती माझ्याकडचा एखादा लेखक असेल तर त्याच्याकडे पाच सहा माणसं काम करणारी असतील का? ती काम करणारी आहेत का? लेखक त्यांचा शोध घेऊ शकणार आहे का? ही त्यातील महत्त्वाची गोष्ट आहे. त्या लेखकानं त्याचं काम वेळेत केलं आणि इतरांची कामं आर्थिकदृष्ट्या सांभाळून घ्यावी लागतील असं सांगितलं तर त्या लेखकाची पुस्तकं अधिक प्रमाणात येतील.

परदेशापेक्षा आपल्याकडे पुस्तकं जास्त निघतील.

**प्रश्न** - याच अनुषंगाने २ मुद्दे. पहिला मुद्दा - क्षमतांचा विकास करणे हा. चांगले संपादक पाहिजेत म्हणजे वाङ्‌मयाची जाण असणारे आणि त्यांच्यामध्ये काम करू शकणारे. आपल्याकडे आपण असं बघतो की मोठे मोठे नामांकित लेखक चांगली पुस्तके लिहितात पण ती जेव्हा प्रकाशित होतात तेव्हा ती संपादित केलेली असती तर अजून प्रभावी, अधिक चांगली झाली असती असं मला वाटतं. तर ही क्षमता विकसित करणं हे प्रकाशकाचं काम आहे. तसंच भाषांतरकाराची क्षमता विकसित केली तर भाषांतर अधिकाधिक चांगले होईल. त्यादृष्टीने तुम्ही काही प्रयत्न केलेत का? आणि असे प्रयत्न व्हायला हवेत असं तुम्हाला वाटतं का?

**उत्तर** - माझ्याकडे हे काम होतं. नवीन अनुवादक असेल तर एखादं प्रकरण भाषांतर करून घेतो. मग ते संपादित करून घेतो आणि नंतर त्यावर काम करायचं की नाही हे ठरवतो.

एक खूप मोठं पुस्तक आमच्याकडं आलं. त्याचा भाषांतरकार आमच्याकडं येऊन गेला होता. आम्ही असाइनमेंट दिली. त्याने ते भाषांतर करून आणून दिले, पण आम्हाला ते आवडलं नाही. म्हणून आम्ही ते नाकारलं. आणि त्या व्यक्तीने जे दुसरं पुस्तक केलं होतं त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. पण मी काही लोकांना विचारलं की या पुस्तकाचं भाषांतर कसं झालं आहे तर त्या लोकांनी फीडबॅक दिला की ते भाषांतर अत्यंत वाईट झालेलं आहे. कारण तो त्या क्षेत्राशी संबंधित नव्हता. तरीही त्याने ते केलं. करायचं म्हणून केलं. तो माणूस काल-परवा माझ्याकडं येऊन गेला आणि म्हणाला तुम्ही मला पहिल्यांदा फीडबॅक दिला म्हणून मी लक्षपूर्वक भाषांतर केलं. मग मी त्याला एक नवी असाइनमेंट दिली. माझ्याकडे भाषांतर करणारी टीम अशी झाली आहे की, तिच्यावर फार काम करायला लागत नाही. आम्ही वाक्यरचनेत बदल करीत नाही. पण शब्दांवर काम करतो. वाक्यरचनेपेक्षा योग्य, अचूक शब्द देणे हे खूप महत्त्वाचं असतं. म्हणजेच काय तर अशी भाषांतरं करून घेऊन त्यावर पुन्हा थोडंफार काम करावं लागतं. पण भाषांतरकारावर विश्वास ठेवून त्याला काम दिलं पाहिजे.

**प्रश्न** - कॅपॅसिटी बिल्ड करण्यासाठी काही कार्यशाळा घेता का? मार्गदर्शन करता का किंवा किंवा व्यक्तिशः तुम्ही काही बघा, वाचा असं भाषांतरकारांना सांगता का?

**उत्तर** - मराठी प्रकाशन व्यवसायविश्व हे इतकं लहान आहे, की मी कुठे,

कोणाला तयार केलं आणि त्याने दुसरीकडे जाऊन भाषांतरासाठी असाइनमेंट घेतल्या , तर मॉनिटरी स्पर्धेत मी मागे पडतो. प्रत्येक प्रकाशकानं आपलं आपलं काम करावं अशी माझी इच्छा आहे. मध्यंतरी एक बाई भेटल्या. त्यांनी पुण्यातील एका प्रकाशनासाठी काम केलंय. त्यांनी मला एक पुस्तक भाषांतरित करून दिलं. त्यावर आम्ही संस्कार करून ते प्रकाशित करतो या विश्वासाने त्या बाईंनी आम्हाला दिलं. एक प्रकाशक म्हणून मी डोळे झाकून भाषांतर स्वीकारत नाही. मी मेहनत घेतो. म्हणजेच ती मेहनत जर त्या त्या प्रकाशकाच्या पुरती असेल, आऊटसोर्स होत नसेल तर त्याचा फायदा आहे. ज्या दिवशी हे सगळं चालू होईल त्या दिवशी माझ्याकडं भाषांतर राहणार नाहीत. कारण माझ्याकडं इतकं काम आहे. इतर लोकांकडे काम कमी असते त्यामुळे वर्षातून ३-४ पुस्तकं करणंच शक्य आहे. माझ्याकडं मी एका भाषांतरकाराकडून ५-६ पुस्तकांची अपेक्षा करतो. तो भार त्याने पेलायला पाहिजे. त्याच्याकडे त्याने करियर म्हणून बघितलं पाहिजे. पॅशन पाहिजे त्यामध्ये.

**प्रश्न** - पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने भाषांतराचा अभ्यासक्रम जाहीर केला आहे किंवा एसएनडीटी तर्फे अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुचविण्यात आला होता. मग अशा पद्धतीचे तज्ज्ञ जर अशा शैक्षणिक संस्था तयार करत असतील तर त्याचा सर्वच प्रकाशकांना थोडाफार फायदा होईल, नाही का?

**उत्तर** - मला असं वाटतं, की जर एका भाषांतरामागे वर्षात जर तुम्ही २-३ लाख मिळवत असाल तर अशा परिस्थितात तुम्ही ते करू शकता. एखादी व्यक्ती घरी बसलेली आहे. तिला भाषांतर करण्याची इच्छा आहे, रस आहे, तिची भाषांवर चांगली कमांड आहे तर ती हे पॅशन म्हणून करू शकते. करियर म्हणून करायचं असेल तर तुमच्याकडे असिस्टंट पाहिजे. किंवा असिस्टंट नेमण्याची ताकद पाहिजे. किंवा त्या भाषांतराला चांगले रूप देण्याची ताकद प्रकाशकाकडे पाहिजे. प्रकाशक म्हणून तो असिस्टन्स मी देऊ शकतो. पण तेवढी ती व्यक्ती माझ्याशी प्रामाणिक राहिली पाहिजे. तर ते हाऊ शकेल. आज परदेशातला लेखक म्हणजे रॉबिन कुक असेल, डॅन ब्राऊन असेल, तो इतर कोणत्याही अन्य प्रकाशकाकडे जात नाही. असं आपल्याकडं होईल असा माझा विश्वास अजून तरी नाहीये. आणि हे ज्या दिवशी होईल, कदाचित त्या दिवशी ते 'ओपन मार्केट फॉर एव्हरीबडी' होईल आणि मग त्यावेळी लोक करियर म्हणून त्याच्याकडे बघू शकतील. विद्यापीठ किंवा एसएनडीटी हे काम करत आहेत  जर त्यांनी करीयर ओरिएंटेड कोर्स म्हणून त्या व्यक्तीला शिकविले तर कदाचित ते वाढेल. पण आत्तातरी हे सर्व प्राथमिक टप्प्यात आहे.

प्रकाशन व्यवसायाविषयी विद्यापीठाने पुढाकार घेऊन काही करण्याचा प्रयत्न केला होता, पण मला नाही वाटत की तसं काही हाऊ शकेल. हे प्रकाशकांचं, लेखकाचं किंवा भाषांतरकारांना एकत्र करण्याचं काम आहे. हे कुठलीही संस्था करू शकणार नाही. कारण आपल्याकडं  प्रकाशन व्यवसायात आज तुम्ही म्हणता तसे काही लोक व्यवस्थापक म्हणून तुम्हाला नेमायचे असतील तर त्या दृष्टीने अनुभव असलेले लोक तुम्हाला मिळत नाहीत. त्या दृष्टीने लोकांना तुम्हाला तयार करावं लागतं. तर मग मी असं म्हणेन की प्रकाशन व्यवसायात ह्यांची किती गरज आहे आणि त्यात करिअरवाल्यांची किती गरज आहे हे प्रथम बघा. तिथून तुम्ही सुरुवात करा. मग कदाचित हे लोक व्यवस्थापकीय  म्हणून तयार होतील. दे विल मोटिव्हेट दोज ट्रान्सलेटर्स ऑफ द ऑथर. तर मग अशी साखळी चालू होईल.

**प्रश्न** – जी भाषांतरे व्यावसायिक असतात त्यांच्या गुणवत्तेविषयी सतत कठोर चिकित्सा होत असते. तुलनेने मराठीत भाषांतरित होणाऱ्या पुस्तकांचा दर्जा हा तितकासा चांगला असत नाही. परदेशात एखाद्या प्रसिद्ध लेखकाच्या - जसे ओरहान पामुक - पुस्तकाचे अनेक भाषांत भाषांतर होतं. तेही पुस्तकाच्या आगेमागेच प्रकाशित होतं. याचं कारण व्यावसायिक, तांत्रिक भाषांतरकाराला जो मोबदला मिळतो तेवढाच मोबदला साहित्याचे भाषांतर करणाऱ्यालाही मिळतो. आज व्यावसायिक भाषांतरकार एका शब्दाचे ३ ते ५ रुपये इतका मोबदला घेतो. जर तेवढाच मोबदला साहित्याच्या भाषांतरकाराला मिळाला तरच गुणवत्ता सुधारेल. याबद्दल तुम्हाला काय वाटतं?

**उत्तर** - आज मी जे मानधन अनुवादकांना देतो त्यामुळेच १२० लोकांची टीम माझ्यासाठी काम करतेय. मानधन वाढवायला पाहिजे, पण त्यात आर्थिक गोष्टी गुंतलेल्या असतात. परदेशी प्रकाशकांना आगाऊ मानधन द्यावे लागते. आर्थिक गणितामध्ये ते पुस्तक बसविणं अवघड असतं. तांत्रिक अनुवाद असतो ते लोक प्रचंड प्रमाणात पैसे मोजायला तयार असतात पण हा व्यवहार १/२ महिन्यांचा असू शकत नाही. पण त्यातसुद्धा काही अनुवादक असे असू शकतात की, जे काही वेळ तांत्रिक अनुवादाला आणि काही काळ ललित पुस्तकाच्या अनुवादाला देऊ शकतात. तेव्हा अशा लेखकांनी किंवा अनुवादकांनी जर हे काम केलं तर ते जास्त प्रोफेशनली होऊ शकेल. हे दोन्हीकडून तुम्हाला अनुभवायला मिळेल.

**प्रश्न**- अमेरिकेतला किंवा युरोपातला प्रकाशक जास्त ऑर्गनाइज्ड आहे. तो जास्त व्यावसायिक असल्यामुळे आणि डॉलर आणि रुपया या किंमतीत जो काही

फरक आहे, त्यामुळे आपोआपच पुस्तकांचे हक्क मिळवणं किंवा कॉपीराईटसाठी पैसे देणे खर्चिक होतं, आणि त्यामुळे आपोआपच अनुवादित पुस्तकांच्या किंमती थोड्याशा वाढतात का? दुसरीकडे पाहता भारत आणि भारतीय भाषांतली पुस्तकं याविषयी थोडंसं कुतूहल आता युरोपमध्ये किंवा अमेरिकेमध्ये वाढत आहे. तर मग देशीकडून विदेशीकडे असा प्रवास तुमच्या डोक्यात आहे का?

**उत्तर** - ते लोक आपल्यापेक्षा काही खूप जास्त ऑर्गनाइज्ड आहेत असं मला वाटत नाही पण ते चांगल्या रीतीने स्वतःचे काम दाखवत आले आहेत. पुस्तकाच्या किंमतीचे विचाराल तर - दहा हजार किंवा अगदी पाच हजार प्रती तुम्ही विकू शकलात तर कॉपीराईटस् किंवा इतर खर्चासाठी भरलेले पैसे तुम्हाला परत मिळतील. कारण आज वाचकांची संख्या वाढलेली आहे. पण प्रकाशक स्वतःची बुकशॉप चेन किंवा बुकशॉप सेल निर्माण करू शकला नाही. मी अजून इंटिरियरपर्यंत पोहोचू शकलो नाहीये. मी परवा परदेशातील एका व्यक्तीशी बोलत होतो. त्याने मला सांगितलं की फ्लिपकार्टवर मराठीचा वाचक जो येतो तो १० हजाराच्या संख्येने येतो. आपण जर असं म्हटलं की दहा हजार वाचकांपैकी पाच हजार वाचक पुस्तक खरेदी करत असतील तर पुस्तकाची किंमत जरी तुम्ही १०० रुपये ठेवली तरी पाच लाख रुपये तुम्ही मिळवाल. हा व्यवहार फ्लिपकार्टकडून होऊ शकतो. मग त्या त्या प्रकाशनाकडे का होऊ शकत नाही? त्याचं कारण असं आहे की मी प्रकाशक म्हणून तिथपर्यंत पोहोचलेलो नाही. माझी स्वतःची वेबसाइट चालू असताना फ्लिपकार्टची साईट जास्त वेळा उघडली जाते आणि तिथे माझीच पुस्तकं विकली जातात. याचा अर्थ असा आहे की आपण पूर्णपणे व्यावसायिक विक्री करत नाहीये. तुमची चेनशॉप मेलिंग लिस्ट जबरदस्त असली पाहिजे. वाचकांपर्यंत तुम्ही जायला पाहिजेत. ही कारणं आहेत, त्यामुळे या पुस्तकांच्या किंमती वाढत आहेत. पण वेळ जसा जाईल तसा कदाचित हा व्यवहार बदलत जाईल. आज इ-बुक्सचा जमाना आहे.

**प्रश्न** - अनुवादित पुस्तकांमध्ये कथा कादंबरी यांच्याबरोबर इतर बऱ्याच पुस्तकांचे अनुवाद तुम्ही केलेले आहेत. त्याच्यात तुम्हाला असं लक्षात येतं का की कथा-कादंबऱ्यापेक्षा अनुवादित स्वरूपातसुद्धा इतर गोष्टींकडे वाचकांचा कल जास्त आहे.

**उत्तर** - हो, आहे. खूप आहे. डॅन ब्राऊन सारख्या लेखकांची, किंवा इतर बेस्ट सेलर वाचली जातात. औद्योगिक पुस्तकं आहेत ती देखील वाचली जातात. ही पुस्तकं चालतील की नाही, विकली जातील की नाही हा विचार न करता हे पुस्तक माझ्या मराठी वाचकाने वाचलं पाहिजे, विषय त्याच्यापर्यंत पोहोचला पाहिजे हा

विचार करून मी ते पुस्तक काढतो. त्यात कमर्शिअल भाग असतोच पण त्याचबरोबर समाजाला आपण काहीतरी चांगलं देत आहात याचं समाधान आपल्याला मिळतं. म्हणजे एखाद्या पुस्तकाला भरपूर पैसे मिळत नाही, ते विकलं जाईल का नाही हे माहीत नसतं, तरी त्यात समाधान असं की हे काहीतरी वेगळं आहे.

**प्रश्न** - मराठीतील पुस्तकं तिकडे जावीत यासाठी काही योजना आहेत का?

**उत्तर** - मराठीत अशी पुस्तकं प्रचंड प्रमाणात आहेत जी इतर भाषांमध्ये जाऊ शकतात. आमच्या इथं प्रकाशक काय करतात की मला पैसे माझ्याकडे आणायचेत पण ते दुसरीकडे गुंतवायचे नाहीत. प्रोफेशनॅलिझमध्ये तुमचे पैसे तुमच्या धंद्यात भांडवल म्हणून खेळते राहिले पाहिजेत. ज्यामुळं तुमचे अॅडमिनिस्ट्रेशन तरले पाहिजे, त्यामुळे अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिस वाढेल, डिव्हिजन वाढेल, सेक्शन वाढेल त्या पद्धतीने तुम्ही काम देऊ शकाल. तर डिव्हिजन म्हणून जे वर्क आहे त्यात आपण कमी पडत आहोत. आम्ही म्हणजे मेहता प्रकाशन आता हे इंग्लिश सेक्शन आणि रिव्हर्स काम चालू करत आहोत. एक वर्षभरात सुरू होईल.

**प्रश्न** - तुम्हाला तुमच्या प्रोजेक्टला शुभेच्छा. त्या निमित्ताने मराठीसुद्धा बाहेर गेलं तर ती अतिशय आनंदाची गोष्ट ठरेल.


**उत्तर** - काही प्रदेशांत लेखकांची चणचण आहे. फ्रेंचमधले काही प्रस्थापित लेखक होते ना तिथंसुद्धा आम्हाला तुमचं साहित्य द्या असं म्हणतात. पण आम्ही देत नाही कारण आमच्याकडं प्रोफेशनॅलिझम नाही, कॅटलॉग नाही, पुस्तकांचे सिनॉप्सिस नाहीत. लेखक त्याच्यावर मेहनत घ्यायला तयार नाहीत. सारांश लिहून आणून द्या म्हटले तर हे करायलाही लेखक तयार नाही. इंग्रजी ग्लोबल भाषा आहे. त्यात कोणीही काम करू शकतं. आपल्याकडे प्रादेशिक भाषेमध्ये काम करणं हे एकमेकांच्या मदतीने होऊ शकतं. रिव्हर्स ट्रान्सलेशन डिव्हिजन उभी करण्यासाठी त्या त्या लेखकांनी तसा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येकाच्या मदतीने हे काम होऊ शकतं. एकमेकांच्या मदतीशिवाय हे होऊ शकणार नाहीये. एखाद्या प्रकाशकाचं असं सेक्शन, डिव्हिजन उभारण्यासाठी लेखकांनीही थोडं योगदान देणं गरजेचं आहे.

शब्दांकन : सायली नागदिवे

(केल्याने भाषांतर - जानेवारी मार्च २०१२च्या सौजन्याने)

❒

**आगामी**




# अण्णा हजारे

संपादक **प्रदीप ठाकूर/ पूजा राणा**

अनुवाद

**धनंजय बिजले**

१२५रु. - सभासदांना सवलतीत

भारतीय राजकारणातील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुकारलेल्या लढ्याचा सर्वांगीण ऊहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध कडक पावले उचलण्यासाठी, भ्रष्ट नोकरशहांना लगाम घालण्यासाठी आतापर्यंत कोणती विधेयके आणण्यात आली याचा इतिहास या पुस्तकात दिला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध कडक कायदा आणण्यात ज्यांनी अडथळे आणले त्यांच्याविरुद्ध अण्णा हजारे यांनी व्यापक जनआंदोलन केले. यामुळे यासंदर्भातील विधेयक संसदेत मांडणे किती तातडीचे आणि आवश्यक आहे, हे खासदारांना उमगले. सार्वजनिक क्षेत्रात भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांविरुद्ध कारवाई करण्यास सध्याच्या कायद्यात कशा त्रुटी आहेत, यावरही हे पुस्तक प्रकाश टाकते.

अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिद्धी या गावातील यादवबाबा मंदिरास लागून असलेल्या एका छोट्या खोलीत अण्णा राहतात आणि केवळ खादी परिधान करतात. मात्र अण्णा हजारे जेव्हा आंदोलन सुरू करतात तेव्हा मुंबईपासून दिल्लीपर्यंत सर्व नेत्यांना त्याची दखल घ्यावीच लागते. देशभरातील सामान्य लोकांना एकत्रित करण्याची आणि सरकारला हादरा देण्याची क्षमता केवळ या एका व्यक्तीमध्ये आहे, ही वस्तुस्थिती त्यांचे विरोधक टीकाकारही मान्य करतात. १९७५मध्ये सार्वजनिक जीवनात आल्यापासून त्यांनी अनेक वेळा उपोषणे, आंदोलने करीत महाराष्ट्र पिंजून काढला. याचा त्यांचा शरीरावर तसेच प्रकृतीवरही परिणाम झाला. मात्र मानवसेवा हे त्यांच्या जीवनाचे ध्येय कायम राहिले. अण्णा हजारे भ्रष्टाचारविरोधी लढ्याचे प्रतीक बनले आहेत. 'आधुनिक भारताचे गांधी' अशीच त्यांची ओळख झाली आहे.

# अभिप्राय

## **वेचक कथांचा वेधक अनुवाद :** कथा गुर्जरी

मानवी भावभावना या सर्वत्र सारख्याच! त्यांना देश, प्रांत, भाषा यांसारखी भौतिक बंधने मंजूर नसतात. त्या कालातीत असतात. मानवनिर्मितीपासूनच या भावभावनांचा आविष्कार होऊ लागला; तो आजही सर्वदूर दिसून येतो- केवळ प्रकटीकरणाचे मार्ग मात्र अलग!




गुजरात प्रांत महाराष्ट्राचा भाईप्रांत! मराठी भाषेला जवळ जाणारी अशी तेथील गुजराती भाषा. अशा या गुजराती भाषेतील निवडक कथांचा अनुवाद सिद्धहस्त लेखिका अंजनी नरवणे यांनी मराठी वाचकांपुढे ठेवला आहे. मराठी वाचकांनी या कथांचा आस्वाद जरूर घ्यावा. विविध भावलहरींना स्पर्श केल्याचा सुखद अनुभव मिळेल.

निरनिराळ्या लेखकांच्या कथा निवडून त्यांचा मराठी अनुवाद करताना अंजनी नरवणे यांनी प्रत्येक कथेच्या सुरवातीला त्या त्या कथालेखकाचा अल्प परिचय दिला आहे. त्यामुळे आपल्याला आपण कोणाची कथा वाचत आहोत हे सहज समजते.

'व्हिजिट' ही कथा एका स्त्रीचे बाह्यवर्तन व मनोव्यापार यांची संदिग्धता दर्शविणारी आहे. पती व मुलगा पुरामध्ये वाहून गेल्यावर निर्धन, निर्विकार, अबोल झालेली वृद्धा- म्हातारी. स्वतःचे दुःख विसरून सर्वांच्या अडीअडचणीला धावून जाते- मग कोणाकडे मयत झालेली असो वा नवीन बाळ जन्मलेला असो! सर्वांना या म्हातारीची आठवण होतच असते नि ती निर्विकारपणे नवीन 'व्हिजिट' स्वीकारत असते.

प्रवीणसिंह चावडा यांची ही मूळ कथा असून, त्या कथेचा लेखिकेने केलेला सुरेख अनुवाद वाचायला मिळतो. त्यांचीच 'ऋण' ही कथाही अशीच बाप-लेकांच्या अनोख्या नात्याची, अनपेक्षित वळण घेत जाणारी हृदयस्पर्शी कथा. 'मल्हार' ही कथाही अशीच अनोख्या मनोव्यापाराची साक्ष देणारी.

धीरूबहेन पटेल यांची 'कहाणी वडाच्या लाडक्या मुलाची' ही आपापसांतील लहानसहान फरकांसाठी मारामाऱ्या करणाऱ्या मुलाची कथा!

वाईट संगतीमुळे वाईट मार्ग हाताळताना स्पर्शामुळे आलेली जाग 'स्पर्श' या कथेत वाचायला मिळते.

रवींद्र पारेख यांच्या चाकोरीबाहेरील विषयांवरील, वास्तवाचे भान करून देणाऱ्या 'मर्म' व 'झाड' या कथा अशाच एका नव्या विश्वात घेऊन जातात.

'अकूपार'- ज्याच्या पाठीवर पृथ्वी उभी आहे ते काल्पनिक कासव! ध्रुव भट्ट यांची ही आगळीवेगळी कथा.

वर्षा अडालजा यांच्या 'आजामिया', 'अंकुर', 'वावली' या कथाही हृदयस्पर्शी व वेगळ्या विषयांना स्पर्श करणाऱ्या आहेत.

माजी माहेश्वरी यांची 'वेदना' ही कथा- शहरी जीवनातल्या प्रेमविवाह करून माहेर दुरावलेल्या युवतीच्या मन:स्थितीचे वेधक चित्र निश्चित भावेल.

हिमांशी शेतात या लेखिकेच्या 'वर्षश्राद्ध', 'ते लोक', 'एपिसोड नं. एक्कावन्न' या कथा निरनिराळ्या भावविश्वात घेऊन जातात.

जोसेफ मकवान यांची 'उगाच हेलपाटा' हृदयस्पर्शी नाट्यपूर्ण कथा; या इला आरब मेहता यांच्या 'मी माझ्या सोबतीनं', 'शेवटचा शॉट' या विचार करायला लावणाऱ्या कथा; रमेश दवे यांची 'जाब विचारतंय माझं मन!' ही हृदयात खळबळ उडवून देणारी कथा; हरीश नाग्रेचा यांच्या 'ॲन अफेअर,' 'उद्ध्वस्त' वेगळ्या विश्वात घेऊन जाणाऱ्या कथा; जनक त्रिवेदी यांची 'लफंगा' ही एका जगावेगळ्या, विक्षिप्त, संशयास्पद वाटाव्या अशा माणसाची कथा; उत्पल भायाणी यांच्या 'बदल', 'नारायण! नारायण!' या कथांमधून समाजातील आजच्या परिस्थितीचे वास्तव वर्णन वाचायला मिळते; भगवतिकुमार शर्मा यांची 'घटनेनंतरची घटना' ही अर्थपूर्ण कथा; धीरेंद्र मेहता यांची 'निवडण' ही स्त्रीमनाची वास्तवता दाखविणारी कथा; 'सुरवात' ही हृदयस्पर्शी कथा आणि दिनकर जोषी यांची एका विलक्षण स्त्रीचे दर्शन घडविणारी कथा- या कथांच्या चित्रणातून वाचकाला निरनिराळ्या भावविश्वात घेऊन जाणारी अंजनी नरवणे यांची अनुवादशैली निश्चितच मनाला भावून जाते. कथालेखक वेगळे व अनुवाद करणाऱ्या वेगळ्या आहेत हे कथा वाचताना लक्षातच येत नाही, एवढी एकरूपता, तादात्म्य अपूर्वच!


**डॉ. अपर्णा राईरीकर**

दै. सकाळ, दिनांक -२२/०१/२०१२

❐

# ताजेपणाचा नवखा गंध
## द फाऊंटन्स मॅजिक

परदेशी स्थायिक झालेल्या भारतीय लेखकांनी जागतिक इंग्रजी साहित्यात स्वत:चे असे खास स्थान निर्माण केले आहे. भारतात अद्यापही पाळेमुळे रोवलेल्या अरुंधती रॉय सारख्यांचे नावही खऱ्या अर्थाने 'ग्लोबल' झाले आहे. दुसरा एक प्रवाह अन्य देशातंल्या लेखकांच्या इंग्रजी पुस्तकांच्या भारतीय भाषांमधील अनुवादाचा आहे. या पुस्तकांना वाचकांची पसंतीही आहे. तिसरा प्रवाह भारतीय वाचकांसाठी जुंपा लाहिरी, चेतन भगत सारख्या भारतीय लेखकांनी केलेल्या भारतीय पार्श्वभूमीवरील इंग्रजी लेखनाचा आहे. गेल्या काही वर्षात आपल्या देशात इंग्रजी माध्यमाचे शिक्षण वाढल्यामुळे तरुण पिढीचा कल इंग्रजी वाचनाकडे झुकलेला आहे. त्यामुळे नव्या पिढीतील ताज्या दमाचे लेखक आत्मविश्वासाने इंग्रजीत लिखाण करू लागले आहेत.




मारया राहटोर यांच्या 'द फाऊंटन मॅजिक' मध्ये याच नवखेपणाचा आणि ताजेपणाचा गंध आपल्याला येतो.

तशी ही छोटेखानी कादंबरी फार गुंतागुंतीची नाही.

माया आणि तिचे छोटेसे जग 'लग्न' नावाच्या गोष्टीने कसे बदलून जाते याचे चित्रण यात आहे. माया, तिची आई आणि बहीण यांचे इवलेसे विश्व आहे. मायाचे वडील तिच्या आईपासून विभक्त झाले आहेत. त्यामुळे तिच्या आयुष्यात पुरुष व्यक्तीचे अस्तित्वच नाही.

कॉलेज संपवलेल्या मायाला आईबहिणीसह फिरायला जायची संधी मिळते. कडाक्याच्या थंडीतही ज्या कारंज्यामधले पाणी गोठत नाही, अशा जादुई कारंज्याला भेट द्यायला त्या जातात. या सुटीत एका चॉकलेटी डोळ्यांच्या तरुणाशी तिची नजरानजर होते. पुढे काय होते... तर काही नाही! पण आपल्या स्वप्नातला राजकुमार तो हाच, असे ती मनातल्या मनात ठरवते. अशातच मायाचे लग्न आईच्या मैत्रिणीच्या मुलाबरोबर म्हणजे नमन बरोबर होते आणि तिच्या छळाची कहाणी सुरू होते.

नवऱ्याच्या बाहेरख्यालीपणाला आणि मारहाणीला कंटाळून ती त्याच्यापासून विभक्त होण्याचा निर्णय घेते; तोही तब्बल पाच वर्षांनी. नेमका त्याच वेळी एका अपघातात त्याचा मृत्यू होतो आणि नकोसे झालेले हे नाते अत्यंत विचित्र पद्धतीने संपते.

या घटनेनंतर मायाचे एकसुरी आयुष्य संपून ते रंगीबेरंगी व्हायला लागते. लेखिका म्हणून ती नाव कमवायला लागते. अचानक पुन्हा तो चॉकलेटी डोळ्यांचा पुरुष तिच्या आयुष्यात येतो. तो फिल्म प्रोड्यूसर असतो आणि मायाच्या कथेवरच सिनेमा तयार करत असतो. त्याच्याही आयुष्यात 'कोणी'तरी येऊन गेलेली असते. काही वर्षांपूर्वीची जादुई कारंज्याजवळच्या भेटीची आठवण थुईथुई नाचायला लागते. मायाला तो भेटल्यानंतर त्यांच्या प्रेमाला बहर येतो. त्यात मग थोड्या गुंतागुंती, गैरसमज आणि सरतेशेवटी सुखद शेवट. अशी ही एकसुरी कहाणी आहे. तिच्या नवऱ्याच्या मृत्यूपर्यंत ती सरळ रेषेत जाते. उत्तरार्धात मात्र घडामोडी आणि अन्य पात्रांचा वावर सुरू होतो. अनेक घटना अचानक नाट्यमय होतात. सुरुवातीपासूनच अशा नाट्यमय प्रसंगांची आणि पात्रांची गुंफण केली असती, तर पुस्तक अधिक वाचनीय झालं असतं, असं राहूनराहून वाटतं. शैलीदार म्हणावे असे लिखाण नसल्याने सुरुवातीला तर वाचकाला आकृष्ट करण्यात ते कमी पडते. पुस्तकाच्या मध्यावर मात्र लेखिकेला नस सापडली आहे. त्यामुळे वाचकांना बांधून ठेवण्यात तिला यश आले आहे. त्यामुळे एक रोमँटिक कथा म्हणून ती चांगलीच झाली आहे हेही लक्षात घ्यावे लागेल.

गेल्या शतकातील इंग्रजी साहित्यात रोमँटिक लेखनाचे एक पर्व जेन ऑस्टिन, एमिली ब्रॉन्टे अशा लेखिकांनी सुरू केले. एमिलीच्या 'वूदरिंग हाइट्स'ने तरुण वाचकांना पुस्तक वाचनाची गोडी लावली. आज भारतातील नवी पिढी अशा हलक्या फुलक्या लेखनाच्या शोधात असू शकते; मात्र तिला वाचनाचे वेड लावण्यासाठी लेखकांनाही आपल्या कक्षा रुंदावाव्या लागतील. तसे झाले तर, संपूर्णतया भारतीय असलेल्या इंग्रजी लेखनाचे एक नवेच स्वतंत्र दालन वैश्विक साहित्यात खुले होऊ शकेल. अशा काही लेखिकांचा आशादायी वावर भारतीय इंग्रजीत सुरू झाला आहे.


**अपर्णा पाटील**

महाराष्ट्र टाइम्स, दिनांक -२८/०४/२०१२

❒

# समग्र विक्रम-वेताळ

माध्यमं वेगवेगळी असली, तरीही गोष्टी ऐकण्यात आणि वाचण्यात लहान मुलांना कायम आनंद वाटत आला आहे. माध्यमक्रांतीच्या सध्याच्या युगात दृक्‌श्राव्य तंत्रज्ञानाद्वारे गोष्टी मोठ्या प्रमाणात लिहिल्या जातात. त्या न्यायाने पारंपरिक विक्रम आणि वेताळाच्या गोष्टी विविध वाहिन्यावरील मालिकांद्वारे मुलांनी पाहिल्या आहेत. गेल्या पिढीतील मुलांना चांदोबा मासिकाद्वारे परिचित असणारी ही कथामाला आता मेहता पब्लिशिंगने दहा पुस्तकांच्या संचाच्या रूपात बाजारात आणली आहे. यातील प्रत्येक पुस्तकात चार कथा आहेत. या कथा वैशाली कार्लेकर यांनी नव्याने लिहिल्या असून, अत्यंत आकर्षक रंगसंगती, छायाचित्र आणि मोठ्या अक्षरांमध्ये गोष्टी छापल्या आहेत. याशिवाय प्रत्येक पुस्तकात एक चित्र रंगवण्यासाठी दिले असून, डाव्या बाजूच्या पहिल्या पानावर विनोद आहेत. बघताक्षणी मुले या पुस्तकांच्या प्रेमात पडतील इतकी मांडणी आकर्षक आहे.




विक्रम-वेताळ या मूळच्या संस्कृतमध्ये लिहिलेल्या गोष्टी वर्षानुवर्षे आपण सोप्या मराठीतून वाचत आलो आहोत, तरीही त्यातील उत्कंठा कमी झालेली नाही. आजही तितक्याच उत्सुकतेने आपण या गोष्टी वाचतो, मुलांना सांगतो. लहानपणातच मुलांना वाचनाची गोडी लावण्यासाठी आपण निरनिराळ्या कथा, चित्रांच्या पुस्तकांबरोबर इसापनीती, अकबर-बिरबल, विक्रम वेताळाची मोठ्या अक्षरातील पुस्तके आणून देतो. मुलांना गोष्टी समजावून देण्यासाठी आपल्याला त्या वाचून, रंगवून सांगाव्या लागतात, तरचं मुलं त्यात गुंगून जातात.

अडीच हजार वर्षांपूर्वी महाकवी सोमदेव भट्ट यांनी वेताळ पंचविशी हा गोष्टीरूप ग्रंथ रचला. यात उज्जैनीचा न्यायी राजा विक्रमादित्य आणि वेताळाच्या गोष्टी आहेत.

विक्रमादित्य हा एक धाडसी आणि बुद्धिमान राजा, तर स्मशानातला वेताळ भीती दाखविणारा पण मिश्किल स्वभावाचा! सतत नवनव्या सुरस कथा सांगून राजा विक्रमाला कोड्यात टाकण्याचा हा सिलसिला आपल्याला गोष्टींच्या अद्‌भूत नगरीत घेऊन जातो.

राजा विक्रमादित्य आपल्या नगरात आलेल्या साधूला स्मशानातून वटवाघळाप्रमाणे उलट्या लटकलेल्या वेताळाला घेऊन येण्याचे वचन देतो. पण अट एकच, वेताळाला आणताना राजाने तोंडातून एक शब्दही उच्चारायचा नाही. चुकून जरी राजाने बोलण्यासाठी तोंड उघडले की, वेताळ लगेच झाडावर जाऊन उलटा लटकणार. मजल दरमजल करीत राजा जंगलाच्या मध्यभागी जिथे वेताळ उलटा लटकत असतो तिथे पोचतो. साधूने सांगितल्याप्रमाणे राजा विक्रम वेताळाला खांद्यावर घेऊन निघतो, पण नेहमीच काही ना काही गोष्टी सांगून वेताळ राजाला कोड्यात टाकतो आणि राजाला उत्तर द्यायला भाग पाडतो. राजाचे उत्तर संपताक्षणीच वेताळ परत त्याच झाडावर जाऊन उलटा लटकतो.

साधूचं कोडं आपल्या बुद्धिचातुर्याने सोडवणारा रत्नाकर, आळशी राजा धनदत्त व प्रजेलाही कष्टाचं महत्त्व शिकवणारा धीरदत्त हे दोन राजे, वारसदारासाठी धार्मिक आणि गुणी मुलाच्या शोधात असणारा वीरेंद्र, एकमेकांची परिस्थिती समजून घेणारे धर्मदत्त व विश्वदत्त हे दोन मित्र, राक्षसाला मदत करणारा व स्वत:चीच स्तुती ऐकायला आवडणारा विनोद, हुबेहूब चित्र काढूनही १०० फटक्यांची शिक्षा मिळालेला नागवर्मा व त्याची शिक्षा वाचवण्यासाठी पुढे आलेला त्याचा मित्र विजय, कुरूप असूनही केवळ आपली योग्यता जगाला दाखवून देण्यासाठी अवघड स्वयंवर जिंकणारा कुरूपसेन, प्रजेच्या कल्याणाला महत्त्व देणारा बुद्धिमान व विवेकी राजा वीर, याशिवाय मंदारवतीचा विवाह आणि अट पूर्ण झाली, ज्योतिषाचं नशीब, जादूची साखळी, राजपुत्र आणि अप्सरा, स्वाभिमानी युवक अशा अनेक गोष्टी या पुस्तकांमध्ये सोप्या भाषेत सांगितल्या आहेत. या गोष्टी सुंदर चित्रांसोबत देण्यात आल्याने मुलांना नक्कीच आवडतील आणि सुट्टीत मुलांमध्ये अशा पुस्तकांमुळे वाचनाची आवड निर्माण झाली तर पालकही नक्कीच आनंदी होतील.

**आसावरी फाटक**

लोकप्रभा - ११ मे २०१२

❒



## ओळख लेखकांची

# किरण बेदी

किरण बेदी यांचा जन्म अमृतसर येथे १९४९ साली झाला. दिल्ली विद्यापीठ येथून त्यांनी कायद्याची पदवी प्राप्त केली. आयआयटी, दिल्ली मधून त्यांनी अमली पदार्थांचे सेवन आणि घरगुती हिंसाचार (सामाजिक शास्त्र विभाग) या विषयावर पीएच डी पूर्ण केली. त्या राष्ट्रीय पातळीवर ज्युनिअर आणि सीनियर टेनिस चॅम्पियन होत्या. आशियाई टेनिस चॅम्पियनशिपमध्ये त्यांनी परदेशात भारताचे प्रतिनिधित्व केले.

राष्ट्रपतींच्या हस्ते पोलीस शौर्य पदक.

अंमली पदार्थ सेवन प्रतिबंधाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याबद्दल नॉर्वेच्या 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ गुड टेम्प्लार्स' संघटनेतर्फे एशिया रीजन अ‍ॅवॉर्ड.

१९९४ मध्ये फिलिपीन्सच्या रेमन मॅगसेसे फौंडेशनचा 'शांतता' पुरस्कार. हा पुरस्कार प्रथमच आशियातल्या एका पोलीस अधिकाऱ्याला मिळाला.

सर्वांगीण आणि नावीन्यपूर्ण प्रयोगशील व्यवस्थापनासाठी जोसेफ बायस फाउंडेशनचा (स्वित्झर्लंड) पुरस्कार.

मद्य, मादक पदार्थ, एड्स आणि तंबाखूसेवन याविरुद्ध मोहीम उघडून लोकांच्या आयुष्याची प्रत सुधारल्याबद्दल 'इंटरनॅशनल इक्युमेनिकल फोरम' या असोसिएशन ऑफ ख्रिश्चन कॉलेजेस अ‍ॅन्ड युनिव्हर्सिटीजतर्फे आंतरराष्ट्रीय पुरस्कार.

## किरण बेदी यांची साहित्यसंपदा

| पुस्तकाचे नाव | अनुवाद | किंमत |
|---|---|---|
| आय डेअर | आशा कर्दळे | २५० |
| इट्स ऑलवेज पॉसिबल | लीना सोहोनी | ३०० |
| व्हॉट वेंट रॉंग? | लीना सोहोनी | २५० |
| मजल दरमजल | भारती पांडे | ९० |
| अ‍ॅज आय सी... | | |
| स्त्रियांचे सक्षमीकरण... | माधुरी शानभाग | १४० |
| भारतीय पोलीस सेवा | माधुरी शानभाग | १५० |
| नेतृत्व आणि प्रशासन | माधुरी शानभाग | १८० |









# किरण बेदी यांच्या 'मजल दरमजल' पुस्तकातील काही भाग

तिहार माझ्या दुसऱ्या घराच्या स्थानी जाऊन बसेल असे मला स्वत:लाही कधी वाटले नव्हते. काहींनी हलक्या आवाजात तर काहींनी उघडपणे एकच वाक्य उच्चारले होते– 'ही नियुक्ती नाही, शिक्षा आहे.'

ही माझी पहिली बदली नव्हती हे तर सर्वांनाच ठाऊक होते. परंतु माझ्या अशा वारंवार बदल्या होण्यामागील दोन महत्त्वाची कारणे फार थोड्या लोकांना माहीत आहेत. पहिले कारण आहे सरकारी धोरण निश्चित नसणे आणि दुसरे कारण आहे राजनीतिक दबाव. बदल्या आणि नेमणुका यांच्यामागे असलेल्या राजनैतिक कारणांमध्ये केंद्राचे स्वत:चे हितही सामील असतेच. अशा वेळी व्यावसायिक वर्तनाला बाधा येते. आता तर हे प्रकरण राष्ट्रीय पातळीवरचे होऊन बसले आहे. यावर वेळीच नियंत्रण आणले गेले नाही तर साऱ्या देशाचा सत्यानाश होईल. या समस्येचा पूर्ण अभ्यास करून ती देशापुढे मांडणे हे प्रचार-प्रसार माध्यमांचे सर्वांत महत्त्वाचे कर्तव्य आहे  असे माझे मत आहे.

बदल्या करण्यावर असणारे राजकीय नियंत्रण आणि त्यामध्ये केला जाणारा हस्तक्षेप यावर प्रतिबंध आणण्यासाठी एका सुरक्षा आयोगाची स्थापना केली जावी असे माझे मत आहे. या आयोगाचे सदस्य वरिष्ठ पोलिस अधिकारी असावेत. याच वरिष्ठ अधिकाऱ्यांना बदल्या करण्याचे सर्व हक्क दिले जावेत. ए. एन. मुल्ला आयोगाने केलेल्या या संबंधातील शिफारसी लागू करण्यात आल्या नाहीत, ही एक दु:खाची गोष्ट आहे. जर सरकारने निश्चित आणि कडक धोरण आखले नाही तर फक्त इतर महिला पोलिस कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर इतरांनाही माझ्यासारख्याच आपत्तीला तोंड द्यावे लागेल.

काही म्हटले तरी, मी जेव्हा तिहार जेलमध्ये पोचले तेव्हा तेथे समस्यांखेरीज दुसरे काहीही नव्हते. माझ्या आधी तेथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी माझ्यासाठी एक मृतप्राय संस्था मागे ठेवली होती. माणसाशी संबंधित असलेली कोणतीही संस्था अशी साचून, तुंबून राहाण्याच्या सीमेपर्यंत जाऊन पोचते, तेव्हा तिचा ऱ्हास होण्याला सुरुवात झालेली असते. त्यांनी सर्व कायद्यांना नजरेआड करून एक स्वत:ची अन्यायकारक पद्धती अंगीकारली होती. याचे सर्वात स्पष्ट उदाहरण मी देऊ इच्छिते– ते म्हणजे कर्मचारी कल्याणाकडे केले गेलेले अक्षम्य दुर्लक्ष. श्रेणीव्यवस्थेच्या संदर्भामध्येही कसलाही विचार केला गेलेला नव्हता. कर्मचाऱ्यांच्या कामाच्या

पुनर्मूल्यमापनाकडे एवढे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे की, एक दिवस असा उजाडेल की, बहुसंख्य कर्मचारी एकाच दिवशी निवृत्त झालेले आढळतील. हे अधोगतीचेच चिन्ह नाही काय?

अशा रीतीने कमजोर होत जाणाऱ्या, सडू लागलेल्या संस्कृतीमध्ये आपण कर्मचाऱ्यांकडून ही अपेक्षा करू शकतो काय– त्यांनी एखाद्या कारागृहामध्ये खळबळ उडवून देऊ शकणारे सकारात्मक असे वातावरण निर्माण करावे? त्यांच्यासाठी कोणतेही प्रशिक्षण केंद्रही नाही.

ज्या कारागृहामध्ये दररोज शेकडो कैदी आत येतात आणि तेवढेच मुक्त होतात त्या कारागृहामध्ये डिसेंबर १९९३ पर्यंत संगणक सुद्धा नव्हता. आणि जेव्हा आला तेव्हाही सरकारकडून नव्हे, तर रोटरी या स्वयंसेवी संस्थेने भेट दिला म्हणून आला. ज्या कामाला चार चार तास लागत तेच काम आता चार मिनिटांमध्ये पुरे होऊ लागले.

ज्यावेळी मी तिहार कारागृहातील माझ्या पदाची सूत्रे स्वीकारली, त्यावेळी प्रचार-प्रसार माध्यमांनी माझ्या कामाला ‘सुधारणा’ असे नाव दिले. मी तर फक्त या परिसरातील वातावरण बदलणारे निर्णय घेतले होते. कारागृहातील एक दिवस कसा घालवला गेला पाहिजे? सर्वात प्रथम मी तिहारमधील रहिवाशांना एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली की, त्यांच्या चारही बाजूंना असलेल्या उंच मजबूत भिंती काही मी मोडून काढू शकणार नाही परंतु त्यांच्या समस्या, त्यांच्या अडचणी जर मला सांगण्यात आल्या तर मी त्या सोडवण्याचा प्रयत्न नक्कीच करू शकेन.

ध्यान, पूजापाठ, साक्षरता कार्यक्रम किंवा पंचायत स्थापन करणे या गोष्टी करून, मी सर्व कैद्यांची मने शांत करून टाकली आहेत असे मी निश्चितच म्हणू शकत नाही. परंतु तुरुंगातील कैदी आणि कर्मचारी यांच्यामध्ये फार काळ अस्तित्वात असलेला तणाव, वैरभाव नाहीसा झाला, बघता बघता व्यसने, दुराचार आणि भ्रष्टाचार यांनी ग्रासलेले तिहार कारागृह एक आश्रम, एक सुधारगृह, एक अद्वितीय संस्था होऊन गेले हे मात्र मी नक्कीच म्हणू शकते.

पहारेकरी, पोलिस आणि कैदी यांच्यामध्ये असलेली द्वेषभावना नष्ट करण्यासाठी मी कारागृहाच्या आत नेमल्या गेलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची शस्त्रे काढून घेतली. भारतीय दंडविधानाप्रमाणे आरोपी कैद्यांच्या देखरेखीसाठी फक्त दोन पोलिस ठेवण्याची परवानगी असते. त्यांना कैद्यांना स्पर्श करण्याचीही परवानगी नसते. टाडा किंवा इतर काही धोकादायक आरोपांखाली कैद करण्यात आलेल्या आरोपींखेरीज इतर कोणत्याही कैद्याला बेड्या किंवा हातकड्या घालता येत नाहीत. कोणत्याही प्रकारच्या अन्यायाची बातमी माझ्यापर्यंत पोचावी यासाठी मी तक्रार आणि विनंती पेट्यांची पद्धत सुरू केली.

एक किलोमीटर अधिक चालावे लागणार असेल तेथे मी अनेक किलोमीटर चालण्यास तयार असते. माझ्या हाताखालचे अधिकारी फक्त आपले दैनंदिन काम पार पाडून स्वस्थ बसत ही अगदी खरी गोष्ट आहे. परंतु माझे ध्येय होते अपराध्यांना सुधारणे. माझ्या दृष्टीने वेळ ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. समस्या काय आहे हे एकदा नीट कळले की, ती सोडवण्याचा उपायही आपोआपच सुचतो. यानंतर मी कामाला सुरुवात करते आणि मग काम इतके झपाट्याने होऊ लागते की, सगळी प्रक्रिया माझ्या डोळ्यासमोर स्पष्ट उभी राहते.

कोणत्याही तुरुंगाचे व्यवस्थापन किंवा निरीक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष तपासणी, पारदर्शित्व आणि प्रवेश ही फार महत्त्वाची तत्त्वे आहेत. याच कारणामुळे मी माझ्या कचेरीची दारे नेहमी उघडी ठेवली आहेत. अगदी बालपणापासूनच मी दीनदुबळ्यांच्या दु:खाबद्दल अतिशय संवेदनाशील होते. खूप वेळा गरीब लोक माझ्या वडिलांकडे मदत मागण्यास येत असत. त्याच वेळी मी ठरवून टाकले होते की, आपण पोलिस अधिकारी व्हायचे.

मला मॅगसेसे पुरस्कार मिळाला आणि त्यानंतर थोड्याच दिवसांत नेहरू अभ्यासवृत्ती मिळाली तेव्हा मला अर्थातच खूप आनंद वाटला. तिहार कारागृहामध्ये मी जे काही काम केले होते त्याला एक भरीव आणि अभ्यासपूर्ण प्रबंधाचे रूप देण्याची ही संधी मला मिळाली होती. माझ्या तुरुंगातील अनुभवांबरोबरच हा प्रबंध हेही माझे एक मोठे योगदान ठरणार आहे.

या अभ्यासवृत्तीचा विषयच ‘तिहार कारागृहातील सुधारणा’ हा होता. देशविदेशातील तुरुंगांना भेट देऊन तेथील कार्यप्रणालीचा अभ्यास करून मगच मला हा माझा शोध निबंध लिहावयाचा होता. हा विषय मला मानसिक आणि व्यावसायिक दोन्ही स्तरांवर अतिशय जिव्हाळ्याचा होता. माझ्या संशोधनाचे शीर्षक आहे, ‘भारतातील तुरुंग सुधारणा– विशेषत: तिहारच्या संदर्भात’ हे संशोधन मला तीन वर्षांमध्ये पूर्ण करावयाचे होते. माझ्याजवळ वेळ होता दोन वर्षांचा १९९४-९५ आणि १९९६-९७. मिजोराममध्ये असताना मी माझे कर्तव्य पार पाडीत असतानाच आपले संशोधनही पूर्ण केले होते. इतर अनेक विभागांप्रमाणेच या विभागामध्येही अजून खूप करण्यासारखे शिल्लक आहे. आपल्याकडे तुरुंगांचे व्यवस्थापन एका निश्चित– ठाम अशा पद्धतीने केले जात नाही. सर्वात प्रथम आपल्याला कारागृहासंबंधीचे अधिनियमच पुन्हा एकदा तयार करणे जरुरीचे आहे. इंग्रज राज्यकर्त्यांनी तयार केलेले नियमच अजूनपर्यंत चालू आहेत. आपल्याला आपल्या तुरुंग नियमावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. हे बदल करताना सुधारणात्मक बाबींकडे अधिक लक्ष पुरवले जाणे जरुरीचे आहे. सुरक्षा सांभाळणे एवढेच काम आपल्याला करावयाचे नसून त्याची रचनाही एका विशेष पद्धतीने करावयाची आहे. या रचनेमुळे उत्कृष्ट परिणामांचे ध्येय

डोळ्यांसमोर ठेवून आधुनिक जगातील नव्या गरजांचा विचार करून मग परिवर्तन घडवून आणता येईल.

परदेशातील कित्येक तुरुंग तांत्रिक स्तरावर खूपच आधुनिक आहेत, त्यांचे कारखाने, शिक्षणपद्धती, अनेक प्रकारच्या आधार व्यवस्था आपल्याहून अधिक विकसित आणि आधुनिक आहेत हे खरे असले तरी भारतातील कारागृहांमध्ये सकारात्मक कामे केली गेलीच नाहीत असे म्हणता येणार नाही. उद्योगाच्या क्षेत्रामध्ये भारतातील तुरुंग खूपच सक्रिय आहे. तिहारसह आमचे अनेक तुरुंग बरेच मागासलेले आहेत.

मी मागासलेपणाबद्दल बोलते तेव्हा मला फक्त आर्थिक बाबींबद्दल बोलायचे नसते. तिहार कारागृहामध्ये– निदान माझ्या कारकीर्दीत आम्ही मानवसंसाधन क्षेत्रामध्ये पुष्कळ प्रगती केली होती. जेथे योग, ध्यान, आध्यात्मिक शिक्षण, दीक्षा, कथा-नाटक आणि काव्यवाचन यासारखे अनेक कार्यक्रम सुरू केले गेले असा तिहार हा भारतातील पहिला तुरुंग आहे.

गोष्ट नोव्हेंबर १९९४ ची आहे. आपली तुरुंगाची पद्धत विफल ठरली आहे हे आम्हाला जाणवले. अटक केल्या गेलेल्या व्यक्तींचे खटले इतक्या दीर्घकाळपर्यंत विचाराधीन राहतात की, या बाबतीत काही पावले तात्काळ उचलली जाणे फार आवश्यक आहे. अखेरीस कैदी हा काही एकटा माणूस नसतो. त्याचे एक कुटुंब असते. त्या अपराध्याने कदाचित एखादा गुन्हा केलाही असेल परंतु त्याचे सारे कुटुंब अपराधी आहे असा याचा अर्थ नक्कीच होत नाही हे आपण कधीही विसरता कामा नये. क्षणभर विचार करा– एखादा माणूस अगदी निरपराध आहे आणि तरीही तुरुंगात खितपत पडला आहे. अशा स्थितीमध्ये त्याच्या कुटुंबाची काय स्थिती होत असेल? खटल्यांची सुनावणी आणि निकाल हे एका निश्चित वेळामध्ये झालेच पाहिजे एवढे तरी आपण नक्कीच करू शकतो. जे लोक व्यवस्थापन करतात त्यांनी फक्त समस्यांची चर्चाच करून चालणार नाही तर त्यांचे उपायही शोधून काढले गेले पाहिजेत. एकदा या धोरणांना निश्चित आकार दिला गेला किंवा या कार्यक्रमांना संस्थेचे स्वरूप दिले गेले तर सुधारणा कार्यक्रम ही एक सवयच होऊन जाईल. तुरुंग प्रशासनाने तुरुंग विकास कार्यक्रमांसाठी शासनाकडून आर्थिक मदत मिळेल, याची वाट पहाता कामा नये. त्यांनी समाजातील व्यक्ती आणि संघटना यांच्याकडे मदत मागावी. ही मदत भरपूर प्रमाणामध्ये मिळू शकते. आम्हा अधिकाऱ्यांच्या बाबतीत बोलायचे तर आम्ही कैद्यांबरोबर अधिक वेळ घालवला पाहिजे तरच त्यांना स्वत्वाची जाणीव होऊ शकेल.

१९७२ मध्ये पहिली महिला पोलिस अधिकारी बनून मी एक मैलाचा दगड रोवला. लॉन टेनिसमध्ये मी संपूर्ण आशियामध्ये विजेती ठरले. १९७८ मध्ये मला

राष्ट्रपतींचा 'वीरता पुरस्कार' मिळाला. १९८२ मध्ये एशियाडच्या वेळी रहदारीचे उत्तम नियंत्रण केल्याबद्दल माझी खूपच स्तुती केली गेली. दहा वर्षांपूर्वी मी 'नवज्योती' या नशामुक्ती केंद्राची स्थापन केली– आणखीही खूप काही माझ्या आयुष्यात घडले– काही चांगले काही वाईट. लोकांनी मला अनेक नावे देऊन गौरविले आहे– क्रेन बेदी पासून सुधार बेदीपर्यंत आणि अखेरीस विवाद बेदी! आजही ते माझ्यासाठी एखादे नवे नाव नक्कीच शोधत असतील.

दिल्लीचेच लेफ्टनंट गव्हर्नर तेजिंदर खन्ना यांची खासगी सचिव म्हणून माझी नेमणूक करण्यात आली आहे. आता कदाचित लोक मला अंमलबजावणी बेदी म्हणू लागतील. पण मी एकटी कोण आहे? कोणीही नाही. माझ्या पाठीशी एक फार मोठी फौज उभी आहे. ही फौज मला पहिल्याच वेळी मिळालेली नाही. मी या फौजेची कायमची आभारी राहीन. 'मी' मधून 'आपण' बनलो की, घडून येणारे परिणाम अभूतपूर्व असतात.

तिहारमधील माझ्या कारकीर्दीमध्ये तेथे जे बदल घडून आले, ज्या सुधारणा झाल्या त्यांचा परिणाम म्हणून एका विशेष प्रकारची चिंता निर्माण झाली. म्हणूनच तर १९९६ च्या सप्टेंबरमध्ये तुरुंग सुधारणांसंबंधीच्या विधेयकाच्या मसुद्यामध्ये तुरुंगव्यवस्थेला राष्ट्रीय पातळीवरील एक विकसित स्वरूप देण्यासाठी विस्तृत उपाय सुचवण्यात आले. अर्थातच या प्रस्तावाला राज्य विधानसभांची मान्यता मिळणे आवश्यक आहे. देशातील तुरुंग प्रशासनामध्ये आणि कैद्यांच्या देखभालीमध्ये सुधारणा घडवून आणणे हे या नव्या विधेयकाचे उद्दिष्ट राहील ही गोष्ट राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने मान्य केली आहे. या सर्व घटनांमुळे एक फार महत्त्वाचा निर्णय घेतला गेला आहे. एखाद्या व्यक्तीने कोणताही अपराध केलेला नसताना केवळ ती व्यक्ती मनोरुग्ण आहे म्हणून तुरुंगात आणली गेली असेल तर त्या व्यक्तीला कैदेत ठेवता येणार नाही. असा हा निर्णय आहे. हे असे घडते याचे कारण अनेक शहरांमध्ये मानसिक रुग्णांवर उपचार करण्याची सोयच नसते. आपल्या आईने गुन्हा केला म्हणून तिच्याबरोबर एखाद्या कारागृहामध्ये आलेली दहा मुले असली तरी त्यांच्यासाठी पाळणाघर सुरू केले गेले पाहिजे. परंतु फक्त कायदे बनवून गुन्ह्यांना आळा बसणार नाही तर यासाठी लोकांच्या मनोवृत्तीमध्ये बदल घडवून आणणे जरुरीचे आहे. या कामामध्ये जैन शिक्षणपद्धती फार उपयोगी ठरू शकेल. आज आपल्या राजकीय नेत्यांनाच प्रामाणिकपणा आणि नि:पक्षपातीपणा यांचे शिक्षण देण्याची जरुरी आहे असे माझे मत आहे.

आम्ही तिहार जेलमध्ये जे काही केले त्याला लोक क्रांतिकारक परिवर्तन मानू लागले आहेत. माझ्यापुरते बोलायचे तर मी फक्त आशावादी आहे आणि माझी आशा चांगली शक्तिशाली आहे. जर मीच समस्यांचे उपाय शोधून काढू शकत नसेन तर

मी स्वत:च एक समस्या बनून जाईन. इतर कोणत्याही भारतीय स्त्रीप्रमाणे मीही सर्वप्रथम एक माता आहे– बाकी सर्व त्यानंतर! मला मुले फार आवडतात.

परंतु येथे मी दुसऱ्याच मुलांविषयी बोलते आहे. समाज आणि शासन या दोघांनीही आपली जबाबदारी न ओळखल्यामुळे जी मुले या गुन्हेगारी जगामध्ये अडकून पडतात त्यांच्याविषयी मी बोलते आहे. त्यांना चांगले नागरिक बनवण्याचे काम कोणी स्वीकारायचे? गुन्ह्यांची वाढ होण्यामध्ये अमली पदार्थांचा फार मोठा सहभाग असतो. गुन्हे संपूर्णपणे थांबवता येणार नाहीत परंतु त्यांना आळा निश्चितच घालता येईल– अट एवढीच की, सरकार आणि समाज दोघांनीही आपापले कर्तव्य सकारात्मक विचाराने पार पाडावे.

अमेरिकेच्या अध्यक्षांनी आता शाळांच्याबाहेर पोलिस तैनात केले आहेत. मी ही गोष्ट १९८० मध्ये केली आणि याचे चांगले फळ आपल्याला मिळाले आहे. तिहारमधील ९,७०० कैद्यांपैकी ९,५०० कैदी पुरुष होते आणि त्यांच्यापैकी बहुसंख्य कैद्यांना अमली पदार्थांचे व्यसन होते. या कारागृहाचे रूप पालटून त्याला एका आश्रमाचे रूप देण्यामध्ये मला याच पुरुषांनी मदत केली होती. भारतीय पुरुष सामान्यत: स्त्रीचा मान राखतात या माझ्या मताशी तुम्हीही सहमत व्हाल. या विशिष्ट संस्कृतीमुळे मी त्यांचे मन जिंकू शकले. आपल्याकडे गरीबी आहे तसे विलासी महालही आहेत परंतु आपले बलस्थान आहे, आपल्या मनातील अनुकंपा आणि प्रेमभावना. या देशानेच साऱ्या विश्वाला सर्वप्रथम बीजगणित, रेखागणित, खगोलशास्त्र आणि इतर अनेक कला आणि वैज्ञानिक माहिती दिली आहे. महात्मा गांधींनी ज्ञान आणि संस्कृतीला परस्परांमध्ये समान वाटणी करून घेण्याची संकल्पना आपल्याला दिली. आपण तसे केले नाही तर त्यांचा तो विश्वासघात ठरेल.

जेथे शंभर टक्के साक्षरतेचे ध्येय सफल झालेले आहे असा तिहार हा जगातील एकमेव तुरुंग आहे हे सर्वांना ठाऊकच आहे. या कामामध्ये तीनशे गैरसरकारी संघटना, व्यक्ती, शैक्षणिक संस्था आणि इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ इतक्या जणांचा हातभार लागलेला आहे. परंतु यातही महत्त्वाची बाब अशी आहे की, प्रत्येक व्यक्ती सुधारल्यानंतर, तुरुंगातून सुटका झाल्यानंतर सन्मानाने जगू इच्छिते. ही संधी जेव्हा त्या व्यक्तीला मिळेल तेव्हाच हे काम खरेखुरे पूर्ण झाले असे मानता येईल.

जेलसुधार विधेयक संसदेच्या चालू अधिवेशनामध्ये मांडले जाण्याची शक्यता आहे. १९८०-८३ च्या दरम्यान आनंद नारायण मुल्ला आयोगाने केलेल्या शिफारसी अजूनही लागू करण्यात आलेल्या नाहीत. १७ वर्षे उलटून गेली आहेत परंतु राष्ट्रीय पोलिस आयोगाच्या शिफारसी अंमलात आणल्या गेलेल्या नाहीत. या सर्व सुधारणा राजकीय नेत्यांच्या स्वार्थाच्या आड येतात म्हणून जाणूनबुजूनच हे घडवून आणले जाते. पोलिस कर्मचाऱ्यांना फक्त आपले स्वत:चे काम करू दिले गेले तरीही अनेक

सामाजिक दोष आपोआप दूर होतील. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने मानव अधिकार आणि नागरिक स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी १९९५-९६ च्या आपल्या वार्षिक अहवालामध्ये फार आग्रहाने काही शिफारशी केल्या. पोलिसांची जनमानसातील प्रतिमा आणि प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी, या सुधारणा लागू करणे आवश्यक आहे असे या अहवालात म्हटले आहे. हा अहवाल संसदेमध्ये १० सप्टेंबर १९९६ या दिवशी सादर करण्यात आला. याचे पुढे काय झाले यावर आता तुम्हीच नजर ठेवा.

८ जानेवारी १९९७ ला सर्वोच्च न्यायालयाने तुरुंगाधिकाऱ्यांना आदेश दिला की, सहा महिन्यांच्या आत देशभरातील सर्व कारागृहांचे स्वरूप सुधारगृहामध्ये परिवर्तित झाले पाहिजे– त्यात क्षमतेपेक्षा अधिक कैदी असता कामा नयेत, कैद्यांबरोबर दुर्वर्तन केले जाऊ नये. त्यांना मारहाण केली जाऊ नये आणि त्यांच्या आरोग्याकडे संपूर्ण लक्ष दिले जावे. २ जानेवारी १९९७ ला तिहार तुरुंगामध्ये एका कैद्याने समलिंगी संभोगासंबंधात दुसऱ्या एका कैद्यावर हल्ला चढवला आणि त्याचे लिंग कापून खाल्ले.

तिहार तुरुंगामध्ये माझ्या कारकीर्दीत समलिंगी संभोगासंबंधी केवढे मोठे वादळ उठवण्यात आले होते हे सर्वांना ठाऊक आहे. ते सर्व पुन्हा सांगण्यात काही अर्थ नाही. परंतु मला एवढे मात्र निश्चित म्हणावेसे वाटले की, कारागृह व्यवस्थापनामध्ये दुर्वर्तनाला एक वेगळेच महत्त्व असते. तुरुंगाच्या आत अनेक विभिन्न वृत्तींचे लोक एकत्र आलेले असतात. त्यामुळेच अशा असामान्य घटना घडून येतात. कैद्यांना सतत कामामध्ये गुंतवून ठेवणे फार फायद्याचे ठरते असे माझे मत आहे. आणि ही गोष्ट सिद्धही झालेली आहे. दिवसातून दोन वेळा कैद्यांना बंद करताना हजेरी घेतली जाते. तशी हजेरी क्षणाक्षणाला घेतली जाणे आवश्यक आहे. स्वत:च्या भावना व्यक्त करण्याचा, वेळ घालवण्याचा एक मार्ग म्हणजे कामभावना. ही भावना अनैसर्गिक रीत्या व्यक्त करणाऱ्या वर्तनाला जबाबदार असते एक साचलेली तुंबलेली व्यवस्था. ही व्यवस्था बदलून टाकणे ही आपली आजची गरज आहे.

गेल्या तीन वर्षांमध्ये मी बऱ्याच तुरुंगांना भेट दिली आहे. परंतु रांची कारागृहातील परिस्थिती इतकी वाईट आणि बीभत्स स्थिती मी दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी पाहिली नाही. खरे पाहता, तुरुंगांची बदनामी होण्याचा विचार केला तर ही बदनामी पोलिस विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या वर्तनामुळेच होत आहे असे दिसून येते. हे कर्मचारी काही कारणाने अगतिक होऊन किंवा लोभीपणाने असे वर्तन करून स्वत:च्या विभागाचे नाव कलंकित करत असतात. कारागृहांच्या देखरेखीचे काम माझ्यावर सोपवण्यात आले तेव्हा सुरुवातीला अनेकांनी माझा उत्साह भंग करण्याचे खूप प्रयत्न केले. परंतु मी हे काम आव्हानाच्या रूपानेच स्वीकारले होते आणि कोणत्याही

परिस्थितीत ते पार पाडायचे असे ठरवले होते. काही राजकारणी लोकांना माझी काम करण्याची पद्धत पसंत नव्हती, त्यांनाही माझी ही नेमणूक आवडली नव्हती हे ऐकून मला आश्चर्यच वाटले होते. परंतु माझ्या विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मात्र मला फार चांगले सहकार्य दिले.

आय. जी. (जेल) या पदावर नेमणूक झाल्यानंतर सर्वात प्रथम मला वृत्तपत्रांमध्ये आणि अनेक चर्चांमध्ये उल्लेखिल्या जाणाऱ्या तिहार जेलसंबंधीच्या बातम्यांची शहानिशा करून घ्यावयाची होती. कारण माझे सहकारी अधिकारीही मला पुन:पुन्हा सांगत होते, 'किरण, सांभाळून.' तिहार जेलमधील कर्मचाऱ्यांना भेटल्यानंतरही मला हेच जाणवले की, या लोकांना फारसा अनुभव नाही. शिवाय कैद्यांबद्दल यांच्या मनात घृणा आहे.

जेल व्यवस्थापनावर देखरेख करण्याचे काम हे माझ्यासमोरचे खरोखरच फार मोठे आव्हान होते. जबाबदारीची एक नवीन जाणीव होत होती. परंतु जेव्हा सर्व कैद्यांची माहिती जाणून घेऊन मी त्यांच्याशी एकटीने चर्चा केली तेव्हा मात्र त्यांच्या मानसिक स्थितीची कल्पना आल्याने माझ्या मनात एक नवी आशा उपजली. कित्येक कैद्यांनी 'क्रेन बेदी' किंवा 'शेरनी' अशा टोपणनावाने माझा उल्लेख करण्यास सुरुवात केली होती. परंतु मीही ही गोष्ट हलक्या फुलक्या रीतीनेच स्वीकारली कारण तोपर्यंत कैदी फारच भेदरलेले होते. माझ्याशी मोकळेपणाने बोलायलाही ते बिचकत असत. अगदी सुरुवातीची गोष्ट आहे. मध्यप्रदेशातील चार कैदी एका बराकीमध्ये ठेवलेले होते. ते चौघेही एकमेकांचे फार जिगरी दोस्त आहेत असे बोलले जात असे. परंतु एका रात्री त्यांचे काहीतरी कारणावरून आपापसात भांडण झाले आणि त्यात एक कैदी मारला गेला. या घटनेमुळे तुरुंगातील वातावरण एकदम तापले. आणि याच घटनेमुळे मानसिक स्तरावर कैद्यांसाठी काहीतरी करणे आवश्यक आहे याची मला जाणीव झाली.

याच वेळी माझी भेट एका कैद्याशी झाली. त्याने आपल्या स्वत:च्या पत्नीची हत्या केली होती परंतु त्या आधी तो एक प्रसिद्ध समाजसेवक म्हणून मान्यता पावलेला होता. त्याने कित्येक वेळा माझ्याकडे मृत्युदंडाची याचना केली होती. परंतु त्याची स्थिती पाहून मी मनाशी ठरवून टाकले की, अशा कैद्यांना पूर्वीसारखे स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देऊन स्वत:च्या पूर्वायुष्यात पुन्हा एकदा घेऊन येण्याचा प्रयत्न करायचा.

कागदोपत्री कैद्यांचे वर्तन उत्तम असल्याचे दाखवून त्यांची उरलेली शिक्षा माफ करवून घेण्यासाठी कनिष्ठ अधिकाऱ्यांवर दबाव आणणे ही तर नेहमीचीच बाब आहे. परंतु आजच्या परिस्थितीमध्ये तुरुंगांच्या कार्यक्षमतेवर शंका घेणेही अशक्य आहे. कारण कैद्याने नीटपणे आपली शिक्षा भोगून निघून जावे हे आमचे ध्येय नाही आहे.

आम्ही महत्त्व देत आहोत ते या गोष्टीला की, एकदा अपराध करून मग तुरुंगामध्ये येऊन पोचलेल्या व्यक्तीशी असे वर्तन केले जावे की, त्याला गुन्ह्याच्या कल्पनेचीही घृणा वाटावी आणि तो समाजाचा एक चांगला सदस्य बनून इतरांनाही प्रेरणा देणारा व्हावा.

या बाबतीत जेलविभाग अतिशय सुदैवी ठरला आहे असे मला वाटते कारण आम्हाला अनेक समाजसुधारकांनी आणि महिला संस्थांनी खूप मोठे सहकार्य केले आहे. या सहकार्यामुळेच आम्हाला कैद्याची मानसिक परिस्थिती समजावून घेणे शक्य झाले. शिवाय यामुळे देशातील इतर कारागृहांच्या अधिकाऱ्यांनाही मार्गदर्शन झाले आणि हेही जाणवले की, कैद्यांनाही सहानुभूती हवी असते, प्रेम हवे असते.

माझा स्वत:चा अनुभव आहे की, बहुसंख्य लोक पोलिस चांगले असतील असे समजून कधीच स्वीकारत नाहीत. तर जबरदस्तीने मान्य करावी लागलेली एक वाईट गोष्ट म्हणूनच स्वीकारतात. परंतु ही भावना नष्ट करण्यासाठी अधिकारी, कैदी आणि समाजसेवी संस्था यांच्या सहकार्याने होणाऱ्या गोष्टींची सुरुवात करण्यात आली. या प्रयोगाचे परिणाम चांगले झाले. उदाहरणार्थ, कैद्याचे शिक्षण, खेळ, पूजाअर्चा या गोष्टींनी कैद्यांची दिनचर्या सुरू होऊ लागली. अशिक्षित कैदी लिहा-वाचायला शिकू लागले आहेत. जेलमधील कारखान्यांमध्ये कैदी आपल्याला अवगत असलेल्या हस्तकौशल्यांना अधिक झिलई चढवू लागले आहेत आणि पैसे कमवून जेलमधील बँकेमध्ये जमाही करू लागले आहेत.

एका मताशी मी नेहमीच सहमत होत आले आहे. अपराध्यांना शिक्षा देण्याऐवजी त्यांना मानसिकदृष्ट्या बलवान, निश्चयी बनवून निर्मितीक्षम होण्याच्या हेतूने मार्गदर्शन केले गेले पाहिजे. या मार्गदर्शनाचा प्रमुख हेतू त्यांना मानवी भावनांची पुन्हा ओळख पटवून देणे हा असला पाहिजे. कैदी किंवा अपराध्यांशी माणुसकीचे वर्तन केले गेले पाहिजे. अपराध्यांमध्ये मानसिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी, समाजाबद्दल असणाऱ्या त्यांच्या कर्तव्याची त्यांना जाणीव करून देण्यासाठी आणि स्वत:च्या पूर्वायुष्याचा त्यांना विसर पडावा यासाठी तुरुंगांमध्येच योग, खेळ, लहान मोठी कामे, किंवा कपडे शिवण्यासारखे व्यवसाय शिकवण्यात आले. याचा परिणाम उत्साहवर्धक होता शिवाय तुरुंगातील वातावरणही बदलून गेले.

इतक्या वेगवेगळ्या क्षेत्रांमधील विषयांमधील लोक आपणहून तिहारमध्ये मदत करण्यासाठी आले, असे भारतामध्ये पहिल्या प्रथमच घडले आहे हे मी आधी सांगितले आहे. या सर्व लोकांपैकी फक्त एक व्यक्ती सोडून बाकी कुणीही पैसे मिळवण्याच्या हेतूने तिहारमध्ये आला नव्हता. यांच्यापैकी कुणाला नाव कीर्ती मिळवण्याची ही इच्छा नव्हती. ते येत असत एका विलक्षण समर्पणामध्ये गुंतून, परंतु देण्याच्या भावनेने. याचा एक सहजासहजी घडून आलेला परिणाम म्हणजे

१९९४ मध्ये आमच्या हातून तयार झालेली एक पुस्तिका. साईड बाय साईड. या पुस्तिकेचा विषय होता कैद्यांचे समाजात पुनर्वसन करणे. हे काम तुरुंग प्रशासनाचे आहे. परंतु यामध्ये गैरसरकारी संस्थांचा अभूतपूर्व असा सहभाग आहे. येथूनच परिवर्तनाचे स्वर उमटण्यास प्रारंभ झाला. या पुस्तिकेचे स्वरूप मूल्यमापनात्मक आहे. द फॅमिलीचे सोनिया कुमार पिल्ले, रोहित कुमार, सरोज वशिष्ठ आणि जेल मुख्य कचेरीतील कुमारी सुनीता यांनी एकत्र येऊन अतिशय झपाट्याने ही पुस्तिका तयार केली. बिल क्लिंटन यांच्या समवेत सकाळच्या नाश्त्याच्या बैठकीला मी ही पुस्तिका घेऊन गेले होते.

बऱ्याचशा सुधारणांच्या संदर्भामध्ये जवळजवळ रोजच वृत्तपत्रे व मासिके यामध्ये छापून येत असे. येथे मी ज्या कार्यक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोचलीच नाही अशा काही कार्यक्रमांबद्दल सांगणार आहे.

साईड-बाय-साईडच्या प्रारंभीच एक कविता उद्धृत करण्यात आली आहे– तिचा भावार्थ असा– हा दिवस मावळण्याआधी माझ्या जीवनाने डझनभर जीवनांना स्पर्श केला असेल. सूर्यास्तापर्यंत या जीवनांवर मी चांगल्या किंवा वाईट खुणा केलेल्या असतील. म्हणून हे परमेश्वरा, माझी एवढीच प्रार्थना आहे की, जो कोणी माझ्या मार्गात मला भेटेल त्याला मदत करण्याची मला शक्ती दे.


सर्वात प्रथम माझ्याकडे ब्रह्मकुमारी आल्या. त्यांनी तिहार जेल क्रमांक एक आणि तीन मध्ये प्रथम आणि नंतर क्र. दोनमध्ये प्रवचने आयोजित केली. ही प्रवचने शुद्धता, प्रसन्नता आणि शांती या विषयांवर होती. याखेरीज रक्षाबंधनाच्या दिवशी चारही तुरुंगांमधील कैद्यांनी एका शपथपत्रावर सह्या करून शपथ घेतली होती की, 'ते पापाच्या जगाचा त्याग करून एक प्रामाणिक इमानदार सदाचारी आयुष्य जगतील.' नशामुक्ती आणि साक्षरता दिनही साजरे केले गेले. याचा परिणाम म्हणजे कैद्यांना तणाव आणि व्यसनातून मुक्ती तर मिळालीच परंतु त्याचबरोबर त्यांना आत्मपरीक्षण करण्याची एक संधी मिळाली, आयुष्यात काही तरी चांगले करण्याची, चांगला विचार करण्याची संधी मिळाली. आणखी एक संस्था मदत करत होती– लेमेन्स इवांजेलिकल फेलोशिप. चारही तुरुंगांमध्ये बायबलचे पठण करूनच हे लोक थांबले नाहीत तर कैद्यांबरोबर मिळून मिसळून त्यांनी कैद्यांची दुःखे ऐकली, त्यांच्या मनातील कुविचारांना, सूडाच्या भावनेला, आत्मघाताच्या विचारांना नियंत्रणाखाली आणण्यास त्यांना मदत केली. त्यांनी ३०० महिला कैद्यांना ३०० मफलर आणि माकडटोप्या दिल्या तो एक विलक्षण असा सभारंभच ठरला.

विद्याज्योति नावाची एक संस्था कैद्यांना आध्यात्मिक मार्गदर्शन करण्यासाठी आली. या संस्थेने सल्लामसलत करणे, कपडे, पुस्तके वाटणे याखेरीज आणखी एक फार रंगतदार कार्यक्रम सुरू केला. तरुणांमधील उत्साहाचा उपयोग करून

त्यांनी खेळांच्याद्वारे हसत खेळत सामूहिक पातळीवर व्यक्तित्व विकास, नेतृत्व विकास असे कार्यक्रम घेतले. या खेळांमुळे परस्परांवरील विश्वास वाढीला लागतो, परस्परसंबंध अधिक बळकट होतात. विद्याज्योतीने कैद्यांना घड्याळे, रेडियो, वॉकमन इ. वस्तूंची देखभाल करण्यासही शिकवले.

साक्षरता कार्यक्रमामध्ये इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ, राष्ट्रीय मुक्त पाठशाला, पंजाबी अकादमी या संस्थांनी आम्हाला पुरेपूर सहकार्य केले. परंतु व्यक्तिगत पातळीवर एच. एल. राणा, मेजर जनरल दिनेश चंद्र, सिमरित कौर, कु. इंदु, सरला भार्गव, डॉ. हरिश्चंद्र सेठी अशी अनेक नावे घेता येतील. या सर्वांनी तिहारमधील वातावरण कमी दु:खदायक, कमी त्रासदायक बनवण्यामध्ये अतिशय मन:पूर्वक आपला बहुमोल वेळ खर्च केला. आणि दिल्लीच्या प्रकाशकांचे तर मानावे तेवढे आभार थोडे आहेत. हिंद पॉकेट बुक्सच्या माधवी मल्होत्रांच्या पुढाकाराने तर शहरातील सर्व प्रकाशकांवर असा परिणाम केला की, बघत बघता तिहारमध्ये २२ ग्रंथालये तयार झाली.

❒


**आगामी**

खुलदाबादच्या खजिना

मीरा सिरसमकर

खट्याळपणा, खोडकरपणा, खेळकर वृत्ती आणि खळाळणारा उत्साह ही साऱ्याच लहान मुलामुलींची वैशिष्ट्यं –

मग ती शहरातली असो वा ग्रामीण भागातली.
'खुलदाबादच्या खजिन्यात' या अशाच
खास मुलामुलींच्या अनेक गमतीजमती दडलेल्या आहेत.
त्या तुम्हाला खचितच आवडतील.
खरं तर यातील बालकुमार
तुम्हाला कुठेतरी भेटलेही असतील!

आगामी




# इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझन्टेशन स्किल्स

**डॉ. अरुणा कौलगुड**

इंटरव्ह्यू म्हटले की इंग्रजीतून बोलणे, टाय लावणे, कडक शेकहँड करणे, अशा गोष्टींनाच अनावश्यक महत्त्व दिले जाते. इंग्रजी माध्यमाच्या शाळा-कॉलेजांत शिकलेली मुले जे काही इंग्रजी बोलतात, त्यामुळे लहान शहरांतील, गावांतील मुले-मुली भारावून जातात. आपल्याला इंग्रजी बोलता येत नाही याचा न्यूनगंड त्यांच्या मनात तयार होतो....

नोकरीसाठी अर्ज कसा लिहायचा, स्पर्धा परीक्षेसाठी ग्रुप डिस्कशनची तयारी कशी करायची या सर्व गोष्टींबद्दल त्यांच्यामध्ये अनभिज्ञता असते; त्यामुळे अनेकदा ते आपली माहिती प्रभावीपणे मांडू शकत नाहीत.

म्हणूनच हे पुस्तक महाराष्ट्रातल्या सर्व लहान-मोठ्या गावांमध्ये, शहरांमध्ये राहणाऱ्या; स्पर्धा परीक्षांची, इंटरव्ह्यूची तयारी करत असलेल्या मुला-मुलींसाठी तयार केले आहे. इंटरव्ह्यू देताना विविध प्रश्नांची उत्तरं कशी द्यायची, इंटरव्ह्यूच्या वेळी पाळायचे शिष्टाचार आणि आवश्यक देहबोली (Body Language) या बद्दलची सविस्तर माहिती या पुस्तकात देण्यात आलेली आहे.




*** प्रकाश मोहाडीकर**

साने गुरुजी कथामालेचे संस्थापक प्रकाशभाई मोहाडीकर यांचे १९ मे रोजी निधन झाले. ते ९४ वर्षांचे होते.

साने गुरुजींचे १९५० मध्ये देहावसान झाले, तोपावेतो प्रकाशभाईंचे अवघे आयुष्य हे गुरुजींच्याच जीवनाचा एक भाग बनले होते. गुरुजींच्या निधनाचा त्यांना बसलेला धक्का मोठा होता; आपले उर्वरित आयुष्य त्यांनी साने गुरुजींच्या विचारप्रसाराला अर्पण करून टाकले. पुढे त्यांनी शाळा काढली. दादरमध्ये अनेक सामाजिक, सांस्कृतिक संस्थांची मुहूर्तमेढ रोवली. ते उत्तम शिक्षक म्हणून गणले गेले आणि पुढे नगरसेवक, आमदार अशी पदेही त्यांनी भूषविली. पण या सर्वांमध्ये त्यांचा उद्देश केवळ गुरुजींच्या विचारांचा प्रसार करणे हाच होता. वयाची साठी गाठल्यावर माणसाने निवृत्त व्हावे, असे म्हणतात; पण प्रकाशभाईंनी वयाची ऐंशी पार केल्यानंतर १९९४ ते १९९८ या काळात महाराष्ट्रात साने गुरुजी मंगलयात्रेचे आयोजन केले आणि १४ लाख विद्यार्थी, १० हजार शिक्षक व महिला आणि १६ हजार नागरिकांना साने गुरुजींच्या आयुष्याचे दर्शन घडवले. त्याच काळात त्यांनी साने गुरुजी व संबंधित अशा २० लाख रुपयांच्या पुस्तकांची विक्री केली.

विनोबाजींनी स्थापन केलेले गीता प्रतिष्ठान, पनवेलचे शांतिवन कुष्ठरोग निवारण केंद्र यांचेही काम ते पाहात.

समाजवादी, सेवा दल आणि सर्वोदयी अशा विविध विचारांच्या कार्यकर्त्यांसाठी दादरचे साने गुरुजी विद्यालय हे एक केंद्र होते. ती शाळा आणि महाराष्ट्रातील साने गुरुजी परिवार यांना प्रकाशभाईंचे नसणे दीर्घकाळ जाणवत राहील.

*** यशवंत चकोर**

जागा मराठा, आम जमाना बदलेगा, उठा है जो तुफान, वह आखिर बंबई लेके दम लेगा अशी महाराष्ट्र गीते, पोवाडे आणि शौर्यगीते गाऊन एकेकाळी महाराष्ट्राला वेड लावणारे गोवा मुक्तिसंग्रामाच्या व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील सेनानी शाहीर यशवंत चकोर यांचे ८७व्या वर्षी निधन झाले.

गोवामुक्ती संग्राम स्वातंत्र्यसैनिकाचा दर्जा मिळावा, यासाठी त्यांनी केलेले सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्याने त्यांचा अखेरच्या टप्प्यातील प्रवास खडतर झाला होता. १९४२च्या स्वातंत्र्य-लढ्यात जयप्रकाश नारायण यांच्या सभेची सुरुवात करण्याची संधी शाहीर चकोर यांना मिळाली होती. १९४७ मध्ये क्रांतिवीर नाना पाटील यांच्या सभेत त्यांनी स्वातंत्र्यगीते म्हटली. पुढे शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे अशा ज्येष्ठ शाहिरांसोबत त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत भाग घेतला. त्यावेळी मुंबई प्रांत सरकारविरोधात प्रचार केल्यामुळे त्यांना रेल्वेची नोकरी गमवावी लागली. आचार्य अत्रे यांना हे कळल्यानंतर त्यांनी 'दैनिक मराठा'ची नाशिक जिल्ह्याची एजन्सी त्यांना दिली. पुढे चकोर १० वर्षे मनमाड नगरपालिकेत नगरसेवक होते. लोककलेतून जनजागृती करणाऱ्या या कलाकारावर आचार्य अत्रे प्रचंड खुश होते. सभेपूर्वी ते 'जय देव जय देव जय मंगलमूर्ती' हे गीत शाहीर चकोर यांना म्हणायला सांगत. स्वातंत्र्यापासून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कार्यरत राहणाऱ्या आणि अनेक पुरोगामी पक्षाबरोबर जनजागृतीचे काम केले. निळू फुले, राम नगरकर यांच्या सोबतीने पुण्यात कलापथकात काम करणारे शाहीर केवळ आईच्या आग्रहास्तव पुन्हा मनमाडला आले. त्यानंतर त्यांनी मनमाड सोडले नाही. पुण्याच्या बालगंधर्व नाट्यगृहाच्या उद्घाटनाप्रसंगी पहिले गाणे शाहीर चकोरांनी सादर केले. त्या गाण्याला चाल व संगीत पु. ल. देशपांडे यांनी दिले. अशा कितीतरी आठवणींवर शाहीर शेवटपर्यंत चिरतरुण होते.

❐


## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे कृपया लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरुर आणावे
ही नम्र विनंती.

# मेहता पब्लिशिंग हाऊसची आगामी पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | अनुवादक |
|---|---|---|
| कार्गोची कणसं | नरेंद्र माहुरतळे | |
| इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझन्टेशन स्किल्स | डॉ. अरुणा कौलगुड | |
| एकादश कथा | डॉ. छाया महाजन | |
| यशोदा | डॉ. छाया महाजन | |
| मुलखावेगळा | डॉ. छाया महाजन | |
| याला जीवन ऐसे नाव | संजीव परळीकर | |
| कृष्णदेवराय | लक्ष्मीनारायण बोल्ली | |
| खुलदाबादचा खजिना | मीरा सिरसमकर | |
| पवित्रम | स्वाती चांदोरकर | |
| साधी यंत्रे | डी.एस. इटोकर | |
| विज्ञानातील गमती | डी.एस. इटोकर | |
| विज्ञानातील रंगकथा | डी.एस. इटोकर | |
| प्रयोग वनस्पती विज्ञानाचे | डी.एस. इटोकर | |
| छंद बागेचा | सुनीती देशमुख | |
| शब्दवेध | सी. सहस्त्रबुद्धे | |
| एक दिवा विझताना | रत्नाकर मतकरी | |
| बंदा रुपया | विश्वास पाटील | |
| गप्पागोष्टी | द.मा. मिरासदार | |
| गोष्टीच गोष्टी | द.मा. मिरासदार | |
| फर्मास गोष्टी | द.मा. मिरासदार | |
| भारतीय समाज विज्ञान कोश ६ | कविता भालेराव | |
| रिचर्ड फाईनमन- एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व | सुधा रिसबूड | |
| झॅपड् | कॅरॉल हिगीन्स क्लार्क | जयंत गुणे |
| नेव्हर टू रिटर्न | सँडी रीड | सुनीता कट्टी |
| अण्णा हजारे | संपादक-प्रदीप ठाकूर पूजा राणा | धनंजय बिजले |

| | | |
|---|---|---|
| स्थूलतेला करा टाटा | डॉ. आशिष/डॉ. गौरी बोरकर | |
| हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र | डेबरा ब्रेव्हरमन | डॉ. अश्विनी घैसास |
| अनलाइकली हिरो : ओम पुरी | नंदिता सी. पुरी | अभिजित पेंढारकर |
| सेक्रेड लिफ | डेबोरा एलिस | मेघना ढोके |
| द चेंबर | जॉन ग्रिशॅम | विश्वनाथ केळकर |
| द डार्कर साईड | कोडी मॅक | प्रकाश जोशी |
| द स्पाय गेम | जॉर्जिना हार्डिंग | उज्ज्वला गोखले |
| द प्रॉफेट मर्डर्स | मेहमेत मुरात सोमार | जयंत गुणे |
| द मॅन इन द वुडन हॅट | जेन गार्डम | मीना शेटे संभू |
| सिम्पल ट्रुथ | डेव्हिड बल्डासी | सुधाकर लवाटे |
| डेव्हिल मे केअर | सेबॅस्टिअन फॉक्स | बाळ भागवत |
| डाय फॉर मी | करेन रोझ | पी.डी. देशमुख |
| केन अॅण्ड एबल | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| पाथ्स् ऑफ ग्लोरी | जेफ्री आर्चर | सुभाष जोशी |
| अॅण्ड देअरबाय हँग्ज अ टेल | जेफ्री आर्चर | डॉ. देवदत्त केतकर |
| द घोस्ट इन लव | जॉनथन कॅरॉल | उदय कुलकर्णी |
| किंग्डम | टॉम मार्टिन | उदय भिडे |
| स्टिल लाईफ | जॉय फिल्डिंग | माधव कर्वे |
| क्रिटिकल | रॉबिन कुक | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| पायरेट लॅटिट्यूडस | मायकेल क्रायटन | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट | ल्यूसी।स्टीफन हॉकिंग | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स | ल्यूसी।स्टीफन हॉकिंग | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| जॉर्ज अँड द बिग बँग | ल्यूसी।स्टीफन हॉकिंग | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| मिरॅक्युलस इफेक्टस् ऑफ अॅक्युप्रेशर | डॉ.एल.सी. गुप्ता | मुग्धा गोखले |
| द महात्मा अॅण्ड द मंकिज | | प्रियंका कुलकर्णी |
| कॅशफ्लो क्वाड्रन्ट | रॉबर्ट कियोसाकी | श्याम भुर्के |
| डेफ हेव्हन | पिंकी विराणी | विदुला टोकेकर |
| अंतरीचा दिवा : वि. स. खांडेकर | संपादन : डॉ. सुनीलकुमार लवटे | |
| द पेशंट | डॉ. मोहम्मद खादरा | डॉ. देवदत्त केतकर |
| स्टोन्स इन्टू स्कूल | ग्रेग मॉर्टेनसन | सुनीति काणे |
| वुइ आर पुअर बट सो.. मेनी | इला भट्ट | सुनीति काणे |

| | | |
|---|---|---|
| ट्रॅव्हलिंग टू इनफिनिटी माय लाईफ विथ स्टीफन | जेन हॉकिंग | सुदर्शन आठवले |
| लेसन्स इन फरगेटिंग | अनिता नायर | स्मिता लिमये |
| द स्पेअर रुम | हेलन गार्नर | वंदना कुंडेटकर |
| द गर्ल फ्रॉम फॉरेन | सादिया शेफर्ड | स्नेहलता दातार |
| डॉग बॉय | इव्हा हॉर्नंग | स्वाती काळे |
| माय फ्रेंड सँचो | अमित वर्मा | शिल्पा जोशी |
| टिअर्स ऑफ जिराफ | ॲलेक्झांडर स्मिथ | नीला चांदोरकर |
| लॉस्ट होरॉयझन | जेम्स हिल्टॉन | स्नेहल जोशी |
| व्हाय मेन वाँट सेक्स ॲण्ड विमेन नीड लव्ह | ॲलन/बार्बरा पीस | ॲड. शुभदा विद्वांस |
| चिकन सूप फॉर मदर्स सोल २ | जॅक कॅनफिल्ड | उष:प्रभा पागे |
| चिकन सूप फॉर द सोल इंडियन मदर | जॅक कॅनफिल्ड | वृषाली पटवर्धन |
| चिकन सूप फॉर द फादर्स सोल | जॅक कॅनफिल्ड | सुप्रिया वकील |
| चिकन सूप फॉर द सोल इंडियन वूमन | जॅक कॅनफिल्ड | विनिता जोगळेकर |
| टॉडलर टेमिंग | डॉ. ख्रिस्टोपर ग्रीन | मंजूषा आमडेकर |
| द टाईम ट्रॅव्हलर्स वाईफ | ऑर्डे निफिएंजर | रेश्मा कुलकर्णी |
| बिट्रेड | लतिफा अली ॲण्ड रिचर्ड शिअर्स | सिंधू जोशी |
| रुल्स ऑफ डिसेप्शन | ख्रिस्टोफर रिच | दिपक कुळकर्णी |
| हग्ज फॉर डॉटर | ख्रिस हॉवर्ड | विदुला देशपांडे |
| पॉपी | ग्रेगॉर सेमन | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| द केस ऑफ द लकी लूझर | पेरी मेसन | बाळ भागवत |
| द केस ऑफ द हॉलिंग डॉग | पेरी मॅसन | बाळ भागवत |
| द केस ऑफ द काऊंटरफिट आय | पेरी मॅसन | ए. एस. केतकर |
| डेथ ऑफ अ गॉसिप | एम.सी. बीटन | दिपक कुळकर्णी |
| डेथ ऑफ अ कॅड | एम.सी. बीटन | दीपक कुळकर्णी |
| इमॅजिनिंग इंडिया | नंदन निलेकणी | अपर्णा वेलणकर |
| द स्काय इज चेंजिंग | झू जेनी | उज्ज्वला गोखले |
| व्हेअर विल ऑल धिस टेक अस? | अरुण शौरी | अशोक पाथरकर |

| | | |
|---|---|---|
| फॉलिंग ओव्हर बॅकवर्ड्स | अरुण शौरी | अशोक पाध्ये |
| बिऑंड अग्ली | कॉनस्टंस ब्रिसको | उल्का राऊत |
| रेसिंग विथ डेथ | बेऊ रिफेनब्रुच | प्रसाददत्त गाडगीळ |
| जेआरडी लेटर्स | संपादन:अरविंद माम्ब्रो | सुप्रिया वकील |
| द फेस ऑफ डेथ | कोडी मॅक | अमोल कपोले |
| स्ट्राँग ॲट द ब्रोकन प्लेसेस | रिचार्ड एम. कोहेन | वासु भारद्वाज |
| द क्युअर | गीता आनंद | डॉ. सुभाष दांडेकर |
| सेंड देम टू हेल | सेबस्टीन विल्यम्स | अभिजीत पेंढारकर |
| ची रनिंग | डॅनी/कॅथरीन ड्रेयर | मीना शेटे संभू |
| ओल्ड सिटी हॉल | रॉबर्ट रोटेनबर्ग | अनिल काळे |
| माय नेम इज एरिक | रेई किमुरा | स्नेहल जोशी |
| अकुपार | ध्रुव भट्ट | अंजनी नरवणे |
| तडा | एस.एल. भैरप्पा | उमा कुलकर्णी |
| हाऊ टू एन्जॉय युवर लाईफ अँड युवर जॉब्ज | डेल कार्नेजी | शुभदा विद्वांस |
| अ गोल्डन एज | ताहमिमा अनाम | भारती पांडे |
| बिफोर मेमरी फेड्स | फली नरीमन | सुदर्शन आठवले |
| गेटिंग थिंग्ज डन | डेव्हिड ॲलेन | प्रशांत तळनीकर |
| मोहनदास | राजमोहन गांधी | मुक्ता देशपांडे |
| वाइल्ड स्वॉन्स: थ्री डॉटर्स ऑफ चायना | युंग चँग | विजया बापट |
| कोड नेम गॉड | मनी भौमिक | अशोक पाध्ये |
| ॲना ॲण्ड द किंग ऑफ सियाम | मार्गारिट लंडन | माणिक पाठक |
| बर्नड अलाइव्ह | सौद | गौरी देशपांडे |
| द कोड ऑफ लव्ह | अँद्रो लिंकलॅटर | मेघना जोशी-नेरीकर |
| शॅडो मॅन | कोडी मॅक | उदय भिडे |
| द बाईट ऑफ द मँगो | मारीयातू कामारा | सुनंदा अमरापूरकर |
| स्पिचेस दॅट शेप्ड द मॉडर्न वर्ल्ड | ॲलन जे. व्हीटीकर | डॉ. विवेक कोरडे |
| नोमाड | अयान हर्सी अली | प्राजक्ता चित्रे |
| द अदर साइड ऑफ द स्काय | फराह अहमदी | विनिता जोगळेकर |
| हॅरी पॉटर भाग ७ | जे.के. रोलिंग | मंजूषा आमडेकर |
| व्हाय माय थर्ड हजबंड विल बी अ डॉग | लिसा स्कॉटोलिन | शोभना शिकनीस |

| | | |
|---|---|---|
| द रायटिंग ऑन माय फोरहेड | नफिसा हाजी | शीला कारखानीस |
| द चेकलिस्ट मॅनीफेस्टो | अतुल गावंडे | सुनीति काणे |
| कॉम्पलीकेशन्स | अतुल गावंडे | नीला चांदोरकर |
| द वेट ऑफ अ मस्टर्ड सीड | वेनडील स्टिव्हेनसन | अशोक पाथरकर |

<u>English Books</u>

| | |
|---|---|
| Poppy | Gregor Salmon |
| The Woman On The Mountain | Sharyn Munro |
| Closer | Jim & Cathy Burns |
| A Note from Ichiyo | Rei Kimura |
| Sahara | Paula Constant |
| Slow Journey South | Paula Constant |
| True Blue | Deborah Ellis |
| No Ordinary Day | Deborah Ellis |
| Mr. Two Bomb | William Coles |
| The Women Before Me | Ruth Dugdall |
| The Sky is Changing | Zoe Jenny |
| Why I am Still Married | Karen Propp & Jean Trounstine |
| The 10 Laws of Enduring Success | Maria Bartiromo with Catherine Whitney |
| A Season of Darkness | Phyllis Gobbell |
| Face It | Vivian Diller |
| Death and the Dolce Vita | Stephen Gundle |
| Alone | Gerard D'Aboville |

<u>French to English</u>

| | |
|---|---|
| Slumboy | Mouhssine Ennaimi |

❒

# भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी

## मंत्रावळी सुपारी

(मागील अंकावरून)

'ओम बाबा किती वाजलेत बघा जरा.' इमारतीच्या रखवालदाराने ओमला बजावले आणि ओम भानावर आला.

'किती वाजलेत?'

'रात्रीचे अकरा.'

बापरे! दिवस चांगला गेला, आता रात्र चांगली जाण्याची लक्षणे दिसत नव्हती. आईबाबांना काय सांगायचे? निळ्या कपड्यातल्या दारुड्याचा चिकणा चेहरा त्याच्या डोळ्यासमोर तरळला. त्याचा काही उपयोग होईल. नली पण त्याला दुजोरा देईल. ओमच्या जिभेवरचा काळा डाग चुरचुरू लागला.

घराकडे जाताना ओमची पावले जड होती. नेहमीप्रमाणे आजही आईबाबा उशिरा येणार असतील तर प्रश्न नव्हता. फोनच्या उत्तर देणाऱ्या आणि निरोप नोंदणाऱ्या यंत्रावर आईचा आवाज कोणताही खेद वा दुःख प्रगट न करता नेहमीच्या सहजतेने, त्या दोघांना बाहेर जायचे असल्याचा, निरोप देणार होता.

ओमला असे वाटायला लागलेले होते की तो निरोपही कायमचा रेकॉर्ड करून ठेवला असावा. त्यांना स्वतःच्या मुलाशी दिवसातून चार शब्द बोलण्याइतकीही सवड का मिळत नाही?

बाबांनी त्याला जिमखान्यात दाखल होण्यासाठी अनेकदा सांगितले होते. म्हणजे त्याच्यासाठी घराकडे रात्री निरोपही ठेवावे लागले नसते. पण आईचे म्हणणे होते, ओमला जिमखान्यावरून घराकडे आणायची कटकट कशाला करा? संध्याकाळी ७ नंतर जिमखान्यात ओमच्या वयाचे कोणी थांबत नाही. ओमला एकट्याला तिथे रात्री

उशिरापर्यंत ठेवले तर लोकांना फार विचित्र वाटेल.

आज त्याला हायसे वाटत होते. रात्री ११ वाजता घराकडे येण्याचे स्पष्टीकरण वा समर्थन करता येणार नव्हते.

ओम दाजी किराणावाल्याच्या दुकानापाशी जरा थबकला. घराकडे खायला काही असेल याची खात्री नव्हती. नूडलचे एखादे पाकीट घेऊन जावे का? गेल्या तीन रात्री त्यातलेच वेगवेगळे स्वाद खाऊन तो कंटाळला होता. कालच्या कुठल्याश्या पार्टीतून आईने आणलेली खाद्यपदार्थांची पाकिटे फ्रिजमध्ये असण्याची शक्यता होती. घरी जाऊन पाहू तर खरे. काही नसले तर दाजीला फोन मारून त्याच्या घन्सू नोकराकरवी ते मागवता आले असते.

विचाराच्या नादात ओम इमारतीच्या लिफ्टपाशी पोहोचला. ओमचे उशिरा येणे लिफ्टवाल्याच्या अंगवळणी पडले होते. लिफ्टमध्ये जर शेजारचे कोणी भेटले नाही तर बरे. ओम फारसा सुदैवी नव्हता. पुढच्याच मजल्यावर जोशी काकू लिफ्टमध्ये शिरल्या. त्या वरती रावांच्या घरी कशासाठी तरी जात होत्या. पण त्या आता फार अबोल वागल्या. त्यांची नजरही ओमकडे कीव करत बघत होती.

ओम आपल्या मजल्यावर उतरला. त्या वर गेल्या. त्यांनी कसली चौकशी केली नाही. याची त्याला विचित्रशी चुटपुट लागली.

लॅचमध्ये चावी घालून त्याने फिरवली आणि दार लोटले. ते उघडले नाही.

ओमचा श्वास वरच्यावर अडकला. दाराला आतून कडी होती. म्हणजे.. म्हंजे आईबाबा!

दाराची घंटी मारायचा धीर त्याला होत नव्हता. जिन्यावर वरून खाली येणारा पायरव ऐकू येऊ लागला.

ओमने ताबडतोब हात उंचावून घंटी मारली. दुसऱ्या कोणी घंटी मारून त्याला घरात घुसवण्यापेक्षा आपल्याआप घुसणे परवडले. दार उघडताच तोफेचा धडाका होऊन त्याच्या चिंधड्या उडतील असे त्याला वाटले होते.

तसे काही झाले नाही. शांतपणे त्याला घरात घेतले गेले.

बाथरूममध्ये हातपाय धुवून जेवणाच्या टेबलावर तो जाऊन बसला. गरम मसाला डोश्याचा वास घमघमत होता. एका बाजूला पानात गुंडाळलेले सात आठ मेदूवडे होते. चटणीची थैली फोडण्यासाठी त्याने हात पुढे केला.

'तुझ्यासाठी टोमॅटोच्या सॉसची बाटली ठेवलीय.' बाबांच्या आवाजावरून पुढे काय वाढून ठेवलेय याचा ओमला अंदाज आला. अचानक सारी भूक मरून गेली. तोंड कोरडे पडले.

'मला आणि तुझ्या डॅडीला तुझ्याशी काही महत्त्वाचे बोलायचेय. त्यासाठी इतर महत्त्वाची कामे सोडून आज लवकर यावे लागले.' आईच्या आवाजात इतर कामे बुडल्याची तीव्र खंत होती.

'ओम, आधी खाऊन घे.' बाबांनी हुकूम सोडला. तो मोडायची हिंमत आतातरी ओममध्ये नव्हती. तोंडाची सारी चव तर गेली होती. त्याने हळूच चोरट्या नजरेने आईकडे बघितले. ती शोधक नजरेने त्याच्याकडेच पाहत होती. ओमचा घास अडकला.

त्याने एक मोठा ठसका काढला. त्याच्यासमोर पाण्याचा पेला ठेवण्यात आला.

आईबाबांचे खाऊन झाले. आईने टेबलावरची भांडी उचलली, तशी ओमनेही आपली थाळी पुढे देऊ केली.

"वाईट सवय. जर तुला हे संपवायचे नव्हते तर इतके घेतलेस कशाला?"

उरलेले घास त्याने कसेबसे घशाखाली लोटले. मग आपली थाळी उचलून घासायच्या खटाऱ्यात नेऊन ठेवली. बेसिनवर तोंड धुऊन तो आपल्या खोलीकडे निघाला.

"तू ऐकले नाहीस का? आम्हाला तुला काही विचारायचेय इथे समोर येऊन बस." ओम गपगुमान आईबाबांच्या विरुद्ध बाजूला असलेल्या खुर्चीत जाऊन बसला. ओमचा खटला सुरू झाला.

"तू जोशी काका आणि काकींना काय सांगितलेस?"ओमने

मनात जोशी दांपत्याला शिव्यांची लाखोली वाहिली. चहाडखोर. तरीच जोशीकाकू आज अश्या तोंड फिरवून गेल्या होत्या. तो गप्प बसला.

"गेले पंधरा दिवस तू शाळेत जात नाहीएस." बाबांनी शाळेकडून ओमच्या नावे आलेलं चौकशीपत्र पुराव्यादाखल त्याच्यासमोर टाकले.

"आज जोशी काकूंनी आम्हाला सांगितलं तेव्हा कळावे ना!" आईने दुखावल्या स्वरात विचारले. जोशींना आपले गृहच्छिद्र कळावे याचे तिला मोठे दुःख झालेले दिसत होते.

"अगो बाई कमालच झाली. ओम गेले दहा-वीस दिवस शाळेत जात नाही अन तुम्हाला माहित नाही?" जोशीकाकूंनी किती खवचटपणे उद्‌गार काढले होते! तुम्ही कधी मुलाची वास्तपुस्त करीत नाही का? नको नको त्या मुलांच्या संगतीत जाऊन की नाही बघा तोही त्यांच्यासारखा बदमाश झाला आहे. बाकी त्याला तरी काय दोष देणार? मुलाची जात. कोणी वळण लावणारे असेल तर ना घराकडे थांबणार? आमच्या नीलेशने एकदाच कशी दोन दिवस शाळा बुडवल्यावर आमच्या सरांनी त्याला कसला मार दिला होता सांगू. पुन्हा म्हणून पाय वाकडा टाकायची कशी हिंमत नाही झाली. आणि मी तरी कसली वस्ताद! कायम डोळ्यांत तेल घालून नजर ठेवली होती. चार, चार दिवसांनी शाळेच्या बाईंना भेटायची. आईवडिलांनी जबाबदारी नीट निभावली तर ना मुले नीट जबाबदार उपजणार!" अगदी वर्मी लागेल असा टोमणा जोशीकाकूंनी मारला होता.

सासूबाई तर वर गेल्या पण या दुसऱ्या शेजारसासूला खालीच ठेवून गेल्या. ओमच्या आजीचे आणि जोशीकाकूंचे जमणारे गूळपीठ नेहमीच तिला सलत असे. सुनांच्या चहाड्या करायला त्यांची ही एकीबेकी आहे हे न कळण्याइतकी का ती बुद्धू होती?

तीक्ष्ण नजरेने तिने ओमचे निरीक्षण केले. मान खाली घालून नजर चोरून तो बसून होता. अपराधीपणाची सारी लक्षणे तर उघड होती.

''ओम, खालचा रामसिंग सांगत होता, आताशा नेहमीच तू रात्री ८-९ च्या पुढेच परततोस. शाळेत जात नाही, क्लासला जात नाही, मग दिवसभर तू जातोस कुठे? करतोस काय?'' आईने विचारले. त्यात कसलीही दटावणी नव्हती. एक सहज साधे कुतुहूल होते.

ओमने जोशीकाकूंपाठोपाठ रखवालदाराला चार करकरीत शिव्या मनात मोजल्या. आजीने देवाघरी जाताना जोशीकाकूंना देखील बरोबर न्यायला हवे होते, हा त्याच्या मनातला विचार आईच्या मनातही चालू आहे, हे कळते तर त्याने कदाचित तिच्या प्रश्नांना उत्तर दिलेही असते.

''ओम, जर तू घरी नीट राहू शकत नसशील, तर तुला बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवावे लागेल.'' बाबांनी निर्णय घेऊनही टाकला. सगळ्यात जलद निर्णय घेणारा, परिस्थिती झटक्यात नियंत्रणात आणणारा तडफदार संचालक म्हणून कार्यालयात त्यांची ख्याती होती. जर ओम कसलेही उत्तर देत नसेल तर उगाच चौकशीची लांबडवण लावणे त्यांना निरर्थक वाटत होते. ओमने मध्ये इतके दिवस काय केले ही गोष्ट त्यांच्या नियंत्रणात नव्हती. त्याने पुढे काय करावे याचे नियंत्रण ते करणार होते. ते त्यांच्या हातात होते. तेव्हा मागे काय झाले याचे चर्वितचर्वण करणे बेकार होते.

''मी... मी एका दुसऱ्या शाळेत जातो.'' ओमने उत्तर दिले. त्याला बोर्डिंग स्कूलमध्ये अजिबात जायचे नव्हते. कल्लनसारखे अजिबात मरायचे नव्हते. कल्लन करुपण्णचा भाऊ, सत्यभासा मावशीचा मुलगा. गेल्या वर्षी बोर्डींगमध्ये घातल्यावर आत्महत्या केलेला. त्याच्या डाळ्यासमोर बारीक केस कापलेली टकलू कल्लनची छबी तरळली. डोळ्यात पाणी आले. ते पाहून आई वैतागली.

''तुला सारखे सारखे डोळ्यातून पाणी काढायची गरज नाही. इथे कोणी तुला रागावत नाही. कोणी मारत नाही. आम्ही तुला साधे प्रश्न विचारतोय आणि तू त्यांची सरळ खरी उत्तरे द्यावीस अशी

अपेक्षा करतोय.'' आईने त्याला सुनावले.

इतर पालक आपल्या मुलांचा जसा छळ करतात तसा आपण कधीच करत नाही. तरी सारेजण आपल्याला वाईट का म्हणतात हे तिला कळत नसे. ओमलाही आपले आईवडील इतर पालकांसारखे का नाहीत हा प्रश्न छळत असे. नितिन, नली यांना घरी जायला तास अर्धा तास उशीर झाला, तरी त्यांचे पालक त्यांना रागावत. त्यांचा मागच्या पुढच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करीत. जोशी काकू जेव्हा नलीवर ओरडत तेव्हा त्यांच्या चौथ्या मजल्यावरचा आवाज तळमजल्यापर्यंत सहज ऐकू जाई. ओम तर जेमतेम चौथ्या मजल्यावर होता.

नितिनला एकदा शाळा चुकवल्याबद्दल रावकाकांनी बुकलून काढले होते. नितिनने आपल्या गालावर उठलेली पाचही सणसणीत बोटे ओमसमोर मिरवली होती. आमच्या बाबांसारखा कडक हात दुसऱ्या कोणाचा नाही, माहितीय? तो आपले शरीर बळकट करून घेण्यासाठी मुद्दामहून बाबांच्या खोड्या काढून मार मिळवतो असे त्याचे म्हणणे होते. जॅकी चॅनला लहानपणापासून मार देऊन देऊन घट्ट करतात असे त्याने सिनेमात बघितले होते. सध्या आपले शरीर किती घट्ट झाले आहे, हे दाखवण्यासाठी ओमला देखील दोन, चार रट्टे लगावले होते. वर विचारले होते. खरे तर पहिल्याच रट्ट्यात त्याचे हात जॅकी चॅन पेक्षा कडक आहेत, ओमने मान्य केले होते.

''का?'' बाबांनी विचारले.

ओम गोंधळला. काय का? विचाराच्या भोवऱ्यात तो भरकटला होता.

''तू दुसऱ्या शाळेत जातोस. का?'' बाबांनी विचारले.

(क्रमशः)

समीर बागायतकर, वेंगुर्ला
+९१-७७९८६७१४८०
इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in



# दिवाळी अंक २०१२
## बालमित्रांसाठी स्पर्धा
## 'जादू माझ्या मोबाईलची'

**बालमित्रांनो,**

यंदाच्या दिवाळी अंकासाठी एक स्पर्धा जाहीर करीत आहोत.

तुमच्या घरी मोबाईल असणारच. आईचा, बाबांचा, दादाचा, ताईचा
प्रत्येकाकडे वेगळा मोबाईल असणार
तुम्हीही तो कधीकधी वापरत असणार
त्यात कितीतरी गमती असतात, नाही!
परिकथेतल्या जादूच्या दिव्याप्रमाणे मोबाईलही कितीतरी कामे करतो.

मोबाईल वरुन तुम्ही मित्रांशी गप्पा मारता. चित्रे बघता. गाणी ऐकता. गेम्स खेळता. इंटरनेटद्वारे अभ्यासही करु शकता. फोटो काढू शकता. फोटो एकमेकांना पाठवू शकता.

अशा कितीतरी गोष्टी करता येतात. एखाद्या जादूच्या दिव्याप्रमाणे मोबाईल खूप कामे करु शकतो.

तर मोबाईलच्या अशा गमतीजमती लिहून पाठवा २०/३० ओळीत.
तुमच्या लेखांतील आम्हाला आवडलेले लेख आम्ही दिवाळी अंकात छापू.

त्यातील ३ उत्तम लेखांना बक्षीस म्हणून छानछान पुस्तके देऊ.
पहिल्या नंबरला ५००रु. ची पुस्तके
दुसऱ्या नंबरला ४००रु. ची पुस्तके
तिसऱ्या नंबरला ३००रु. ची पुस्तके

**तुमचे लेख आम्हाला ३१ ऑगस्ट २०१२ पर्यंत मिळायला हवेत**

**आमचा पत्ता :**
संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४



# ओळखा पाहू



**साने गुरुजी**
**कथामालेचे संस्थापक**

विजेत्यास २००रु. किंमतीचे पुस्तक भेट
म्हणून पाठवण्यात येईल

आपली उत्तरे दिनांक १५ जुलै २०१२ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल ऑगस्ट २०१२ च्या अंकात जाहीर होईल.

## 'एप्रिल' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

सांध्यपर्वात रंगलेला मराठीतील प्रतिभावंत कवी
माणिक गोडघाटे उर्फ कवी ग्रेस

स्पर्धेचे विजेते - **ऋजुता साने - मुंबई**

रमेश गटकळ, उज्ज्वला फणसे, रमेश थेटे - पुणे, निलिमा कापडी - गोवा, भीमराव गुंडे - सोलापूर, अरविन्द भोळे - औरंगाबाद, विनायक हावळ - कोल्हापूर, सपना गुजर, संगीता माटे - सांगली, आशिष चोरगे, ऋतुराज मालशे, साहिल बेंद्रे - नाशिक, सुरेखा नाईक, सतिष देशपांडे, सुधीर कावळे - रत्नागिरी, जय पारसनीस, सारिका घाटपांडे, सुजाता माने, विकास गायकवाड, प्रीतम गाडे - नांदेड, मोना भिसे, माणिक सुरंगे, शितल पाठक, मधुसुदन पेंडसे, विनायक जांभळे, स्नेहा जोशी - मुंबई

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**


**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'लोखंड खाणारे उंदीर'** आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका - वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'**
आणि **'चला जाणून घेऊ या प्रार्थना'**
प्रत्येकी ४०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.




भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच


**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 June 2012

## Forthcoming

# Paper Cranes




Cheryl Koenig

Price - ₹ 325.00

A mother's story of hope, courage and determination.

Drawing on Cheryl's diary from the time, Paper Cranes tells the story of Jonathan's extraordinary courage and the Koenig family's unceasing drive to help him defy the ominous predictions. Set against the backdrop of Cheryl's heartfelt grief, denial and anger, the book outlines their desperate search for knowledge in the area of recovery from traumatic brain injury. At the same time she and her husband were forced to deal with the trials and tribulations of the legal system, in their search for justice for their son.

This inspirational and uplifting story demonstrates that with the right attitude it is possible to determine your own destiny regardless of what life throws in your path.

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.